|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : १३ सोमवार दि. २२ मार्च २०२१ ते रविवार दि. २८ मार्च २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## रागाच्या भरात आयुष्याचा सत्यानाश केला आईसह चिमुकलीचाही नाहक जीव गेला

चंद्रपूर/क्राईम रिपोर्टर



कौटुंबिक वादातून कधी कधी माणूस इतका हैराण होतो कि त्याला जगणे मुश्कील होते. अशावेळी त्याच्या मनात आत्महत्येचे विचार येतात. पण आपण जर आत्महत्या केली तर आपल्या मागे आपल्या मुलाचे काय होईल हि भीती त्याला सतावत असते. खास करून कौटुंबिक त्रासाला कंटाळलेली जर एखादी महिला असेल आणि तिच्या मनात आत्महत्येचे विचार येत असतील तर आपल्या मागे आपल्या मुलाचे काय होईल याची चिंताही तिला सतावत असते आणि याच चिंतेतून ती स्वतःबरोबर आपल्या मुलालाही या जगाचा निरोप घ्यायला लावते. ज्या मुलाने अजून डोळे उघडून नीटसे जग पाहिलेले नसते अशा निष्पाप बालकाचा आईच्या अविचारामुळे नाहक बळी जातो. मारेगावमध्ये अशाच एका मातेने कौटुंबिक वादाला कंटाळून आपल्या दीड वर्षाच्या मुलीसह विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून पोलीस या प्रकरणी अधिक चौकशी करीत आहेत.

एका विवाहित महिलेने आपल्या दीड वर्षाच्या मुलीसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव येथे आज शनिवारी सकाळी १०.३० वाजता उघडकीस आली. कोमल उमेश उलमाले (३०) व श्रुती उमेश उलमाले (दिड वर्ष) रा. मारेगाव असे मृतक आई व मुलीचे नाव आहे. या घटनेबाबत हळहळ व्यक्त होत आहे. मृतक कोमल उमेश उलमाले (३०) ही मारेगाव शहरात प्रभाग क्रमांक १२ येथे शासकीय विश्राम गृहाजवळ आपले पती उमेश उलमाले व ...पान २ वर

# वासनांध नराधमाला नात्याची जाणीव कुठली अरेरे जन्मदात्या आईची मुलानेच अब्रू लुटली

अमरावती/सोनू जाधव

महाराष्ट्र हि संतांची भूमी आहे. इथे ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ, मुक्ताई, चोखोबा यांच्यासारखे महान संत होऊन गेले. ज्यांनी धर्म संस्कृती बरोबरच माणुसकीची शिकवण दिली. समाजाला जगण्याची दिशा दाखवताना समाजातील थोरामोठ्यांचा कसा आदर करायचा हे शिकवले. त्याच बरोबर स्त्री हि साक्षात जगद्जननी असल्याने विविध रूपातील स्त्रीचा कशा प्रकारे सन्मान करायचा याबाबत उपदेश केला. पण काळाच्या ओघात संतांची हि शिकवण आणि आपल्या धर्मसंस्कृतीमधील मातापित्याचे स्थान या सगळ्या गोष्टींचा लोकांना हळूहळू विसर पडत चालला आहे. लोक भौतिक सुखाच्या आहारी जावून इतके वासनांध झालेत कि आता रक्ताच्या नात्यातील आई-बहिणींचीही त्यांना ओळख राहिलेली नाही. सरकार बेटी बचाव बेटी पढावच्या केवळ घोषणा देतेय. मात्र महिलांच्या सुरक्षेबाबत सरकार किंवा समाज अजिबात गंभीर नाही. आज जिथे चार भिंतीच्या आत महिला त्यांच्या कुटुंबातील पुरुषांपासूनच सुरक्षित नाहीत तिथे घराच्या बाहेर त्या काय सुरक्षित असणार? त्यांच्या अब्रूचे लुटेरे घरातच दबा धरून बसलेले आहेत. त्या घरातल्या लेकी बाळी कशा सुरक्षित राहू शकतील आणि हे सगळ अर्थातच मनोरंजनाच्या नावाखाली दाखवल्या जाणाऱ्या बिभास्त प्रकारांमुळे घडतंय.



इंटरनेट हे माहितीचे मायाजाल आहे. त्याचा वापर चांगल्या कामासाठी व्हायला हवा. पण आज इंटनेटवर चांगल्या गोष्टी बघायचे सोडून अश्लील व्हिडिओ क्लिप पहिल्या जात आहेत. त्यासाठी नेटवर हजारो संकेत स्थळे उपलब्ध आहेत. सोशल मिडियावरील फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंटाग्राम यावरही पोनोग्राफिचा सुळसुळाट सुरु आहे. त्यामुळे लोक दिवसेंदिवस या अश्लीलतेच्या आहारी जावून वासनांध बनत आहेत. त्यातूनच बलात्काराच्या घटना तसेच अनैतिक संबंधाना चालना मिळत आहे. हे सगळ एवढ्यासाठी सांगायचं आहे कि अचलपूर येथे एका नराधम तरुणाने अश्लील क्लिप पाहून स्वतःच्या जन्मदातीवर लैंगिक अत्याचार केला. महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत आणि पुरोगामी राज्यात घडलेल्या या घटनेने महाराष्ट्राला मान खाली घालायला लावलीय. या प्रकरणी नराधम मुलाला पोलिसांनी अटक केली आहे. माणुसकीला काळिमा फासणारी हि भयानक घटना अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मधील जीवनपुरा भागातील आहे. या ठिकाणी राहणाऱ्या नरेश (नाव बदललेले) हा तरुण आपल्या कुटुंबासह राहत होता. मात्र मित्रांच्या संगतीने तो बिघडला होता. त्याला दारू आणि अश्लील क्लिप पाहण्याचे ...पान २ वर

## पतीने रखेलींना जमीन देण्याची तयारी केली पत्नीने पतीच्या हत्येची सुपारी जावयाला दिली



आरोपी

औसा/शिवाजी मोरे

घरात सुखाचा संसार असताना सुद्धा बाहेर बायकांच्या लफड्यात गुरफटलेल्या स्त्री लंपटांचा शेवट खूप वाईट असतो. कारण अशा लोकांवर नात्यातल्याच लोकांचा राग असतो आणि एक दिवस हे नातेवाईकाच त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरतात. चलबुर्ग येथील श्रीमंत आळणे हा सुद्धा असाच होता. त्याला तीन मुली आणि एक मुलगा होता. सर्वांची लग्न झाली होती. त्याचा संसार सुखाचा होता. पत्नी प्रेमळ होती. तरीही त्याने बाहेर दोन बायका ठेवल्या होत्या आणि त्यांच्यावर तसेच दारूवर पैसे उडवत होता. तो एवढ्यावर थांबला नाही, तर आपल्या पाच एकर जमिनी पैकी चार एकर जमीन त्याने दोन्ही रखेलींच्या नावावर केल्या. त्यामुळे चिडलेल्या पत्नीने जावयाच्या मदतीने आपल्या पतीचा काटा काढला. दरम्यान पोलिसांनी या हत्येचा छडा लावून आरोपींना अटक केली आहे.

१५ मार्च २०२१ रोजी सकाळी औसा तालुक्यातील याकतपूर शिवारात उमेश बडगिरे यांच्या शेताजवळ लोकांनी एकच गर्दी केली होती. नेहमीप्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी जात असलेले औसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे यांनी ही गर्दी पाहून नेमका प्रकार काय आहे हे पाहण्यासाठी गर्दीच्या दिशेने कानोसा घेण्यासाठी आपली पावले ...पान ६ वर

## वासनांध नराधामांशी हिमतीने दोनहात केले अब्रू वाचवण्यासाठी अखेर प्राणाचे मोल दिले





भिवंडी/आकाश गायकवाड

बाईची अब्रू हि काचेच्या भांड्यासारखी असते. एकदा का या भांड्याला तडा गेला कि ते भांडे पुन्हा साधता येत नाही. म्हणूनच काही कुलवान महिला आपल्या प्राणापेक्षा आपल्या अब्रूला जपत असतात. पण आजकाल बाईची शिकार करण्यासाठी नाक्या नाक्यावर वासनांध लांडगे तापून बसलेले असतात. पण असे असले तरी काही महिला आपली अब्रू वाचवण्यासाठी त्यांच्याशी दोन हात करून प्रसंगी प्राणाचे बलिदान देवून अब्रू वाचवतात. भिवंडी नजीकच्या कढईमध्ये अशक एका घटनेत बकऱ्या चरण्यासाठी गेलेल्या महिलेवर नराधमांनी अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पण तिने जोरदार प्रतिकार केला. त्यामुळे चिडलेल्या त्या नराधमांनी तिची हत्या केली. पण तिने प्राणाचे बलिदान देवून अब्रू वाचवली. या प्रकरणी भिवंडी तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरारी आरोपीचा शोध घेत आहेत.

घरातील पाळीव बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या आदिवासी महिलेचा अज्ञात इसमांनी गळा आवळून खून केल्याची घटना शेलार (डोंगरी) भागात काल सायंकाळी घडली आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सुशीला जीवन दिघे (३२ रा. काटई, डोंगरपाडा) असे खून झालेल्या आदिवासी महिलेचे नांव आहे. सदर महिला गुरुवारी सायंकाळी ४ वाजेच्या ...पान २ वर

## पोलीस दलात नोकरीचे आमिष दाखवले तोतया पोलिसाने एका विवाहितेला फसवले

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर



तोतया किरण

बोलणाऱ्याचे खडे देखील विकले जातात आणि न बोलणाऱ्याचे गहू देखील विकले जात नाही असे म्हणतात. चिंध्या पांघरुन सोने विकण्यासाठी बसले तर ग्राहक राजा चालत येत नाही. मात्र सोने पांघरुन चिंध्या विकण्यासाठी बसले तर ग्राहक राजा पळत येतो असे देखील म्हटले जाते. बोलबच्चन आणि भुलभुलैय्या केल्यानंतर भोळेभाबडे लोक फसतात. जेव्हा विस्तवरुपी वास्तवाची ओळख होते तेव्हा पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले असते.

पतीच्या जेमतेम उत्पन्नावर घरखर्च चालवणारी गुड्डी (काल्पनिक नाव) शिर्डी येथे पती व तिन वर्षाच्या मुलासमवेत संसार करत होती. सन २०१६ मधे विवाह झाल्यानंतर ती पतीसमवेत शिर्डी येथे सासरी राहण्यास आली. तिचा संसार व्यवस्थित सुरु होता. तिच्या संसार वेलीवर एका पुत्र रत्नाचे आगमन देखील झाले. संसाराला हातभार लागावा म्हणून ती ऑनलाईन प्रॉडक्ट विक्रीचा व्यवसाय एका अॅपच्या माध्यमातून करु लागली. या व्यवसायाच्या ...पान ६ वर

## मुंबईचा पाहुणा लुटारुंच्या जाळ्यात फसला रस्ता विचारायला जाताच जीव गमावून बसला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



कामधंदा नसलेले रिकामटेकडे लोक दुसऱ्याच्या जीवावर जगात असतात. मात्र त्यांच्या हाती पैसा नसला कि मग त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळतात आणि एकदा का चोऱ्या किंवा लूटमार करून पैसा मिळवण्याची सवय लागली कि त्यातून दारू जुगार यासारखी व्यसन लागतात आणि हीच व्यसने पूर्ण करण्यासाठी ते सतत शिकार शोधात असतात. इचलकरंजी येथेही अशीच एक लूटमार करणाऱ्यांची टोळी होती. त्यांनी मुंबईवरून इचलकरंजी येथे पाहुण्याकडे आलेल्या एका इसमाला रस्ता दाखवण्याच्या बहाण्याने लुटले आणि नंतर त्याची हत्या केली. मात्र पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना या टोळीच्या मुसक्या आवळल्या.





इचलकरंजी शहर पोलीस स्टेशनच्या अगदी हाकेच्या अंतरावर कोरोची येथील कमलाकर याच्या खूनाच्या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी खूनाची घटना उघडकीस आली. बुधवार दि. २४ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी काही माहिला शांतीनगर येथील कत्तलखान्याच्या मागील बाजूने ओढच्या वरच्या बाजूला शेतात कामाला जात होत्या. त्यावेळी त्यांना जाधव मळ्यातील एका शेतातील झुडपामध्ये एका तरूणाचा रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे दिसून आले. त्यांनी या घटनेची माहिती जवळच असणाऱ्या नागरिकांना दिली. तोपर्यंत एका निनावी फोनद्वारे ही घटना इचलकरंजी...पान २ वर

## रक्ताच्या नात्यातच रक्तपात घडला नातवाने आजोबाचा मुडदा पाडला

धुळे/क्राईम रिपोर्टर



कौटुंबिक वाद हे शक्य तितक्या लवकर मिटवायचे असतात. पण ते जर का मिटले नाहीत तर मग कुटुंबातीलच कुणीतरी कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरतो. आजवर कौटुंबिक वादातून अनेकांच्या हत्या झाल्या आहेत. त्यातील काही पैशाच्या वादातून काही जमिनीच्या वादातून तर काही अनैतिक संबंधातून हत्या झालेल्या आहेत. पण धुळे जिल्ह्यातील वार गावात एका वेगळ्याच कारणाने चक्क चुलत नातवाने आजोबांचा खून केला. ज्ञानेश्वर पारधी नावाच्या या नातवाला कुटुंबातील लोक कौटुंबिक आणि धार्मिक कार्यक्रमात सामावून घेत नव्हते. जणू त्याला कुटुंबाने वाळीतच टाकले होते आणि याच वादातून नातवाने आपल्या चुलत आजोबाची कोयत्याने वार करून निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपी नातू फरार आहे.

जुन्या वादातून चुलत नातवानेच आजोबांच्या डोक्यात कोयता घालून त्यांची हत्या केल्याची खळबळजनक घटना धुळे जिल्ह्यातील वार गावात घडली आहे. आजोबांचा खून करून ...पान २ वर

## खून करून त्याने अपघाताचा बनाव केला एका तासात पोलिसांनी त्याला गजाआड केला

लोणावळा/क्राईम रिपोर्टर





काही अपराधी इतके शातीर दिमाग असतात कि खुनासारखा गंभीर गुन्हा करूनही ते बिनधास्त असतात. कारण आपण पोलिसांना सहज चकवू शकतो असा अति आत्मविश्वास त्यांना असतो. पण कधी कधी त्यांचा हाच अति आत्मविश्वास त्यांना गजाआड करतो. कारण गुन्हेगार कितीही हुशार असला तरी पोलीस त्याच्या पेक्षा दोन पावले पुढे असतात. त्यामुळे गुन्हेगाराने किती जरी चतुराई केली तरी तो कधी ना कधी पकडला जातो. लोणावळा येथे एका इसमाने पूर्व वैमाण्यास्यातून आपल्या विरोधकाचा खून केला आणि त्याला रस्ता अपघाताचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. पण पोलसांनी अवघ्या एका तासात या गुन्हेगाराच्या मुसक्या आवळून त्याला गजाआड केले.

मुंबई-पुणे महामार्गावर दुचाकीचा अपघात झाल्याबाबतची माहिती लोणावळा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने घटनास्थळावर दाखल होत अपघाताची पाहणी केली असता तो अपघात नसून घातपात असल्याबाबतचा संशय पोलिसांना आला. त्यानुसार ...पान २ वर

## शीघ्रकोपी पतीचा संयम अखेर सुटला महिला दिनीच पत्नीच्या जीवावर उठला

कर्जत/राजेंद्र वेदांते

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला वेगवेगळ्या प्रकारचे टेन्शन असते आणि याच टेन्शन मधून तो चिडचिडा बनतो पुढे त्याचे हे चीड चीडेपण अधिकच वाढत जावून तो शिग्रकोपी बनतो आणि या शीघ्रकोपी माणसाला एकदाका भयंकर राग आला कि त्याच्या हातून काहीही घडू शकते. कर्जत जवळच्या मिराजगावात अशीच एक घटना घडली असून सहा महिन्यापूर्वीच प्रेमविवाह झालेल्या एका शीघ्रकोपी माणसाने रागाच्या भरात महिला दिनीच आपल्या पत्नीची हत्या केली आणि या हत्येला आत्महत्येचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्याचा हा प्रयत्न हाणून पाडीत त्याला अटक केली.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे पती पत्नीच्या भांडणात महिलेचा खून झाला आहे. या घटनेने कर्जत तालुका तसंच मिरजगाव परिसर हादरला आहे. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे पती पत्नीच्या भांडणात महिलेचा खून झाला आहे. या घटनेने कर्जत तालुका तसंच मिरजगाव परिसर हादरला आहे. महिला दिनीदिवशी महिलेचा खून झाल्याने तालुक्यातील महिलांच्यामध्ये ...पान २ वर

## बहिणीचा अखेर त्याच्याकडून विश्वासघात झाला दागिन्यांसाठी मानलेल्या भावानेच तिचा खून केला



मयत छबुताई

पन्हाळा/क्राईम रिपोर्टर



आरोपी प्रकाश

आजकाल जिथे रक्ताच्या नात्याची माणसाला किमत नसते तिथे मानलेल्या नात्याचं काय? पण कधी कधी हि मानलेली नातीच जास्त उपयोगी पडतात. असा काही लोकांचा समाज आहे. त्यामुळे लोक मानलेला भाऊ, मानलेली बहिण, मानलेली आई, मानलेले वडील अशा नात्यांवर विश्वास ठेवतात. मात्र अशी नाती मुळातच कमकुवत धाग्यासारखी असल्याने ती कधीही तुटू शकतात. कसबा बोरगाव येथे राहणाऱ्या छबुताईच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. तिच्या मुलाचे लग्न जमत नव्हते म्हणून तिने आपल्या मानलेल्या भावाला मुलासाठी स्थळ बघायला सांगितले. पण या मानलेल्या भावाचा तिच्या दागिन्यावर डोळा असल्याने एकेदिवशी स्थळ बघायला नेण्याच्या निमित्ताने तिला घराबाहेर नेले आणि रस्त्यातच तिचा गळा आवळून तिच्या अंगावरील दागिने घेऊन पोबारा केला. मात्र पोलिसांनी या नराधम मानलेल्या भावाला शिताफीने अटक केली.

पन्हाळा तालुक्यातील कसबा बोरगाव येथे केरबा पाटील हे आपली पत्नी छबुताई आणि मुलगा यांच्याबरोबर राहयला आहेत. त्याच्या घरची परिस्थिती ही तशी सधन आहे. गावालगतच त्यांची ऊसाची शेती असल्याने त्याच्या हातात कायम पैसा खेळत होता. त्यातूनच त्यांनी वेळोवेळी आपल्या पत्नीला म्हणजे छबुताईला सोने घेऊन दिले होते. त्याही नवऱ्याला शेताच्या कामात ...पान २ वर

22 TO 28 MARCH 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:54 PM Page 1



## पान १ वरून....

### वासनांध नराधमाला नात्याची...

व्यसन लागले होते. त्यामुळे त्याच्या वागणुकीही बराच फरक पडला होता. त्याच्या या व्यसनामुळे त्याचे सतत त्याच्या आई-वडिलांशी भांडण व्हायचे. पण तो काही कुणाचे ऐकत नव्हता. दरम्यान गुरुवार दिनांक १८ मार्च रोजी वडील कामावर गेले होते आणि घरात तो व त्याची आईच होती. त्याने दुपारच्या वेळेस ब्ल्यू फिल्म पाहिली. यावेळी त्याने दारूही ढोसली होती. दारूची नशा आणि ब्ल्यू फिल्म पाहिल्यामुळे शरीरात संचारलेली वासना यामुळे तो बेभान झाला आणि त्याने आपल्या ४५ वर्षांच्या आईला जबरदस्तीने ओढत हॉलमध्ये नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि घरातून पळ काढला. दरम्यान संध्याकाळी त्याचा बाप कामावरून आल्यावर आईने घडलेला प्रकार आपल्या पतीला सांगताच त्यांना जबरदस्त धक्का बसला. त्यानंतर त्यांनी तत्काळ आपल्या पत्नीसह पोलीस ठाणे गाठले आणि त्यांनी या संतापजनक घटनेची पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद नोंदवली. पोलिसांनाही या घटनेने धक्का बसला आणि त्यांनी युद्ध पातळीवर आरोपी मुलाला अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला. या घटनेची माहिती अचलपूरमध्ये पसरताच सर्वत्र संतापाची लाट उसळली आणि आरोपी मुलाला फासावर लटकवण्याची लोक मागणी करू लागले. या भयंकर घटनेने संपूर्ण महाराष्ट्राला मान खाली घालायला लावली आहे.

### रागाच्या भरात आयुष्याचा सत्यानाश...

मुलगी श्रुतीसह राहायची. तिच्या पतीचे आंबेडकर चौक येथे दुकान आहे. शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास घरी सर्व मंडळी झोपलेले असताना कोमल ही आपल्या दीड वर्षाच्या मुलीला घेऊन घरून निघून गेली. दरम्यान मुलगी व आई घरात नसल्याचे पतीला लक्षात आल्यावर त्यांनी तिचा रात्री शोध घेण्यास सुरूवात केली. मात्र ती आढळून आली नाही. अखेर आज शनिवारी (२० मार्च २०२१) सकाळी कोमलच्या पतीने मारेगाव पोलीस ठाणे गाठत पत्नी व मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार दिली. दरम्यान मृतकाच्या घराजवळच असणा-या पुरके आश्रम शाळेनजीक असलेल्या थेरे यांच्या शेतातील विहीरीत मृतकाच्या पायातील चपला आढळून आल्या. नागरिकांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. दरम्यान विहिरीत गळ टाकून शोध घेतला असता यात कोमल आणि तिच्या दीड वर्षाच्या मुलीचा मृतदेह आढळून आला. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### वासनांध नराधमांशी हिमतीने दोनहात...

सुमारास घरातील पाळीव बकऱ्या चारण्यासाठी शेलार गावच्या हद्दीतील डोंगरीवर गेली होती. मात्र अज्ञात इसमांनी तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याने तिने त्यास तीव्र प्रतिविरोध केला. त्यामुळे अज्ञात इसमांनी तिचा गळा आवळून खून केल्याचे सांगण्यात येत आहे. गुरुवारी उशिराने बकऱ्या डोंगरीतून चरून घरी आल्या. मात्र सुशीला घरी परतली नाही. ही बाब मुलांनी वडील कामावरून घरी परतल्यावर सांगितली. त्यामुळे चिंतातुर झालेल्या जीवन याने शेजाऱ्यांच्या सोबतीने आणि श्रमजीवी संघटनेच्या कार्येकर्त्यांशी संपर्क साधला असता तात्काळ तानाजी लहांगे, बाला मांगात, गुरुनाथ वाघे, सुरेश वाघचौरे, अमोल मुकणे, जान्या भावर, शीवा मांगात हे कार्येकर्ते घटनास्थळी पोहचुन सुशिलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांकडे चौकशी केली. मात्र सुशिलाचा शोध लागला नाही. अखेर ती बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या जंगलाच्या डोंगरी भागात शोधण्याचा प्रयत्न केला असता तिचा मृतदेह एका निर्जन झुडुपात आढळून आला. या घटनेची तालुका पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली असता रात्री उशिराने तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग, पोलीस उपनिरीक्षक सचिन दाभाडे, वैभव देशपांडे आदी पोलीस अधिकारी आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटना स्थळाचा पंचनामा केला असताना सदरील मृत महिलेच्या गळ्यावर जखमा असून अंगावरचे दागीने सापडले नसून मोबाईल सुद्धा सापडला नसून मृतदेह शवविच्छेदनासाठी स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. डॉक्टरांनी मृतदेहाचे शवविच्छेदन केले असता सुशीला हिचा अज्ञात इसमांनी गळा आवळून तिचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. वैद्यकीय अहवालानुसार तालुका पोलिसांनी सुशीला हिच्या बहिणीची फिर्याद घेऊन खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून अज्ञात मारेकऱ्यांचा पोलीस कसून शोध घेत आहेत.

### शीघ्रकोपी पतीचा संयम अखेर ...

संतापाची लाट आहे. सहा महिन्यापूर्वी प्रेमविवाह केलेल्या पत्नीचा निर्घृण खून करण्यात आला. पत्नीची हत्या केल्यानंतर आरोपीला पश्चात्ताप झाला होता. आता पोलीस आपल्याला अटक करतील या भीतीने आरोपीने पत्नीच्या आत्महत्येचा बनाव रचला. पण त्याचा हा बनाव पोलीसांच्या चौकशीत टिकला नाही. आत्महत्या केल्याचा बनाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे गुन्हा उघडकीस आला, अशी माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना दिली. मिरजगाव येथील शंकर किशोर साळवे हा शीघ्रकोपी आहे हे संपूर्ण गावाला माहित आहे. ८ मार्च रोजी शंकर आणि पत्नी नेहा यांच्यात दुपारी कडाक्याचे भांडण झाले. यात शंकर याने नेहाला लाथाबुक्क्याने तसंच कमरेच्या पट्ट्याने मारहाण करून भिंतीवर डोके आपटले होते. यावेळी त्या ठिकाणी नेहा यांची बहीण दिक्षा आणि लहान भाऊ तेथे हजर होते. बहीण दिक्षा हिने त्यांना समजावून सांगितले परंतु त्यांचे भांडण मिटत नसल्याने दिक्षा आणि लहान भाऊ हे आपल्या गावी निघाले होते. यानंतर ही शंकरने पत्नीला जबर मारहाण केली होती. त्यात तिचा मृत्यू झाला होता. आपण केलेले कुकर्म लपवण्यासाठी शंकरने प्रयत्न सुरू केले. मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा शंकर विचार करू लागला होता. परूंतू हे शक्य नव्हते. म्हणून त्याने पत्नीने आत्महत्या केल्याचा बनाव रचला. परूंतू खूनाला वाचा फुटतेच याप्रमाणे याही खूनाला वाचा फुटली आणि आरोपी शंकर गजाआड झाला. नेहाचे भाऊ-बहीण वाटेत असताना शंकर साळवे याने त्यांना फोन करून सांगितले की, नेहा हिने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे म्हणून मी सध्या तिला घेऊन मिरजगावमधल्या दवाखान्यात घेऊन आलोय. तुम्हीही या असे सांगितल्याने दिक्षा आणि लहान भाऊ मिरजगाव येथे आले. तोपर्यत नेहाचा मृत्यू झाला होता.नेहाच्या मृतदेहाची डॉक्टर आणि पोलीसांनी बारकाईने पहाणी केली असता तिच्या शरीरावर माराहाणीचे ताजे डाग व जखमा दिसत होत्या. यावरून शंकरने तिला गुरा ढोरासारखे माराहाण केल्याचे स्पष्ट झाले. यावरून पोलीसांनी खूनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपी शंकरला अटक केली. कर्जत पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मिरजगाव दुरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे यांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. मृतदेहाचे शवविच्छेदन होऊन अहवालात वैद्यकीय प्रमाणपत्रात डोक्यास अंतर्गत मार लागल्याने मृत्यू झाल्याचे नमूद असल्याने मयताची बहीण दिक्षा ठोसर (रा.नवसरी गुजरात) यांच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शंकर साळवे यास ताब्यात घेण्यात आले आहे. अधिक तपास पोलीस अधीक्षक मनोज पाटील,अप्पर पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी अण्णासाहेब जाधव, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे हे करीत आहेत.

### मुंबईचा पाहुणा लुटारुंच्या जाळ्यात...

शहर पोलीसांना समजली होती.कत्तलखानाच्या ओढयच्या वरच्या बाजूला माळरान असून काही भागात शेती आहे. तसा हा परिसर निर्जन असल्याने काही तळीराम येथे दिवसा व रात्री दारू पिण्यासाठी हमखास येत असतात. तसेच ओढयावरून हा रस्ता पुढे सांगली रस्ता डीकेटीकडे जात असल्याने शॉर्टकट मार्गाने ही काही जण येथून येत जात असतात. या घटनेची माहिती इचलकरंची शहर पोलीसांना समजल्यावर स.पो.नि. गजेंद्र लोहार हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. मयत तरूण हा घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याचा चेहरा दगडाने ठेचला असल्याने पुर्णपणे चेंदामेंदा करण्यात आला होता. त्याची ओळख पटविणे ही कठीण होते. मृतदेह घटनास्थळापासून फरफटत नेण्यात आल्याने बाजूलाच चप्पला ही पडलेल्या होत्या. घटनास्थळी दारूच्या बाटल्या, रिकामे ग्लास आणि स्नॅक विस्कटून पडले होते. मयत तरूणाची ओळख पटली अशी कोणतीही वस्तू घटनास्थळी पोलीसांना आढळून आली नाही. मयताच्या पॅन्टेच्या खिशात एका दुचाकी गाडीची किल्ली होती. गेल्या २४ तासातील हा खूनाचा दुसरा प्रकार होता. मयत तरूण कोण आहे? त्याच्याबरोबर येथे आणखी कुणी होते. याचा तपास पोलीसांनी सुरू केला होता. मयताच्या खिशात सापडलेल्या दुचाकीच्या किल्लीवरून मोटार सायकलीचा ही शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतू मोटार सायकल ही पोलीसांना मिळून आली नाही. मयत तरूणाचा चेहरा दगडाने ठेचला असल्याने छिन्नविच्छन करण्यात आला होता. मयत तरूणाच्या छातीवर 'आई' असे गोंदवलेले होते. तरी ही मयताची ओळख पटविणे क्रमप्राप्त असल्याने पोलीस कसोसीने प्रयत्न करीत होते. घटनास्थळी जिल्हा पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे, अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, उपाधीक्षक बी.बी.महामुनी यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली होती. त्यांनी तपास अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना देऊन संशयीत आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले. संध्यकाळ पर्यत या घटनेचा कोणताही धागादोरा पोलीसांना मिळून आला नाही. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून मृतदहे जीवनमुक्ती संघटनेचे कार्यकर्ते घोडके याचेकडून आयजीएम रुग्णलयात पाठवून दिला. मंगळवार रात्रीच्या सुमारास दारू पिणाऱ्या तरूणांच्या बाचाबाची झाल्याने ही घटना घडली असावी अशी शंका व्यक्त करून पोलीसांनी तपास चालविला होता. या परिसरात कधी कोण, कोण दारू पिण्यासाठी येत असतात याची माहिती घेऊन तिघा चौघा संशयीतांना पोलीसांनी ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली परंतू त्यातून ही काही फारसे निष्पन्न झाले नाही. चौकशी नंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरूणांना सोडून दिले होते. घटना घडून तीन चार दिवस उलटले तरी मयत तरूणाची ओळख पटलेली नव्हती. मारेकरी सापडणे तरी फार लांबची गोष्ट होती. पोलीसांनी घटनास्थळापासून जवळच असलेल्या सारथी बारमधील आणि अन्य ठिकाणी असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले होते. त्यात ही घटना कुठेच चित्रबध्द झालेली नव्हती. मयताचा चेहरा मारेकऱ्यांनी विद्रुप केल्याने ओळख पटविणे तसे कठीणच होते. या घटनेच्या तपासासाठी पोलीसांची तीन चार पथके वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शेजारच्या कर्नाटक राज्यात आणि अन्यत्र रवाना करण्यात आले. मयत तरूण कोण आहे? याची ही माहिती घेण्यात येत होती. प्रयत्न करून ही पोलीसांच्या हाताला काही लागत नव्हते. आदल्या दिवशी कोरोची येथे घडलेली घटना आणि या घटनेत थोडेफार साम्य होते. दोन्ही खून एकाच पध्दतीने करण्यात आलेले होते.दोन्ही घटना दारू पित असतानाच घडल्या आहेत त्यामुळे पोलीस ही या घटनेचा तपास एकाच पट्टीतून करीत होते.या घटनेतील आरोपीची माहिती घेण्यासाठी पोलीसांनी आपल्या खास खबऱ्यांना ही कामाला लावले होते. शांतीनगर, लालनगर, आवळे गल्ली तसेच आसपासच्या ठिकाणाहून काही गुंडगिरी आणि टपोरी गिरी करणारे तरूण येथे कायमच दारू पिण्यासाठी आणि नशा करण्यासाठी येत असतात. तरीही हाकेच्या अंतरावर असणाऱ्या गावभाग पोलिसांच्या निदर्शनास हे येत नाही. त्यातूनच अशा खुनासारख्या घटना घडल्या तरी पोलीसांनाचा त्याचा थांगपत्ता नसतो असे या भागातील काही जाणकार नागरिकांचे म्हणणे आहे. ही घटना घडून वीस दिवस झाले तरी मयत तरूण कोण? त्याचे मारेकरी कोण? त्यांनी ही घटना कोणत्या कारणातून केली याचा काहीच उलघडा होत नव्हता. त्यामुळे या घटनेविषयी लोकांच्यात तर्क वितर्क लढविले जात होते.पोलीसांचा तपास चालूच होता. त्यातच पोलीसांच्या एका गुप्त खबऱ्याने शनिवार दि.१३ मार्च रोजी पोलीसांना या घटनेतील एका संशयीत आरोपी विषयी माहिती दिली, या घटनेतील संशयीत आरोपी अक्षय कमतनुरे हा आपल्या शहापूर, कृष्णानगर येथील घरी येणार आहे. ही माहिती समजातच गावभाग पोलीस स्टेशनचे पोलीस कॉ.मोहसिन पठाण, सुनिल पाटील, सुहास शिंदे, जावेद आंबेकरी आणि सागर हारूगले यांनी कृष्णानगर येथे सापळा लावला होता. पहाटे पहाटे म्हणजे रविवारी अक्षय हा आपल्या घरातून बाहेर जात असल्याचे पोलीसांना दिसून आले.त्यावेळी अक्षयला ही पोलीस आल्याची चाहूल लागल्याने तो आपल्या मोटार सायकलीवरून पळून जात असताना पोलीसांनी त्याला मोठया शिताफीने पकडले आणि गावभाग पोलीस स्टेशनला आणले.त्याच्याकडे शांतीनगर येथे घडलेल्या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांना त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने घडलेली सगळी घटना पोलीसांना सांगून या गुन्हयातील त्याचे दुसरे मित्र शक्ती शहाजी इंगळे रा.आंबडेकर नगर शहापूर तेजस उर्फ सुशांत गोरे रा.दत्तनगर शहापूर यांची नावे सांगितली. अक्षयने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या दोघांनाही त्यांच्या राहत्या घरातून अटक करून ताब्यात घेतले.त्यांनी ही पोलीसाकडे आपल्या गुन्हयाची कबुली दिली. अक्षय कमतनुरे,तेजस गोरे,आणि शक्ती इंगळे हे तिघे ही मित्र तसे ते कोणताच कामधंदा करीत नव्हते. उडाणटप्पू गिरी करत दारू पिणे, लोकांना धमकावणे, लुटमार करणे हे त्याचे धंदे होते. अक्षय कमतनुरेवर तर सन २०१७ साली पोक्सो अंतर्गत कारवाई करण्यात आलेली होती. त्याच्यावर अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा गंभीर गुन्हा दाखल होता. या गुन्हयात त्याला सध्या जामीन मिळाल्याने तो बाहेर होता. घटनेच्या दिवशी म्हणजे २४ फेब्रुवारी २०२१ रोजी ते तिघे ही मोटार सायकल क्र एमएच ०९ एफए ०३४३ ने हातकणंगले मार्ग हायवे वरून फिरत शिरोली फाटयावरून परत इचलकरंजीला येत होते.त्यावेळी ते लुटमारी करण्यासाठी सावज शोधत होते.ते इचलकरंजीला परत येत असताना साधारणता संध्याकाळी ५ ते ६च्या दरम्यान त्याना माणगाव फाटयावर एक तरूण येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाना हात करीत उभा असल्याचे दिसला. त्यांनी त्याच्याजवळ जात त्याला कुठे जाणार आहे असे विचारले. अक्षय, तेजस आणि शक्ती हे तिघे ही त्यावेळी फुल्ल दारूच्या नशेत होते. त्यांना दारू कमी पडली होती. त्यातच माणगाव फाटयावर उभ्या असलेल्या तरूणाने त्याना हात केल्यावर आयतीच संधी चालून आली हे बघून ते त्याच्याजवळ गेले. त्यावेळी त्या तरूणाने मी मुंबईहून आलो असून मला इचलकरंजी - खोतवाडीला जायचे आहे असे सांगून आपले नांव अजय कांबळे असल्याचे सांगितले. त्याने आपली ओळख सांगितल्यावर ते त्याला म्हणाले चल बस आम्ही तुला इचलकरंजी शहापूर येथे सोडतो.त्या तिघांच्या ही तोंडाला दारूचा वास येत असल्याने अजयला ही दारू पिण्याची इच्छा झाली होती. मोटार सायकलीवर ते चौघे बोलत येत असताना अजयने त्याना कुठे पार्सल दारू मिळते का? हे विचारले? त्यावर त्यांनी त्याला चल आपण पुढे पार्सल दारू घेऊ असे म्हटले. त्यावेळी इचलकरंची शहरात येताना कबनुरातून फॅक्टरी मार्गे गाडी घालून फॅक्टरी रोडवर असणाऱ्या एका वाईन शॉपमधून दारूच्या चार पाच बाटल्या,बिअर आणि स्नॅक्स घेतले. अजयला आपल्या मोटार सायकलीवरती घेऊन ते तिघे ही गणेशनगरातून विक्रमनगर येथून कत्तलखान्याच्या मागे असलेल्या ओढयानजीकच्या मोकळ्या रानात दारू पिण्यासाठी आले. चौघेही मनसोक्त दारू पित असताना अजयने त्यांना मी मुंबईचा असून मी इचलकरंजी खोतवाडी येथील एका पाहुण्याच्याकडे आलो आहे असे सांगितले. त्यावेळी त्यानेच दारूचे सगळे बील भागविले होते. त्याच्या पॅन्टेच्या खिशात आणि पॉकिटात भरपूर पैसे असल्याचे अक्षय कमतनुरे याने बघितले होते.म्हणून ते त्याला फुल्ल दारू पाजत होते. रात्रीचे आठ वाजले असतील त्या माळरानावरती कुणी चिटुक पाखरू ही नव्हते. चौघांनाही दारूची फुल्ल नशा झाल्याने चौघे ही हवेत तरळत होते. जणु काही आपण जवळचे मित्रच आहोत अशा थटामस्करीत एकमेकांना शिवीगाळ करीत दारूची पार्टी चालली होती. अजयकडे पैशाने भरलेले पॉकिट आहे हे त्या तिघांना ही माहित झाले होते.दारूच्या नशेत अजय ही पैशाची मोठी बात करीत होता आयतेच बकरे चालून आल्याची संधी त्यांनी हेरली. त्याचवेळी अक्षयने तेजस आणि शक्तीला खुणवले. त्यांनी दारूच्या नशेत असलेल्या अजयला तुझ्याकडेचे सगळे पैसे दे नाही तर आम्ही तुला मारून टाकतो अशी धमकी देत त्याला मारहाण करायला सुरूवात केली. त्यातच अक्षयने अजयचा गळा आवळून धरला. त्या चौघांनी जणांत झटापट चालली होती. ते त्याला मारहाण करीत असताना दारूच्या बाटल्या विस्कटल्या होत्या. अजयला मारहाण करीत होते तरीही तो त्यांना आपल्या पैशाचे पॉकिट देत नव्हता.म्हणून त्या तिघांनी फरफटतच काही अंतरावर नेले. त्यांनी तेथे पडलेला एक मोठा दगड घेतला आणि तो अजयच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर घातला. त्यासरशी तो रक्तबंबाळ अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडला.त्याचा जीगीच मृत्यू झाल्याचे बघून त्यांनी त्याच्याकडील पैसे काढून घेऊन त्याच्या पॅन्टेच्या खिशात मोटार सायकलीची किल्ली ठेवले आणि मोटार सायकल घेऊन पळून गेले. ती मोटार सायकल अक्षय कमतनुरे याची होती, परंतू पोलीसांची दिशाभूल करण्यासाठी त्यांनी त्या मोटार सायकलची किल्ली मयत अजय कांबळे यांच्या पॅन्टेच्या खिशात ठेवून दिली आणि घटनास्थळावरून अंधाराचा फायदा घेत पोबारा केला. या घटनेनंतर ते तिघे इचलकरंजी सोडून कर्नाटकातील आपल्या नातेवाईकाकडे गेले होते.घटनास्थळी त्यांनी कोणताच पुरावा ठेवलेला नव्हता. सावज हेरून त्यांनी अशा ठिकाणी नेले होते की जेथे कुणाचीच नजर जाणार नाही. तसा अजय कांबळे हा देखील त्यांना अपरिचीत असाच होता. त्यामुळे त्याला मारून टाकले तर आपण कुठे अडकणार नाही याची त्यांनी पुरेपुर दक्षता घेतली होती. घटनास्थळी पोलीसांना रक्ताने माखलेला दगड मिळालेला होता. घटनास्थळ हे आजूबाजूच्या सीसीटीव्हीच्या कक्षेपासून ही दुर होते. त्यामुळे सहजा सहजी आपण पकडले जाणार नाही याची त्यांनी काळजी घेतली होती. आरोपी मिळाल्यानंतर मयताची ओळख पटलेली होती. परंतू तो इचलकरंजी परिसरात तो कुणाकडे आणि कशासाठी आला होता याची कुणालाच काही माहिती नव्हती. त्यामुळे या घटनेची फिर्याद देण्यास कुणीच पुढे आले नाही.म्हणून पोलीसांनी स्वत:च या घटनेची फिर्यादी होऊन फिर्याद दाखल केली होती. अजय कांबळे (वय २५ रा.मुंबई) याच्या खून प्रकरणी अक्षय रावसाहेब कमतनुरे (वय २२) रा.कृष्णानगर, शहापूर, शक्ती शहाजी इंगळे (वय२४) रा.आंबडेकर नगर शहापुर आणि तेजस उर्फ सुशांत गोरे (वय १९) रा.दत्तनगर शहापूर याच्या विरोधात गु.रजि.नं ७५/२०२१ कलम ३०२,३४ अन्वये गुन्हा दाखल करून त्या तिघांना पोलीसांनी सोमवार दि.१५मार्च रोजी इचलकरंजी येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास गावभाग पोलीस स्टेशनचे स.पो.नी. गजेंद्र लोहार याच्या मार्गदर्शनाखाली गावभाग पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत. या घटनेचा यशस्वीपणे तपास करून संशयीत आरोपीना ताब्यात घेतल्याबद्दल जिल्हा पोलीस प्रमुख शैलेश बलकवडे तपास पथकाला वीस हजार रूपयांचे बक्षिस जाहिर केले. केवळ दारू प्यायचे लुटमारी करयाचे आणि लोकांना धमकावयाचे एवढेच काम काही बिनकामाचे तरूण करीत असतात सतत दारुच्या नशेत राहून एखाद्याला त्रास देणे आणि दारू पिपण्यासाठी पैसे दिले नाहीत तर त्याला मारून टाकणे असा उदयोग करून भागात गल्लीत दशहत पसरवून आपण जणू काही 'भाई'च आहोत अशा थाटात वावरत असतात.

### रक्ताच्या नात्यातच रक्तपात ...

आरोपी नातू फरार झाला आहे. धुळे तालुक्यातील वार गावातील ६८ वर्षीय आत्माराम हिरामण पारधी यांचा चुलत नातवानेच घात केला. पूर्व वैमनस्यातून हा खून झाला असून याप्रकरणी आरोपीविरोधात पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे तालुक्यातील वार गावातील आत्माराम पारधी असं या मयत आजोबांचं नाव असून त्यांचा चुलत नातू ज्ञानेश्वर पारधी याने भरदिवसा जुन्या कौटुंबिक वादातून आत्माराम यांच्या डोक्यावर धारदार कोयत्याने वार करत त्यांचा खून केला. आजोबा आत्माराम पारधी हे पत्नी, चार मुलगे व सुनांसह वार गावातच राहतात. गावातच त्यांच्या घराजवळ त्यांचा चुलत नातू ज्ञानेश्वर पारधी राहतो. नेहमीप्रमाणे ज्ञानेश्वर हा आजीकडे आला. यावेळी ज्ञानेश्वरने कौटुंबिक वादाची कुरापत काढून शेजारीच असलेल्या आत्माराम पारधी यांच्याशी वाद घातला. त्यांनंतर भडकलेल्या ज्ञानेश्वरने आपल्या हातातील कोयत्याने थेट आत्माराम पारधी यांच्या डोक्यावरच वार केले. यामुळे आत्माराम पारधी गंभीर दुखापत होऊन रक्ताच्या थारोळ्यात जागीच कोसळले. अधिक रक्तस्त्रावामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. कौटुंबिक जुना वाद तसंच कुटुंबाच्या आणि समाजाच्या धार्मिक कार्यक्रमात समाविष्ट करून घेतले जात नसल्याने ज्ञानेश्वरच्या मनात राग होता. त्यामुळे त्याने हा खून केला असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. आरोपी हा मयत आत्माराम पारधी यांचा चुलत नातू आहे. घटनेची माहिती मिळताच पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र व त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, या घटनेनंतर ज्ञानेश्वर हा गावातून पसार झाला असून पश्चिम देवपूर पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### खून करून त्याने अपघाताचा ...

या घटनेची आजूबाजूला पोलिसांनी चौकशी केली असता चारचाकी वाहनाने दुचाकीस्वाराला मागून जोरदार धडक देऊन तो लोणावळ्याच्या दिशेने पसार झाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार क्षणाचाही विलंब न करता पोलीस निरीक्षक मुजावर यांनी शहरातील सर्व प्रमुख रस्त्यावर नाकाबंदी करण्याचे आदेश दिले. नाका-बंदी दरम्यान एक मारुती ८०० कार पोलिसांना संशयास्पद आढळून आली. त्या वाहन चालकाला पोलिसांनी विचारपूस केली असता त्याने आपले नाव रामदास ओझरकर असं सांगितलं. त्याच्याजवळ असलेली कार ही समोरील बाजूने अपघातग्रस्त असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आल्याने त्याविषयी पोलिसांनी अधिक चौकशी केली असता रामदास याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता पूर्ववैमनस्यातून भांडण झाल्याचा राग मनात धरून रामदास याने त्याच्याकडे असलेल्या मारुती ८०० कार वरून भाजे गावाच्या हद्दीतून लोणावळ्याच्या दिशेने दुचाकीवरून जाणाऱ्या सतीश ओझरकर यास पाठीमागून जोरदार धडक दिली असल्याचे सांगितले. दुचाकीवरून खाली पडलेल्या सतीश यास रामदास याने त्याच्याजवळ असलेल्या लोखंडी रॉडने डोक्यावर तसंच अंगावर बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. गंभीर जखमी झालेल्या सतीशला महामार्गावर सोडून रामदासने लोणावळ्याच्या दिशेने पळ काढला. महामार्गावर सतीशला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने मृत्यू झाला असा बनाव आरोपी रामदास याने आखला होता. परंतु पोलिसांच्या वेगवान तपासामुळे त्याचं बिंग फुटलं आणि अवघ्या तासाभरातच लोणावळा ग्रामीण पोलिसांनी आरोपी रामदासच्या हातात बेड्या ठोकल्या. संबंधित घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सतीश याचा रामदासने धडक देउन मारहाण करत खून केला असल्याबाबतची कबुली पोलिसांना दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून गुन्ह्यात वापरण्यात आलेली मारुती कार तसंच लोखंडी रॉड पोलिसांनी जप्त केला आहे. घटनेचा आधिक तपास लोणावळा ग्रामीण पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख अपर पोलीस अधीक्षक विवेक पाटील, सहाय्यक पोलीस अधिक्षक नवनीत कावत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश माने, पोलीस उपनिरीक्षक अनिल लवटे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिंदे, पोलीस हवलदार जिवराज बनसोडे, शकील शेख, पोलीस नाईक देविदास चाकणे, मयुर अबनावे, पो.शी. ऋषिकेश पंचरास, सिद्धेश शिंदे, हणमंत शिंदे, स्वप्नील पाटील, मच्छिंद्र पानसरे यांनी केली.

### बहिणीचा अखेर त्याच्याकडून विश्वासघात ...

कायम मदत करीत होत्या. राबणाऱ्या हाताला कष्टाची किमंत कळत असते. म्हणूनच ते दोघे नवरा बायको रात्रीचा दिवस करून आपल्या शेतात राबत होते. त्यातून त्यांना अर्थिक सुबत्ता आलेली होती. छबुताई आणि त्याच्या नवऱ्याचे वय झाले होते.दोघेही ६०च्या आसपास पोहोचले होते. त्याचा मुलगा ही मोठा लग्नायोग्य झाला होता. त्याच्यासाठी त्यांनी आपल्या ओळखीच्या लोकांच्या संपर्कातून मुली पाहयला सुरूवात केली होती. गेली दोन तीन वर्ष ते मुलासाठी मुली पाहत होते. पण योग्य त्या ठिकाणी सोयरीक जमून येत नव्हती. कारण हल्ली मुले जास्त आणि मुली कमी. त्यामुळे प्रत्येक समाजातील मुलांच्या लग्नाचे बारा वाजले आहेत. मुलीची अपेक्षा जास्त,त्यातच शेतकरी नवरा नको हे ओघाने आलेच त्यामुळे समाजात शिकून ही बेकार राहण्याची अनेकावर वेळ आली आहे. त्यामुळे बरेज जण बेकार राहण्यापेक्षा आणि नोकरीपेक्षा शेती बरी म्हणून अनेक तरूण शेतीकडे वळाले आहेत. लग्नाचे वय ओलांडून गेले तरी त्याची मुलगा शेती करतो या कारणातून लग्न जमेनासे झाले आहे. छबुताई याचा मुलगा ही वयाच्या ३०शीत पोहोचला होता. त्याचे ही लग्न जमत नव्हते. ते आपल्या नातेवाईकांना तसेच मित्रांना आणि ओळखीच्या लोकांना मुलासाठी स्थळ सुचवा म्हणून सांगत होते. त्यातच त्याच्या घरात असंडोली साळवण येथील प्रकाश कुंभार या नेहमी येत जात होता.त्याला ही त्यांनी आपल्या मुलासाठी मुलगी पाहून ठेव म्हणून सांगितले होते. प्रकाश कुंभार हा भोळा आणि साधा दिसत असला तरी तो तसा नव्हता. तो आतील गाठीचा होता. तो आपला अंदाज कुणाला लागू देत नव्हता. त्याचे दाखवयाचे दात एक आणि खायचे दात एक असे त्याचे वागणे होते. त्याचे पाटील याच्या घरी येणे जाणे असल्याने पाटील यांना तो घरच्या सारखा होता. पाटील यांना ही प्रकाश कुंभार याच्या घरच्या परिस्थीतीची थोडीफार माहिती होती. प्रकाश याने आपण मुली दाखवून लग्न जमवून देतो असे त्यांना सांगितले होते. या अगोदर देखिल त्याने त्याना दोन तीन स्थळे दाखवली होती. त्यावेळी त्याने त्याच्याकडून पैसे वैगरे काही घेतले नव्हते. त्यामुळे केरबा पाटील आणि छबुताई पाटील याचा त्याचेवर विशवास बसलेला होता. पण प्रकाश याच्या मनात अलिकडे वेगळेच चालले होते. तो छबुताई बरोबर गोड बोलत होता. मुलाचे लग्न अगदी धुमधडाक्यात करायचे असे तो त्यांना सांगत होता.मुली मिळत नसल्या तरी जरा थोडा धीर धरा असे सांगत होता. त्याच्या बोलण्याला छबुताई भुलल्या होत्या. आता आम्ही थकलो रे बाबा.तूच आता आमच्या पोराचं कल्याण कर असे त्या त्याला सांगत होत्या. त्याला ही तेवढेच पाहिजे होते. तो त्यांना अमूक ठिकाणी स्थळ आहे. तिकडे जावूया असे सांगत होता.त्याही तो म्हणेल तसे वागत होत्या. त्या त्याला आपला पाठचा भाऊच मानत होत्या. पण त्याची नजर ही छबुताई यांच्या दागिण्यावर होती. त्याच्या गळ्यातील दागिणे बघून त्याला हेवा वाटत होता. तो असंडोली येथे आपला परंपरागत कुंभार धंदा करीत होता.त्याची वीट भट्टी होती. परंतू गेल्या वर्ष दीड वर्षापासून त्याची ती वीट भट्टी बंद होती. त्यात तो कर्जबाजारी झाला होता.त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याचे कर्ज हे पाच सात लाखाच्या पुढे होते. त्याच्या धंदयाचा विस्कोट झाल्याने त्याला माल तयार करून परत मार्केटला उभा राहण्याइतके ही त्याच्याकडे भांडवल नव्हते त्यातच त्याला खाजगी सावकारांनी ही कर्जाचा तगादा लावलेला होता. त्यामुळे तो सैरभैर झालेला होता. त्याला काय करावे तेच समजत नव्हते या कर्जातून कसे बाहेर पडायचे हा प्रश्न त्याला पडलेला होता. त्याला जगावे की मरावे असे झाले होते. त्यातच त्याची नजर ही छबुताई यांच्या दागिण्यावर पडलेली होती. त्याचे दागिणे घेऊन आपण आपले कर्ज फेडू शकतो याची त्याला खात्री होती. पण सहजासहजी त्या त्याला दागिने देणार नाहीत याची ही प्रकाश कुंभार याला खात्री होती. म्हणून त्याने वेगळाच डाव आखला होता. छबुताई यांच्या अंगावरील दागिने काढून घ्यायचे आणि आपले कर्ज फेडायचे असा त्याने विचार केला होता. गेल्या बारा पंधरा दिवसापूर्वी त्याने छबुताई यांना त्याच्या मुलासाठी स्थळ आहे असे सांगून त्याने त्यांना आपल्या दुचाकी गाडीवर बसविले. त्याही मुलाला मुलगी बघयाचे म्हणून नयून थयून आपल्या गळ्यात आणि अंगावर जास्त सोन्याचे दागिने घालून त्याच्याबरोबर निघाल्या होत्या. तो त्याना घेऊन घोटवडेच्या दिशेने निघाला होता. घोटवडे याच्या पुढल्या गावात याने स्थळ असल्याचे त्यांना त्याने सांगितले होते. मध्येच त्याने गगनबावडा अणुस्कराचा रस्ता बदलून एका डोंगरच्या कडेने असणाऱ्या पायवाटेने त्याने आपली गाडी घातली.त्यावेळी त्याने छबुताई यांना आपण मधल्या मार्गाने गेलो की लगेच गावात जावू असे सांगितले. त्याच्या बोलण्यावर छबुताई यांनी ही विश्वास ठेवला. तो आडमार्गाला आल्यावर त्या जंगलमय परिसरात कुणी नसल्याचे बघून त्याने गाडी थांबवली आणि छबुताई यांना धमकावून अंगावरील सोने काढून दे नाही तर जीवेच मारतो अशी धमकी दिली. तो त्याच्या अंगावर दागिने काढून घेण्यासाठी जात होता. परंतू त्या त्याला विरोध करीत असताना आरडा ओरडा करू लागल्या होत्या. त्यावेळी त्याने आजूबाजूचा अंदाज घेत कुणी नसल्याचे बघून आपल्या दोन्ही हातांनी त्याचा गळा आवळयला सुरूवात केली. त्याच्या ताकदीपुढे त्याची ताकद कमी पडत होती. क्षणार्धात त्यांनी आपले अंग खाली टाकले. त्या जीगीच गतप्राण झाल्या. त्याचा आपल्या हातून मृत्यू झाल्याचे बघून त्याने त्याच्या अंगावरील सगळे चार तोळयाचे सोन्याचे दागिने काढून घेतले आता त्याला त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची होती. तो येताना त्या तयारीनेच आला होता. म्हणून त्याने गाडीच्या डिकीतून एक पोते काढले. त्यामध्ये त्याचा मृतदेह कोंबला आणि त्या पोत्याचे तोंड घट्ट बांधले. ते पोते त्याने आपल्या गाडीला बांधले तोपर्यत संध्याकाळ होत आली होती. परत येताना तो गगनबावडा रस्त्याने येऊन ते पोते त्याने गगनबावडा घाटातील मार्गेवाडी गावच्या हद्दीतील एका झुडपात टाकून देऊन आपण तेथून पोबारा केला.घडलेली घटना त्याने कुणाला काहीच सांगितली नाही. इकडे मुलगी बघायला गेलेल्या छबुताई या घरी रात्री पर्यंत घरी परत आल्या नाहीत म्हणून छबुताई याचे पती केरबा पाटील आणि मुलग्याने प्रकाश कुंभार याच्याशी संपर्क साधला असता त्याने आक्काला साळवणला पाहुण्याच्या घरी सोडल्याचे सांगितले त्या उदया बोरगावला येतील असे सांगितले दुसऱ्या दिवशी ही त्या घराकडे परत आल्या नसल्याने केरबा यांनी परत प्रकाश याच्याशी संपर्क साधला होता. पण तो आता त्यांना काहीच सांगत नव्हता.मी साळवण येथे आक्काला सोडले आहे एवढेच तो सांगत होता. केरबा पाटील आणि त्याच्या मुलाने छबुताई याचा शोध दोन तीन दिवस घेतला पण त्या कुठेच त्यांना मिळून आल्या नाहीत म्हणून केरबा पाटील यांनी आपली पत्नी छबुताई केरबा पाटील या बेपत्ता असल्याची तक्रार पन्हाळा पोलीसात दाखल केली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पोलीसांनी मयत छबुताई याच्या मोबाईल कॉलचे डिटेल्स तपासायला सुरूवात केली होती. घटनेच्या दिवशी प्रकाश कुंभार याचा शेवटचा कॉल त्याच्या मोबाईलवर आलेला दिसत होता. पोलीसांनी संशयावरून रविवार दि. १३ मार्च रोजी त्याला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे या घटनेची पोलीस चौकशी करत असताना तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्यातच गुप्त खबऱ्यांनी ही प्रकाश कुंभार यानेच छबुताई पाटील याची हत्या केल्याची माहिती दिली होती. तो मुळात कर्जबाजारी होता. ही माहिती मिळताच पालीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून छबुताई पाटील याचा खून करून त्याचा मृतदेह मार्गेवाडी गावाच्या हद्दीत टाकल्याची माहिती दिली. हा खून त्याने दागिन्यासाठी केला असल्याची माहिती पोलीसांना दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी घटनास्थळावरून मृतदेह बाहेर काढून पंचनामा करून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद केरबा पाटील यांनी दिल्याने पोलीसांनी छबुताई केरबा पाटील (वय ५८) याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी प्रकाश कुंभार याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला पन्हाळा येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याला २२ मार्च पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी गुन्हयात वापरलेली मोटार सायकल जप्त केली होती. या घटनेचा तपास पोलीस उपाधीक्षक आर.आर.पाटील यांच्या मार्गनर्शनाखाली पो.निरी. फडतरे, स.पो.नी.काशिद, पोलीस उप.निरी.नरेंद्र पाटील, पो.हवा.शहाजी पाटील, तोसिफ मुल्ला आणि अशिष कोळेकर यांनी केला.

## थोडक्यात वृत्तांत

### बाजार समित्यांमधील लूट थांबविण्यासंदर्भात जिल्हा उपनिबंधकांनी बोलावली बैठक

लातूर : बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची वारंवार होणारी लूट थांबविण्यासंदर्भात शेतकरी संघटनेने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून यासंदर्भात जिल्हा उपनिबंधकांनी सोमवार दि.२३मार्च रोजी बैठक बोलावली आहे. लातूरसह जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती व प्रशासकांना या बैठकीस उपस्थित राहण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये अनेक गैरप्रकार होत आहेत.वेगवेगळ्या मार्गांनी शेतकऱ्यांची लूट सुरू आहे. कडता, सॅम्पल, पोटली, पायलीच्या नावाखाली शेतकऱ्यांना लुबाडले जात आहे. याशिवाय एकाही बाजार समितीत कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्याची अमलबजावणी केली जात नाही.यामुळे शेतकरी चोहोबाजूंनी संकटात सापडला आहे. हा प्रश्न निकाली काढावा यासाठी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल घनवट यांनी पणन संचालक तसेच जिल्हाध्यक्ष मदन सोमवंशी यांनीही अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने दिली पण त्याचा उपयोग झाला नाही. यामुळे मदन सोमवंशी यांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयासच टाळे ठोकण्याचा इशारा दिला होता.या इशाऱ्यानंतर मात्र अधिकाऱ्यांना जाग आली आहे.त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांची होणारी लूट थांबविण्यासंदर्भात सोमवार दि.२३ मार्च रोजी जिल्हा उपनिबंधकांनी बैठक बोलावली आहे. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांच्या सभापती व प्रशासकांना या बैठकीस उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.या बैठकीत काहीतरी तोडगा निघेल आणि शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा आशावाद शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मदन सोमवंशी, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके, जेष्ठ नेते, शिवाजी पाटील नदीवाडीकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य माधवराव मल्लेशे, माजी जिल्हाध्यक्ष माधवराव कंदे, हरिश्चंद्र सलगरे, बाबाराव पाटील, कालिदास भंडे, केशव धनाडे, किसनराव शिंदे, अण्णाराव चव्हाण, इब्राहिम शेख, शंकर निला, अपराजित भिंगोले, बालाजी जाधव, किशोर महाराज शिवणीकर, दत्ता गुंजोटे, गुंडेराव उमाटे, वसंत कंद्गुळे, करण भोसले, समाधान क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

### आयसीएआय शाखेतर्फे नारीशक्तीचा सन्मान

लातूर : द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या लातूर शाखेच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात नावलौकिक कमावणाऱ्या नारीशक्तीचा सन्मान करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या चंद्रकला भार्गव, पोलीस उपाधीक्षक प्रिया पाटील,आयएमएच्या अध्यक्षा डॉ.अनुजा कुलकर्णी,रिलायन्स लातूर पॅटर्नच्या संचालिका प्रेरणा होनराव,कौशल्य विकास समन्वयक संगीता मोलवाणे, सुगरणीचे लोणचेच्या संस्थापिका प्रीतम जाधव, आंतरराष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे,राष्ट्रीय जिम्नॅस्टिक आशा झुंजे व सीए प्रणिता राठी यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांनी विविध क्षेत्रात महिलांनी दिलेल्या योगदानाबाबत चर्चा करतानाच महिलांचा टक्का आणखी वाढावा यासाठी सामाजिक पाठबळाची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर शाखेचे नूतन अध्यक्ष सीए विशाल चव्हाण, सूत्रसंचालन विद्यार्थिनी स्वाती पवार व अश्विनी नारायणपूरे तर आभार प्रदर्शन सीए विनोद साळुंके यांनी केले.या कार्यक्रमास संघटनेचे उपाध्यक्ष सीए द्वारकादास भुतडा,संचालक किशोर भराडिया यांच्यासह सचिन शिंदे,संजय अग्रवाल,विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सीए राजेश अग्रवाल यांच्यासह शहरातील सीए विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### तिघा बाईक चोरट्यांचा मुसक्या आवळल्या

भिवंडी : भिवंडी पोलीस परिमंडळ क्षेत्रात वाहन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढत असून नुकताच भिवंडी गुन्हे शाखेने तिघा चोरट्यांचा मुसक्या आवळून त्यांच्या ताब्यातील चोरीच्या तीन महागड्या बाईक जप्त करण्यात यश मिळविले आहे. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांना गुप्त बातमीदारा मार्फत काही युवक बाईक चोरी करून त्या विक्री करीत असल्याची माहिती मिळाली असता त्यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा पथकातील सपोनि महेंद्र जाधव पोउपनि शरद बरकडे, सपोउपनि लतीफ मन्सुरी, पोहवानिता पाटील, मेघना कुंभार, राजेंद्र चौधरी, पोना श्रीधर हुंडेकरी यांनी या टोळीवर पाळत ठेवून सईम सलीम कुवारी वय २२ वर्षे, सुफियान उर्फ गोगा शहा वय २० वर्षे व अल्पवयीन बालक वय १७ वर्षे यांना ताब्यात घेवुन त्यांनी चोरी केलेल्य रॉयल एनफिल्ड बुलेट,केटीएम ड्युक,यामाह एफ झेड अशा एक लाख तीस हजार रुपये किमतीच्या तीन बाईक हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.विशेष म्हणजे या तिन्ही बाईक शहरा बाहेरील कापूरबावडी पो.ठाणे, बाजारपेठ पो.ठाणे कल्याण येथून चोरी केल्याचे समोर आले असून या तिन्ही गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.

### गौरव काथवटे यांचे नगरसेवक पद धोक्यात

लातूर : गौरव जयंतराव काथवटे यांचे खाटीक या जातीचे प्रमाणपत्र योग्य का अयोग्य याची चौकशी सुरु करण्याचे आदेश जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती लातूर यांनी दिनांक १५ मार्च २०२१ रोजी घोषीत केले आहे. ओमप्रकाश चंद्रनाथ आर्य यांनी लातूर येथील जात पडताळणी समिती यांचेकडे गौरव जयंत काथवटे यांचे खाटीक या अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र त्यांनी समितीची दिशाभुल करुन मिळवले आहे व ते खोटे आहे अशी तक्रार दाखल केली. त्यामध्ये ओमप्रकाश आर्य यांनी असे प्रतीपादन केले आहे की, गौरव जयंत काथवटे हे धनगर जातीचे आहेत . त्यांचे वडील जयंत काथवटे व त्यांचे सर्व कुटुंबीयांच्या शाळेच्या व जुन्या नोंदीमध्ये धनगर या जातीचे प्रमाणपत्र असले तरी त्यांनी अद्याप त्याची वैधता जाती दावा पडताळणी समितीकडून करुन घेतलेली नाही. एवढेच नसुन गौरव काथवटे यांच्या वडीलांकडे खाटीक जातीचे वैधता प्रमाणपत्र नसताना गौरव काथवटे यांना खाटीक या जातीचे वैधता प्रमाणपत्र कसे देण्यात आले असे मुद्दे उपस्थीत केले. त्याला उत्तर देताना गौरव काथवटे यांनी ओमप्रकाश यांना तक्रार दाखल करण्याचाच अधिकार नाही असा आक्षेप घेण्याचा प्रयत्न केला परंतू सदरचा गौरव जयंत काथवटे यांचा आक्षेप जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी नामंजूर केला व गौरव जयंत काथवटे यांच्या खाटीक या अनुसुचित जातीची वैधता तपासण्याचे काम सुरु केले आहे. सन २०१२ पासुन ओमप्रकाश चंद्रनाथ आर्य यांनी जयंत काथवटे व त्यांचे कुटुंबिय यांनी खाटीक या अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र लबाडीने व शासनाची दिशाभुल करुन मिळवलेले आहे असा रीतसर तक्रारी दाखल केल्या आहेत.

# जळगावसह मालेगाव लुटीतील रोकड पोलिसांनी केली हस्तगत

**जळगाव/क्राईम रिपोर्टर**

एमआयडीसी पोलिसांनी भरीव कामगिरी केली असून जळगावसह मालेगाव येथील लुटीचा दुहेरी तपास लावला आहे. एका तपासात दोन तपासातील लाखो रुपयांची लुटीतील रक्कम आरोपींकडून हस्तगत करण्यात आली आहे. या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. गेल्या १ मार्च रोजी जळगाव शहरातील पंचमुखी हनुमान मंदीराजवळ गावठी कट्ट्याचा धाक दाखवत १५ लाख रुपयांची दिवसाढवळ्या लुट झाली होती. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा घडल्यानंतर आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वाहन सोडून पळ काढला होता. सदर मोटारसायकल कुणाची आहे याचा शोध लागल्यामुळे तपासाला गती मिळाली होती. गुन्हा घडल्यानंतर प्राथमीक माहिती पोलिस कर्मचारी विजय पाटील यांना समजली होती. त्या अनुशंगाने लागलिलिच घटनास्थळी जाऊन तपासकामी सुरुवात करण्यात आली होती. या गुन्ह्यात खुशाल उर्फ मनोज अशोक मोकळ (२२) रा.दंडेवाले बाबा नगर मोहाडी ता.जि.धुळे व रितीक उर्फ दादु राजेंद्र राजुपत (१९) पवन नगर हुडको ता.जि.धुळे या दोघांना ताब्यात घेण्यात आले होते. या दोघांकडून सुरुवातीला १५ लाख रुपयांपैकी ९ लाख १० हजार रुपये व गावठी कट्टा हस्तगत करण्यात आला होता.



१० मार्च पर्यंत दोघे आरोपी पोलिस कोठडीत असतांना अधिक तपासाअंती खुशाल मनोज मोकळ याच्याकडून पारोळा चौफुली शिरपुर रोड येथुन ३ लाख रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. त्यानंतर पुन्हा आरोपींची पोलिस कोठडी न्यायालयाकडून १५ मार्च पर्यंत वाढवून घेण्यात आली. या वाढीव पोलिस कोठडीच्या कालावधीत ११ मार्च रोजी रितीक उर्फ दादू राजेंद्र राजपूत याच्याकडून मोराणे सुरत रोड धुळे येथुन १ लाख २१ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. अशा प्रकारे जळगाव येथील पंचमुखी हनुमान मंदीर परिसरातील लुटीतील १५ लाख रुपयांपैकी एकुण १३ लाख ३१ हजार रुपये हस्तगत करण्यात पोलिस पथकाला यश आले. चौकशीदरम्यान आरोपींनी मालेगाव तालुका पोलिस स्टेशन हद्दीत केलेला गुन्हा देखील कबुल केला. मालेगाव तालुका पोलिस स्टेशन हद्दीत कपाशीच्या व्यापाऱ्याची लुट करण्यात आली होती. आरोपी खुशाल मोकळ याने मालेगाव तालुका पोलिस स्टेशन हद्दीत केलेल्या या गुन्ह्यातील ५ लाख रुपये त्याच्या पवन नगर चाळीसगाव रोड धुळे येथील घरातून काढून दिले. ते पोलिसांनी तपासकामी जप्त केले. या गुन्ह्यातील त्याचा साथीदार अविनाश सुरेश माने याचे देखील नाव तपासात व चौकशीत पुढे आले. अविनाश सुरेश माने (१९) रा.दगडी चाळ धुळे याने मालेगांव पोलिस स्टेशन हद्दीत केलेल्या गुन्ह्यातील २ लाख ३० हजार रुपये पोलिसांना काढून दिले. अशा प्रकारे मालेगाव हद्दीतील गुन्ह्यातील एकुण ७ लाख ३० हजार रुपयांची रोकड जळगाव एमआयडीसी पोलिसांनी तपासकामी हस्तगत करण्यात यश मिळवले.

जळगावसह मालेगाव येथील गुन्हयातील आजपावेतो लुटीची एकुण रक्कम २० लाख ६१ हजार रुपये हस्तगत केल्याने एमआयडीसी पोलिसांचे पथक कौतुकास पात्र ठरले आहे. या गुन्ह्यातील अविनाश माने यस मालेगाव तालुका पोलिसांच्या ताब्यात दिले जाणार आहे. या गुन्ह्याच्या तपासकामी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस उप निरीक्षक विशाल सोनवणे, उप निरीक्षक रामकृष्ण पाटील, सहायक फौजदार अतुल वंजारी, सहायक फौजदार आनंदसिंग पाटील, पोलिस नाईक सचिन मुंडे, इमरान सैय्यद, मिलींद सोनवणे, सुधीर साळवे, संदीप पाटील, हेमंत कळसकर, सचिन पाटील यांनी तपासकामी झोकून दिल्याने तपासात यश आले. खुशाल मोकळ याच्याविरुद्ध गंगापुर, मुंबई नाका, अंबड, चाळीसगाव रोड पोलिस स्टेशन धुळे, पश्चिम देवपूर पोलिस स्टेशन धुळे, धुळे शहर पोलिस स्टेशन तसेच रितीक राजेंद्र राजपूत याच्याविरुद्ध चाळीसगाव रोड पोलिस स्टेशन धुळे व उपनगर नाशीक पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.

## मतदार यादीत छायाचित्र नसलेल्या, दुबार, मयत व स्थलांतरीत मतदारांची नावे वगळणार

**वसई/प्रतिनिधी**



१३३ वसई विधानसभा मतदार संघामध्ये १ जानेवारी २०२१चे अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीमध्ये एकूण ३,११,७४१ मतदार आहेत. मतदार यादीमध्ये छायाचित्र नसणारे एकूण ७९७६ मतदार आहेत. एकाच व्यक्तीचे नावे दुबार असणारे २१४७ मतदार आहेत. छायाचित्र मतदार यादी शुद्धीकरण करणेकामी या कार्यालयाकडून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ), तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेवून मतदार छायाचित्र गोळा करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सदर मोहिमेमध्ये क्षेत्रीय कर्मचारी यांनी मतदारांच्या घरी भेटी देवून पडताळणी केली असता, मतदारांचे छायाचित्र जमा करणेकामी अल्प प्रतिसाद मिळाला आहे. तसेच काही मतदार स्थलांतरीत व मयत आहेत. याबाबत क्षेत्रीय स्तरावर सामूहिक पंचनामा करून मतदार यादीतून नावे वगळणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, ज्या मतदारांचे मतदार यादीमध्ये छायाचित्र नाही अशा मतदारांनी आपले रंगीत छायाचित्र संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ), तलाठी यांच्याकडे जमा करावे अन्यथा छायाचित्र नसणारे व दुबार, मयत, स्थलांतरीत मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात येईल. याकामी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन १३३ वसई विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी स्वप्निल तांगडे यांनी केले आहे.

## हुंड्यासाठी दबाव टाकणे आत्महत्येला प्रवृत्त करणे नव्हे - अलाहाबाद उच्च न्यायालय

**मुंबई/प्रतिनिधी**



पुरावा असेल तरच आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा आरोप सिद्ध होऊ शकतो आणि हुंड्यासाठी दबाव आणणे आत्महत्येला प्रवृत्त करणे नव्हे असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे. आत्महत्या प्रकरणी सुरु असलेल्या सुनावणीदरम्यान अलाहाबाद उच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयाने भा.द.वि. ३०६ नुसार दाखल करण्यात आलेले आरोपपत्र रद्द करुन हुंडा छळप्रकरणी खटल्याचे कामकाज चालवण्याचे आदेश मुख्य कार्यकारी दंडाधिकारी मेरठ यांना दिले आहेत. मेरठ येथील आनंद सिंह यांच्यासह इतरांच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्या. पंकज भाटीया यांच्या एकल खंडपीठाने हा आदेश दिला आहे. आनंद सिंह व त्यांच्या परिवारातील सदस्यांविरुद्ध मेरठ येथील प्रतापपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आनंद सिंह यांच्यावर आरोप करण्यात आला आहे की त्यांनी पीडीतेसह तिच्या परिवारावर लग्न करण्यासाठी दबाव आणत भरमसाठ रकमेची मागणी केली. लग्नाच्या काही दिवस अगोदर पिडीतेने स्वत:ला पेटवून घेतले. उपचारादरम्यान तिचे दिल्ली येथील सफदरगंज रुग्णालयात निधन झाले. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे की हुंड्यासाठी दबाव आणणे आत्महत्येला प्रवृत्त करणे होत नाही.

## ‘दांडी यात्रा’ ऑनलाईन चित्रप्रदर्शनास प्रतिसाद

जळगाव/प्रतिनिधी

गांधी रिसर्च फाउंडेशनच्यावतीने वेबसाईटवर ऑनलाईन ‘दांडीयात्रा’ व्हर्च्युअल चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील चित्रप्रदर्शनास ५ हजाराच्या जवळपास जगभरातील व्हिजिटर्सनी भेट देऊन आपल्या प्रतिक्रिया देखील नोंदविल्या आहेत. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील सर्वात मोठे आणि दीर्घकालीन जनता आंदोलन म्हणजे दांडी यात्राख्र होय. १२ मार्च ते ५ एप्रिल १९३० पर्यंतच्या या यात्रेदरम्यान महात्मा गांधीजींना भारतातील ११ नद्यांना पार करावे लागले. ६ एप्रिल १९३० रोजी गांधीजींनी दांडी येथे समुद्र किनारी मूठभर मिठ उचलून हा कायदा मोडला. गांधीजींनी ९१ वर्षापूर्वी ७८ लोकांनी मिळून केलेले हे आंदोलन, सत्याग्रह देखील जगातील दहा मोठ्या सत्याग्रहांमध्ये गणले जाते. यंदा दांडी यात्रा शतकी वर्षाकडे वाटचाल करीत आहे या निमित्ताने जळगावच्या गांधी रिसर्च फाउंडेशनच्या वतीने दांडीयात्रेचे ऑनलाईन चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. इंग्रज शासनाला हादरवणाऱ्या दांडी यात्रा, सत्याग्रहाच्या ऐतिहासिक घटनेला अनुभवण्यासाठी https://www.gandhifoundation.net/HDM/ या लिंकवर अवश्य भेट देऊन चित्रप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे. चित्रप्रदर्शन ६ एप्रिल २०२१ पर्यंत राहिल.

## सोलापूर शहर महिला पोलीस अंमलदाराची आत्महत्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापुरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले महिला पोलीस अंमलदाराने विष प्राशन करुन बुधवारी दुपारीआत्महत्या केली आहे. अमृता रमेश पांगरे वय ३८ रा. बाळे सोलापूर असे महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव आहे. सोलापूर शहर आयुक्तालयातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात ही महिला पोलिस अंमलदार कर्मचारी कार्य़रत होती. याच पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने व्हॉट्सपवर मॅसेज करुन जवळीक साधण्याचा प्रयत्न करत मानसिक त्रास दिला आणि त्यामुळेच महिलेने आत्महत्या केल्याचा आरोप मृत महिला कर्मचाऱ्याच्या पतीने केला आहे. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात कार्य़रत असणाऱ्या वरिष्ठ



पोलीस अधिकाऱ्याने हा मानसिक त्रास दिल्याचा आरोप मृत महिलेच्या पतीने केला आहे. या घटनेबाबत पोलिसात अद्याप कोणतीही तक्रार नोंद केलेली नाही. सोलापूर शहरपासून जवळ असलेल्या एका गावाजवळ महिलेने विष प्राशन केलं होतं. महिलेच्या नातेवाईकाने बेशुद्धावस्थेत तिला खासगी रुग्णालयात दाखल केलं. मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. दरम्यान, मृत महिला पोलीस अंमलदार (कर्मचारी) आणि एक वरिष्ठ पोलीस अधिकारी या दोघांमध्ये काही चॅटिंग झालं होतं. याच चॅटिंगवरुन महिलेच्या घरात वाद निर्माण झाले होते. मात्र हे चॅटिंग नेमकं काय होतं?, महिलेने आत्महत्या कशामुळे केली? हे प्राथमिक तपासात पुढे आलेलं नाही. महिलेचे नातेवाईक सध्या दु:खात असल्याने अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मात्र या घटनेचा सविस्तर तपास करुन जर कोणी दोषी असेल तर त्याच्याविरोधात कठोर कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडूकर यांनी दिली. दरम्यान, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यावर गंभीर आरोप करत महिला पोलीस अंमलदाराने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्याने सोलापूर पोलीस दलात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सखोल चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई होणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## मनपा नगरसेवक इम्रान सय्यद यांनी २० हजार रुपयांचे पॉकेट केले परत!



**लातूर/ प्रतिनिधी**

शहरातील दयानंद रयतू बाजारात मनपा लातूर चे नगरसेवक इम्रान सय्यद व शकील वलांडीकर यांना पैशाचे एक पॉकेट रस्त्यावर पडलेले आढळले. त्या पॉकेटमध्ये रोख २० हजार रुपये, आधार कार्ड, गाडी लायसन, गाडी नोंदणी पत्र होते. आधार नंबर वरून संबंधितांचा मोबाईल नंबर शोधण्यात यश मिळाले. त्यांचेसोबत मोबाईल वर संपर्क साधून त्यांचे हरविलेले पॉकेट घरी जाऊन परत देत माणुसकिचे दर्शन घडविले. मुलीच्या लग्नाच्या खरेदीला जाताना खिशातून ते पॉकेट खाली पडले असे समजले. इम्रान सय्यद व शकील वलांडीकर यांच्या या कृती बद्दल एम. आय. डी. सी. पोलिस स्टेशन चे निरीक्षक संजिवन मिरकले यांनी इम्रान सय्यद यांचे कौतूक करून सत्कार केला. यावेळी बाळासाहेब बावणे, डॉ पवन लड्डा, श्रीकांत ठोंबरे, अभिजित देशमुख, सौ. सुनीता ककनवाडी, जयंत भालेराव, गंगाधर पवार यांनी इम्रान सय्यद व शकील वलांडीकर यांचे कौतूक केले आहे.


### साप्ताहिक ‘क्राईम संध्या’च्या मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन फॉर्म नं.४ (नियम ८ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| १) **प्रकाशन स्थळ** | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| २) **प्रकाशन काळ** | : | साप्ताहिक |
| ३) **मुद्रकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| ४) **प्रकाशनकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |
| ५) **संपादकाचे नाव** | : | श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे |
| भारताचे नागरीक आहेत काय? | : | होय. |
| पत्ता | : | साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. |

मी, धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**दिनांक : २२ मार्च २०२१**

**धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे**
**प्रकाशक**

22 TO 28 MARCH 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:54 PM Page 1



# महाराष्ट्रात भाजपाचे काऊंटडाऊन सुरू!

मुंबई महानगर पालिका जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एकापाठोपाठ एक असे धक्के बसत आहेत. सांगली पाठोपाठ भाजपने जळगावची सत्ताही गमावली आहे आणि पुढचा नंबर धुळ्याचा आहे असे बोलले जात आहे, कदाचित ते खरेही ठरेल. कारण सध्या देशभर भाजपची जबरदस्त पिछेहाट सुरू आहे आणि त्याला कारण आहे शेतकऱ्यांचा रोष! भारत हा कृषी संवर्धन देश असून अन्नदाता शेतकऱ्यांची संख्या ६३ टक्के आहे. असे असताना मोदींनी मनमानी करून बहुमताच्या जोरावर शेतकरी विरोधी कायदा आणला आणि त्याचे ग्रामीण भागात तीव्र पडसाद उमटत आहे. ग्रामीण भागातील जमीन भाजपच्या पायाखालून निसटत आहे. शेतकरी आंदोलन चिरडून टाकण्याचे जेवढे प्रयत्न केले, तेवढे अपयशी ठरले आणि ग्रामीण भागात भाजपच्या विरोधात प्रचंड जनप्रक्षोभ उसळू लागलंय. सांगली-जळगाव महापालिका भाजपच्या हातून निसटून जाणे हे त्याचेच उदाहरण आहे. काँग्रेस राष्ट्रवादीतील काही फुटिरांच्या जोरावर भाजपने पश्चिम महाराष्ट्रात पाय रोवण्याचा प्रयत्न केला. त्यात सुरवातीला त्यांना काही प्रमाणात यश आले. पण फोडाफोडीचे राजकारणातून मिळालेले यश फार काळ टिकत नाही. भाजपच्या बाबतीत तेच झालंय. सांगलीत भाजपचे जे सरदार होते ते फुटीर असल्याने त्यांच्या भरोश्यावर भाजपला फार काळ तग धरता आला नाही आणि शेवटी सांगलीतील सत्ता गेली. तर जळगाव मध्ये एकनाथ खडसे यांच्या सारख्या मास लिडरला भाजपने प्रत्येक गोष्टीत डावलले. शेवटी नाईलाजाने ते राष्ट्रवादीत गेले आणि त्यानंतर भाजपचा हा बालेकिल्ला हळू हळू ढासळत गेला. अखेर काल जळगाव महापालिका भाजपची कट्टर विरोधक असलेल्या शिवसेनेच्या हाती गेली. भाजपसाठी हा फार मोठा धक्का आहे. ज्या गिरीश महाजन यांच्या जीवावर फडणवीस आणि त्यांचे चेले उड्या मारीत होते त्या महाजनांना त्यांच्याच भाजप नगरसेवकांनी त्यांची जागा दाखवून दिली. त्यामुळे जे सांगली आणि जळगावमध्ये घडले. तेच पुढे धुळे आणि औरंगाबाद मध्ये घडणार आहे. त्यामुळे भविष्यात औरंगाबाद, धुळे, कल्याण डोंबिवली आणि वसई विरार आदी महापालिकांच्या निवडणुकीत भाजपचे काही खरे नाही. असे असताना भाजपने मुंबई महानगर पालिकेची निवडणूक जिंकण्याची स्वप्ने बघू नयेत. तर महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात आपली का पिछेहाट होतेय याबाबत आत्मपरीक्षण करावे. महाराष्ट्रातील भाजपची सत्ता गेल्यापासून भाजप नेत्यांनी महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास संपादन करण्याऐवजी महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतली. सुशांत सिंह राजपूत आणि कंगना प्रकरणात भाजप नेत्यांनी महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतली. मुंबई पोलिसांची सतत बदनामी केली. तसेच सध्याच्या सचिन वाझे प्रकरणात सुद्धा मुंबई पोलिसांची बदनामी करण्यात आली. या सगळ्या गोष्टींचा मुंबईच्या जनतेला खूप राग आहे. केवळ मुंबईकरांनाच नाही, तर महाराष्ट्रातील जनतेलाही खूप राग आहे आणि हाच राग लोक निवडणुकीतून व्यक्त करीत आहेत. भाजपच्या लोकप्रतिनिधींनीही आता लोकांमध्ये जावून आपला जनाधार टिकवणे कठीण जात आहे. म्हणून ते भाजप सोडून दुसऱ्या पक्षात जात आहेत. जळगाव मधील भाजप नगरसेवकांनी शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला. त्यामुळे जळगावमध्ये भाजपने सत्ता गमावली. आता जळगावची पुनरावृत्ती इतर महापालिकांच्या निवडणुकीत होण्याची श्यक्याता आहे. त्यामुळे या पिछेहाटीतून भाजपने धडा घ्यावा. २०१४च्या निवडणुकी दरम्यान मोदींनी ज्या पद्धतीने लोकांना काँग्रेसच्या विरोधात उभे केले. तेंव्हा लोकांना खरेच वाटले होते की मोदी म्हणतात त्या प्रमाणे आपल्याला अच्छे दिन येतील. पण तसे काही झाले नाही. उलट गेल्या सहा वर्षात मोदींच्या कारकीर्दीत लोकांना अनेक संकटाना सामोरे जावे लागले. लोकांना ज्या गोष्टीची आवश्यकता होती ती गोष्ट मिळत नव्हती. पण लोकांनी ज्या गोष्टी कधी सरकारकडे मागितल्याच नव्हत्या त्या मात्र जबरदस्तीने लोकांच्या माथी मारल्या जात आहेत आणि ही सगळ करताना लोकांना अजिबात विश्वासात घेतले जात नाही आणि याच गोष्टीची लोकांना भयंकर चीड आहे. कारण लोकशाहीत अशी मनमानी चालत नाही. पण मोदींच्या काळात लोकांना जे काही बघायला मिळाले ते लोकशाहीत बसणारे नव्हते आणि म्हणूनच आज अनेक राज्यात मोदी आणि भाजपच्या विरुद्ध असंतोष आहे. ग्राम पंचायतीच्या निवडणुकीत हाच असंतोष बघायला मिळाला. तसेच मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानात हाच असंतोष दिसून आला आणि आता पश्चिम बंगालच्या विधान सभा निवडणुकीत हेच बघायला मिळणार आहे आणि हीच भाजपची पिछेहाट नजीकच्या काळात देशाला धर्म आणि जातीयवादाच्या कोंडमाऱ्यातून मोकळा श्वास घेण्याची संधी मिळवून देणार आहे. लोकांना जाती धर्म किंवा रूढी परंपरा यात अजिबात इंटरेस्ट नाही. पण लोकांना ज्यात इंटरेस्ट नाही. त्यात भाजपला इंटरेस्ट आहे आणि त्यांचा हाच इंटरेस्ट त्यांच्या घसरणीला कारणीभूत ठरणार आहे. महाराष्ट्रात सध्या भाजपची जी नकारात्मक प्रतिमा निर्माण झाली आहे ती सुधारण्यासाठी इथल्या भाजप नेत्यांकडून फारसे प्रयत्न केले जात नसल्याने भाजपचा जनाधार कमी होतोय आणि जनाधार कमी होत असल्याने भाजपचे जे लोकप्रतिनिधी आहेत ते अस्वस्थ झालेले आहेत आणि अशाच अस्वस्थ आणि नाराज असलेल्या भाजपच्या लोकप्रतिनिधींवर महा विकास आघाडीचे नेते जाळे टाकीत आहेत. या जाळ्यात जळगाव महापालिकेतील भाजपचे २७ नगरसेवक अडकले. त्यामुळे जळगाव मधील भाजपची सत्ता गेली. सांगलीमध्ये सुद्धा असेच झाले. त्यामुळे आपले नगरसेवक, आमदार, खासदार खरोखरच पक्षात समाधानी आहेत का? याचा भाजप नेतृत्वाने आढावा घेण्याची आवश्यकता आहे. जर ते समधनिवणास्तील तर ते नेमके पक्ष नेतृत्वावर का नाराज आहेत त्यांना पक्ष नेतृत्वाकडून काय अपेक्षा आहेत हे समजून घेणे गरजेचे आहे. जर त्यांच्या मनातली नाराजी दूर झाली, तरच ते पक्षासाठी सक्षमपणे काम करतील पक्षाचा कमी होत चाललेला जनाधार वडवण्यासाठी प्रयत्न करतील अन्यथा निदान महाराष्ट्रात तरी भाजपचे काही खरे नाही.

# विरोधी पक्षांच्या भक्कम वज्रमुठीची आवश्यकता



देशातील सध्याची राजकीय परिस्थिती खूपच चिंताजनक बनली असून हीच परिस्थिती कायम राहिली तर या देशात सामान्य माणसाला जगायला नको. म्हणूनच जर केंद्रातील एनडीए सरकारच्या मनमानीला लगाम लावायचा असेल तर यादेशतील सर्व घटकांना बरोबर घेऊन चालणाऱ्या यूपीएची आवश्यकता देशाला आवश्यकता आहे. पण आज यूपीएकडे सक्षम नेतृत्व ही नाही आणि यूपीए मधील घटक पक्षांमध्ये एकवाक्यता सुद्धा राहिलेली नाही. यूपीएचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने तर देशातील जनतेचा विश्वास गमावला आहे. अशावेळी आज यूपीए आघाडीला जर सर्वसमावेशक आणि विश्वसनीय नेतृत्व लाभले, तर निश्चितपणे यूपीए पुन्हा सतेत येऊ शकेल. पण त्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी मनापासून एकत्र येण्याची गरज आहे. आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विरोधी पक्षांनी एकत्रितपणे रस्त्यावरचे आंदोलन छेडले असते, तर केंद्रातील भाजप आघाडीची हालत खराब झाली असती. पण दुर्दैवाने तसे होवू शकले नाही. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केवळ शेतकरी आंदोलनाला पाठींबा दिला आहे. पण आप आपल्या पक्षाची ताकद या आंदोलनात वापरली नाही. त्यामुळे तीन चार महिन्यांच्या चिकाटी नंतर सुद्धा शेतकरी आंदोलनाच्या समोर सरकार झुकायला तयार नाही. हे चित्र लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक आहे. लोकशाहीत एखाद्या पक्षाचे बहुमताचे जरी सरकार असले, तरी विरोधी पक्ष जर सक्षम असेल तर सरकारला गुढगे टेकायला लावू शकतो. पण संसदेत असो किंवा वेगवेगळ्या राज्यांच्या विधिमंडळात असो कुठेही विरोधी पक्ष सक्षम किंवा आक्रमक दिसला नाही आणि त्याचाच फायदा भाजपला होताना दिसत आहे. पण याचा अर्थ असा नाही की मोदींच्या मनमनिसमोर सगळ्यांनीच मना झुकवलेल्या आहेत. मोदींच्या विरोधात असलेल्या लोकांचा आवाज बनून काही पक्षांनी भाजपला उघड आव्हान देत काही राज्यांमध्ये पराभूत सुधा केले. केंद्रात भाजपची सत्ता असतानाही केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत दोन वेळा भाजपचा दारुण पराभव केला. मोदी शाह यांच्यासारखे दिग्गज परचारत उतरून सुद्धा भाजपला १० जागाही जिंकता आल्या नाहीत याचा अर्थ देशाच्या काही भागात मोदी आणि भाजपला लोकांचा कडवा विरोध आहे. मात्र हा विरोध प्रत्येक राज्यात मतांमध्ये परिवर्तीत व्हायला हवा. आणि हे काम अर्थातच विरोधी पक्षातील दिग्गज नेत्यांचे आहे. त्यांनी याबाबत आपली जबाबदारी ओळखून पुढाकार घ्यायला हवा. सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, ममता बॅनर्जी, प्रकाश आंबेडकर, नवीन पटनायक मायावती, डॉ.फारुख अब्दुल्ला, लालू यादव यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांसह, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे, स्टॅलिन, तेजस्वी यादव, हार्दिक पटेल असे तरुण नेतेही भाजपचे विरोधक म्हणून ओळखले जातात आणि हे सर्व एकत्र आले, तर या देशात नव्याने यूपीए आघाडीला बळ मिळेल आणि भाजपच्या विरोधात जो देशवासीयांच्या आवाज आहे तो अधिक बुलंद होईल. आज त्याचीच या देशाला गरज आहे. कारण हा देश धर्मनिरपेक्ष आहे आणि धर्मनिरपेक्ष लोकशाही शासन व्यवस्थेत प्रत्येक जाती धर्माच्या लोकांना आपण या देशात सुरक्षित आहोत. याबाबत विश्वास वाटायला हवा. बहुमतातील सरकारनेही लोकांचे ऐकायला हवे. जनतेच्या दैनंदिनी जीवनाशी संबंधित असलेले कुठलेही निर्णय सरकारने एकतर्फी आणि मनमानी पद्धतीने घेता नयेत. यूपीएच्या शासन काळात मनमोहन सिंह यांच्या सारखे अत्यंत हुशार आणि अर्थतज्ज्ञ असलेले पंतप्रधान होते तरीही देशातील जनतेला विश्वासात घेतल्या शिवाय त्यांनी कोणताही मोठा निर्णय घेतला नाही. पण आज मात्र नोट बंदी असो किंवा शेतकरी विरोधी कायदा असो प्रत्येक गोष्टीत मनमानी केली जात आहे आणि याच मनमानीमुळे देशातील जनता अस्वस्थ आहे. अल्पसंख्यांक समाजात भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे हे जर बदलायचे असेल तर यूपीएचे पुनर्गठन होणे आवश्यक आहे. कारण देशाला धर्मनिरपेक्ष विचार सरणीच वाचवू शकते.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# झोप, लक्झरी प्रोडक्ट बनलंय...!

**१३ मार्च हा जागतिक झोप दिवस नुकताच साजरा झाला. लवकर झोपून, लवकर उठण्याची सवय कधीच मागे पडली आहे. याउलट रात्री उशिरा झोपून आपापल्या कामांच्या वेळेनुसार उठण्याचा पायंडा पडला आहे. यामुळे आपली झोप अपूर्ण राहत आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार प्रत्येकाने रोज किमान साडेसात तासांची झोप घेणं गरजेचं आहे. मात्र संशोधन अभ्यासानुसार भारतात सरासरी ६ तास २० मिनिटे झोप घेतली जाते. या अपूर्ण झोपेमुळे माणसाचं शारिरीक आणि मानसिक स्वास्थ बिघडत आहे.**

वेळी-अवेळी झोपणं, कमी वेळ झोपणं किंवा जास्त वेळ झोपणं अशा चुकीच्या झोपेच्या पद्धतींना अनहायजिनिक स्लीप पॅटर्नस् असं म्हणतात. ही आज संपूर्ण जगाची समस्या बनली आहे. हायजिनीक झोप आज बाजारातले प्रोडक्ट बनले आहे. चांगल्या झोपेबाबत लोकांना समजावे यासाठी स्पीप फाऊंडेशन्सची स्थापना झाली आहे. तसेच झोपेचे महत्त्व पटवून देण्यासाठी, हायजिन स्पीपची जनजागृती करण्यासाठी १३ मार्च हा दिवस जागतिक झोप दिवस त्यामुळे स्लीप हायजिनिक असणं गरजेचं आहे. या समस्येबद्दल जनजागृतीसाठी २००८ सालापासून १३ मार्च या दिवसाला जागतिक झोप दिन म्हणून वाहिला गेला आहे.

पृथ्वीवर जन्मणाऱ्या प्रत्येक सजीवामध्ये नैसर्गिकरीत्या झोपण्याची प्रक्रिया होत असते. बदललेल्या जीवनशैलीमुळे गेल्या काही वर्षात मात्र वेगवेगळ्या कारणांनी मनुष्याची झोप उडालीय. मेट्रो शहरांमध्ये कोणी लवकर झोपून लवकर उठत असेल तर आपल्याला जुनाट वाटते किंवा आश्चर्य व्यक्त केले जाते. खरेतर येथे झोपायला रात्रीचे १२ किंवा १ वाजणे हे आता सामान्य झाले आहे. दुसऱ्या दिवशी शाळा, महाविद्यालय, कार्यालय असल्यामुळे वेळेत उठावेच लागते यामुळे झोप अपूर्ण राहते. रात्री पुरेशी झोप घेणे म्हणजे वेळ वाया घालवणे, अशी अमेरिकेसह अनेक देशांमधील तरुणांची मान्यता आहे. तर काहीतरी बनण्यासाठी किंवा ध्येयपूर्तीसाठी झोपेचा त्याग करावाच लागतो, अशीही धारणा तयार झाली आहे. यावरुन 'बर्निग अ मिडनाईट ऑईल' 'स्लिपलेसनेस इज रेसिपी ऑफ सक्सेस' अशा म्हणीही इंग्रजीत प्रसिद्ध आहेत. तसेच स्वत;ला फन, कूल आणि मॉडर्न दाखवण्यासाठीही थ्री एम, फोर एम म्हणत रात्रभर जागून अपूर्ण झोप घेतली जाते. जणूकाही अपूर्ण झोप घेण्याचा ट्रेंड आला आहे.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालातील माहितीनुसार, जगभरातील तरुणांच्या झोपेचा काळ हा ६.८ तास इतका आहे. सर्वात कमी वेळ झोपणारे तरुण जपानमधील आहेत. येथील तरुण केवळ ५ तास ५९ मिनिटे झोप घेतात. तर सौदी अरेबीयामधील तरुण ६ तास ८ मिनिटे झोप घेतात. स्विडन तिसऱ्या क्रमांकावर असून येथे तरुण ६ तास १० मिनिटे इतकी झोप घेतात. चौथ्या क्रमांकावर असणाऱ्या भारत देशातील तरुणांचे ६ तास २० मिनिटे एवढे झोप घेण्याचे प्रमाण आहे. ही झोप अपुरी आहे. तज्ज्ञांच्यामते तरुणांनी किमान साडेसात तासांची झोप पूर्ण करणे गरजेचे आहे. यादरम्यान व्यक्ती ९० मिनिटांच्या झोपची पाच चक्रे पूर्ण करते. झोपेच्या या चक्रांमध्ये आपला मेंदू, शारिरीक अवयव, हृदय आदींना आराम मिळतो. तर चक्रांच्या दुसऱ्या टप्प्यात व्यक्तीने दिवसभरात गोळा केलेल्या माहितीवर प्रक्रिया करण्याचे काम केले जाते. अपुऱ्या झोपेमुळे या प्रक्रिया पूर्ण होत नाही. यामुळे आपले डोके दुखी, पित्त, विसरणे इत्यादी होत असते.

अमेरिकन सेंटर ऑफ डिसिज कंट्रोल म्हणते की रोजची साडेसात तासांची झोप सकाळी उशिरा उठून किंवा दुपारी झोपून किंवा सुट्टीच्या दिवशी दिवसभर झोपून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तरी शारिरीक आणि मानसिक नुकसान पूर्णपणे




थांबवता येणार नाही. यावर वर्ल्ड स्लीप फाऊंडेशन म्हणते की रात्री आठ वाजता झोपणे योग्य आहे. आयुर्वेदात सांगितलेल्या दिनचर्येप्रमाणे रात्री ९ वाजता ब्रह्म मुहर्ताच्यावेळी अर्थात पहाटे ४ वाजता उठले पाहिजे. मात्र सध्याच्या स्थितीत सर्वांना पहाटे ४ वाजता उठणे कठीण आहे. जगभरात झालेल्या रिसर्चनुसार, उशिरा झोपण्यामुळे अतिताण, औदासिन्य येते. उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदय आणि रक्तवाहिन्यासंबधी विकार निर्माण होतात. तसेच कमी झोप ही कर्करोगाला आमंत्रण देणाऱ्या कारणांपैकी एक आहे. अपूर्ण झोप महिलांमध्ये स्तन कर्करोगाला तर पुरुषांमध्ये पुर:स्थ कर्करोगाला बढावा देते. सतत अपुरी झोप झाल्यास जीनशैली आजार अर्थात लाईफस्टाईल डिसिजेस होतात. यात लठ्ठपणा, शरीराला सूज येणं, मायग्रेन, अतिताण, बद्धकोष्ठता, डिप्रेशन, शॉर्ट किंवा लाँग टर्म मेमरी लॉस, हार्मोनल चेंजेस जसे की पीसीओडी, पीसीओएस, थायरॉईड, मुड स्विंग इत्यादी आजार होण्याची शक्यता असते. हे आजार फक्त महिलांना होत नाही तर पुरुषांनाही होतात. हाँगकाँग विद्यापीठातील संशोधन अभ्यासानुसार अपूर्ण झोपमुळे माणसातील डिएनएना हानी पोहोचते. अगदी एका दिवसाची अपूर्ण झोपदेखील डिएनएचे नुकसान करू शकतात. यामुळे कर्करोग होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. साऊथ कोरिया आणि जपान या दोन देशांमधील नागरिक सर्वात कमी झोपतात. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये उदासीनता, अतीताणाची समस्या जाणवत असल्यामुळे येथे आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. या आत्महत्या अपूर्ण झोपेमुळे मृत्यू होत असल्याचे मृत्यू अहवालात लिहिले जाते, त्यास कारोशी असे म्हणतात.

किंग्ज कॉलेज ऑफ लंडनने केलेल्या संशोधन अभ्यासानुसार अपूर्ण झोपेमुळे व्यक्ती जास्त खाऊ लागतात.

## झोप लागण्यासाठी काही सोप्पे उपाय

१. झोपण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करा. म्हणजे, अंथरुण व्यवस्थित करावे, टीव्ही-मोबाईल आणि इतर गॅजेट्स बंद ठेवावे, दिवे घालवून डिम बल्ब लावावा, झोप येत नसेल तरी डोळे बंद करून श्वासोच्छश्वासावर लक्ष केंद्रीत करावे किंवा मंत्रोच्चारण करावे यामुळे आपोआप झोप येऊ शखते.

२. जेवल्यावर वज्रासनात बसावे किंवा शतपावली करावी.

३. रोज सकाळी किंवा वेळ मिळाल्यावर किमान अर्धा तास व्यायाम करावा.

४. तिळाच्या तेलात भीमसेनी कापूर घालून ठेवावे आणि झोपण्यापूर्वी हे तेल हाता-पायांच्या तळव्यांना चोळावे.

५. झोपण्यापूर्वी दुधात जायफळ मिसळून प्यावे.

६. सायंकाळी उशिरा चहा, कॉफी, कोल्डड्रिंक्स किंवा इतर कोणत्याही स्वरुपातील कॅफ्रेन ग्रहण करू नये.

७. कोणत्याच उपायांमुळे झोप लागत नसेल तर, शरिरात मॅग्नेशिअमची कमतरता आहे का हे तपासून पाहावे. असल्यास शेंगदाणे, गव्हाचा कुंडा, बदाम, काजू, हिरव्या पालेभाज्या इत्यादींचे सेवन करावे. अन्यथा डॉक्टरांकडून औषध घ्यावे

साधारणपणे दिवसाला अपूर्ण झोप झालेली व्यक्ती ३८५ किलो कॅलरी एवढ्या अन्नाचे अधिक सेवन करते, अर्थात साडेचार स्लाईस ब्रेडचे अधिक सेवन करते. यामुळेच लठ्ठपणाची समस्याही वाढत आहे. पेनेसिल्वेनिया स्टेट विद्यापीठाने सर्वेक्षण संशोधनामार्फत केलेल्या अभ्यासानुसार, अपूर्ण झोप झालेल्या व्यक्तींना सारखी भूक लागते तसेच अति स्निग्ध पदार्थ खाल्ल्यावर अथवा जेवल्यावरही पोट भरल्यासारखे वाटत नाही. याचे कारण, आपल्या शरीरात लेप्टीन आणि ग्रेलिन असे दोन हार्मोन्स असतात. हे आहाराचे नियमन करतात. भूक लागल्यावर खाण्यासाठी ग्रेलिन मेंदूला सूचना करते तर, खाल्ल्यानंतर लेप्टीन पोट भरल्याची सूचना मेंदूला देते. मात्र अपूर्ण झोप घेणाऱ्या व्यक्तींमध्ये ग्रेलिन हार्मोन्सची वाढ होते आणि लेप्टीन हार्मोन्सची सक्रियता मंदावते. यामुळे अन्नाचे सेवन वाढते आणि लठ्ठपणा वाढण्यास मदत होते.

अपूर्ण झोपेमुळे उत्पादनशक्ती किंवा क्रियाशीलता कमी होते. तसेच चिडचीड वाढते, अस्थिरता येते, एकाग्रता कमी होते यामुळे कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. रँक ऑपरेशनच्या अभ्यासाप्रमाणे, अपूर्ण झोपेमुळे मागील वर्षाचे युनायटेड स्टेट्सचे १२ लाख कामाचे दिवस वाया गेले. तर जपानचे ६ लाख कामाचे दिवस वाया गेले आणि १३८ बिलियन डॉलर्स खर्च झाले. युनायटेड किंगडम आणि जर्मनीचे २ लाख दिवस वाया गेले असून ५० बिलियन डॉलर्सचा चुरडा झाला. ही आकडेवारी देशांच्या जीडीपीवरही परिणाम करते. याकडे भारताने गांभीर्याने पाहिले पाहिजे. कारण, भारतात उशिरापर्यंत काम करणे, घरी उशिरा जाणे आणि उशिरा झोपणे याला प्रोफेशनलिझम मानले जाते. यामुळे झोप कमी होते. याचा शरीरावर आणि मानसिक स्वास्थावर होणारा परिणाम येत्या काळात ठळकपणे दिसून येईल.

आपली झोप पूर्ण झाली तर आपले मानसिक आणि शारिरीक स्वास्थ चांगले राहते. स्मरणशक्ती चांगली राहते, समस्या सोडविण्याचे कौशल्य वाढते, ताण तणावांपासून मुक्ती मिळते, रोग प्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते, शरिरातील सेल्स- टीश्यूची निगा राखली जाते, स्व: दुरुस्ती प्रणाली चांगल्याप्रकारे सक्रिय राहते. अपूर्ण झोपेचा किंवा उशिरापर्यंत जागे राहण्याचा फायदा बाजारातील अनेक कंपन्या करून घेत आहेत. रात्री झोपण्यापूर्वी आपल्याला टीव्ही, मोबाईल पाहण्याची सवय लागली आहे. या स्क्रिन्स नील प्रकाश उत्सर्जित करतात. या शरिरातील कॉर्टिसोल उत्पादनाचे प्रमाण वाढवतात. यामुळे झोप लवकर येत नाही. तसेच त्वचेवर याचा वाईट परिणाम होतो. अशावेळी झोप यावी म्हणून नागरिक बाजारातील उत्पादनांकडे ओढले जातात. चांगली झोप येण्याचा दावा अनेक कंपन्यांची उत्पादने किंवा ब्रँड्स करतात. बाजारात आय ड्रॉप्स, लोशन, कँडल, तेल, स्प्रे, चादर, उशी, आय मास्क आहेत. तसेच पेड आणि नॉन पेड ॲप्सही आहेत जे झोपेचा रेकॉर्ड ठेवतात, हेल्थी स्लीपबद्दल सांगतात, झोप लागण्यासाठी संगीत वाजवतात. खरेतर झोपल्यावर १० ते १५ मिनिटांमध्ये झोप लागली पाहिजे. मात्र अनेकांना झोप येत नाही, याचा अर्थ त्यांना कमी वेळ झोपण्याची सवय लागली आहे. याचाच फायदा कंपन्या घेत आहेत, त्यामुळे आज झोप हे एक लक्झरी प्रोडक्ट बनले आहे. कारण झोप विकणारा तंत्रज्ञान बाजार १०.९ बिलियन डॉलर्सचा झाला आहे. यापैकी ४८.५ टक्के निद्रानाश आजाराशी निगडीत आहे. येत्या ५ वर्षामध्ये हा बाजार १६.६ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांद्वारे दर्शवण्यात आली आहे. स्लीप ॲप वापरकर्त्यांमध्ये महिलांचा संख्या ५० टक्के असल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये जीवनशैली आजारांचे प्रमाण अधिक आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

22 TO 28 MARCH 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:33 PM Page 1



# भिवंडी परिसरात गुन्हेगारीत वाढ; पोलीस प्रशासन हतबल

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी पोलीस उपायुक्त कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात चोरी, हाणामाऱ्या, लुटपाटच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ होत असताना पोलीस हतबल झाल्याचे पाहावयास मिळत असून गुन्हेगारांवर पोलिसांचा वाचक आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वाढत्या गुन्हेगारी बाबत घाटंनांचा आढावा घेणे गरजेचे बनले असून आशी गुन्हेगारी थांबावणे आणि पोलिसांना सहकार्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी एका दिवसात किती घटना, कशा पद्धतीने घडतात त्याच कारण काय हे जाणून घेणे गरजेचे आहे त्यासाठीच गुन्ह्याच्या घटनांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये भिवंडी शहरातील पद्मानगर इथं राहणारे भरत सोनीचा हे घरात नसताना त्यांची आई घरात एकटी असल्याचा फायदा घेऊन दोघा चोरट्यांनी घरात प्रवेश करून तुमच्या मुलाचा मित्र असल्याची बतावणी करून घरातील कपाट तोडून कपाटातील पतपेढीचे कलेक्शनची ९१ हजाराची रोख रक्कम चोरून नेली याची माहिती भरत यांना समजल्यावर त्यांनी




अज्ञात दोघां चोरट्यावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्याच प्रमाणे पद्मानगर इथं राहणाऱ्या नंदिनी ठाकर ह्या महिला घराला कुलूप लावून बाहेर गेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात कोणी नसताना लोखंडी कपाट तोडून घरातील सव्वालाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भिवंडी शहरातील फातमानगर येथील भांडणातून पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याच्या रागातून रेहम तुल्ला अन्सारी ह्या तरुणाला विटा फेकून मारून बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्या प्रकरणी सदरे, शाहबाज, लाडले, सिराज या चौघाच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर याच फातमानगर इथं कोंबडीच्या आणलेल्या पिल्लावरून एका गर्भवती महिलेच्या पोटात लाथा बुक्क्याने मारहाण केल्याने त्या महिलेचा गर्भपात झाला आहे.

या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात तीन महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या महिलांचा शोध सुरु आहे त्याच प्रमाणे खाडीपार परिसरात इमारती खाली लावलेली दुचाकी पाडल्याचा जाब विचारणाऱ्या वृद्ध इसम शब्बीर मोमीन यांना लोखंडी पाईप, लाकडी दांड्याने बेदम मारहाण करून जखमी करणाऱ्या मुजाहीद्दीन निसार, तैमूर शेख, निसार शेख, वसीम शेख या चौघांवर निजामपुरा पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच तालुक्यातील कशेळी इथं उसने दिलेले पैसे परत मागितल्याने फिरोज बोरा यांना स्टीलच्या रॉड मारून गंभीर जखमी केल्या प्रकरणी इकबाल बस्तीवाला आणि इम्रान बस्तीवाला या दोघांच्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर जखमीवर उपचार सुरु असून काल्हेर येथील ललिता यादव या महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असताना ललिता ह्या महिलेचा माहेरून पैसे आणण्यासाठी छळ होत असल्याने तीने आत्महत्या केली असल्याचा ठपका ठेवून पती शैलेशकुमार यादव याच्यावर नारपोली पोलीस गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले आहे. आशा पद्धतीने रोजच गुन्हेगारीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून आता ठाणे पोलीस आयुक्तांनी लक्ष घालून घाटनांना आळा घालावा अशी जोर धरतं आहे.

# लातूर जिल्हा परीषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी**

अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी एका तरूणीला शरीर सुखाची मागणी केल्याच्या आरोपावरून लातूर जिल्हा परीषदेचे समाजकल्याण अधिकारी सुनिल खमितकर यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करणयात आल्याची माहीती शिवाजी नगर पोलिसांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की लातूरच्या एमआयडीसी परिसरात जीवन विकास प्रतिष्ठान संचलीत एक मतीमंद विद्यालय चालते. या विद्यालयात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याचे ५/०७/२००७ रोजी निधन झाले. २०१७ पासून वडिलच्या ठिकाणी अनुकंपावर आपणास विशेष शिक्षीका म्हणून नियुक्त करावे, असा अर्ज २०१७ पासून संबधीत तरूणीने केला होता. संस्थेत रिक्त जागा आसतानाही तिच्या अर्जचा विचार केला नाही. तिच्या विनंती अर्जाची दखलच घेतली गेली नाही. ही तरूणी वेळोवेळी शासन, प्रशासनाकडे न्याय मागत होती. दरम्यान २२ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ६.४५ वाजता जिल्हा परिषद इमारतीती समाजकल्याण अधिकारी सुनील नागेश खमीतकर यांनी लातूर येथील जीवन विकास प्रतिष्ठान अंतर्गत चालणाऱ्या मतीमंद विद्यालय, एमआयडीसी लातूर या संस्थेत विशेष शिक्षीका म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी या तरूणीला 'तू या कामासाठी पैसे देऊ शकत नाहीस, मला तुझ्या घरातील आर्थिक परिस्थितीची जाणीव आहे. मात्र, याला एक पर्याय म्हणून 'तू पूर्ण एक दिवस व एक रात्र माझ्यासाठी दे' अशी मागणी केली. अशी मागणी करणाऱ्या वासनांध अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी, त्याची चौकशी करावी, अशी मागणी करणारे निवेदन त्या तरूणीने २ मार्च २०२१ रोजी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सविस्तर स्वरूपात पाठविले होते. पोलिसांनी या अर्जची दखल घेत शिवाजी नगर पोलिस ठाण्यात समाजकल्याण अधिकारी यांच्यावर विनयभंग व ॲट्रोसिट कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास डीवायएसपी जितेंद्र जगदाळे करीत आहेत.लातूर जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या समाजकल्याण विभागात कार्यरत समाजकल्याण अधिकारी सुनील नागेश खमीतकर हे सतत वादग्रस्त ठरत आले आहेत. ते यापुर्वी वाशीम, नांदेड येथे कार्यरत होते. वाशीम येथे कार्यरत असताना त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात आल्याचेही सांगण्यात येते.

### एलसीबी सोलापूर ग्रामीणची कामगिरी

# माळशिरस तालुक्यातील येळीव येथील जबरीचोरीचा गुन्हा उघडकीस



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील येळीव येथे ३५ हजाराच्या मुद्देमालासह गुन्हयातील मोटार सायकल व मोबाईलसह ०२ आरोपीना जेरबंद करण्यात आले. १७/०९/२०२० रोजी यातील फिर्यादी मुकेश राम गवरी (वय २७ वर्षे, धंदा जे.सी.बी ऑपरेटर, रा. मेल आधरहारा ता. कटिया जि. गोपालगंज राज्य बिहार) सध्या वाडी नं. २ येळीव ता. माळशिरस जि. सोलापूर हा व त्याचा मित्र तिलक मानांमा महातो रा. सदर असे दोघे पुणे पंढरपूर रोडवरील मौजे येळीव ता. माळशिरस येथील किराणा दुकानातून माल आणण्यासाठी जात असताना, समोरून स्प्लेंडर मोटार सायकलवर ०३ अनोळखी इसम येवून दोघांना आडवून त्यांना चाकूने व दगडाने मारहाण करून जखमी केले व यातील फिर्यादीचा मित्र तिलक महातो याचा विवो कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला म्हणून अज्ञात व्यक्तींविरूध्द माळशिरस पोलीस ठाणे गुरंन ५१४/२०२० भा.द.वि.का.क ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणणेकामी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते मॅडम, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी एक पथक तयार करून त्यांना गुन्हा उघडकीस आणण्याकामी सुचना दिल्या. त्याप्रमाणे सदरचे पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर भागातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या गुन्हयांची पध्दत व त्यांच्या गुन्हयाच्या दिवशी च्या हालचालीं बाबत माहिती काढली असता, त्यांना सदर घटनेच्या दिवशी काही संशयीत इसमांच्या हालचाली घटनेच्या ठिकाणी दिसून आल्या. त्यावरून सपोनि रविंद्र मांजरे व त्यांचे पथक माळशिरस भागात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना सदर गुन्हयातील दोन संशयित इसम हे माळशिरस येथील उमाजी नाईक पुतळयासमोर मोटार सायकलवर येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या बातमीप्रमाणे संजय साहेबराव नरोटे, वय २६ वर्ष रा. मांडवे ता. माळशिरस जि. सोलापूर आणि महेश शहाजी भोपते, वय २० वर्ष रा. उमाजी नाईक पुतळयासमोर ता. माळशिरस जि. सोलापूर या दोघा संशयीत इसम थोडया वेळाने तेथे आल्यानंतर त्यास ताब्यात घेवून त्यांचेकडे व्यवसायिक कौशल्यपूर्ण तपास केला असता, त्यापैकी एका संशयीत इसमाकडे विचारपूस करता तो सतत उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला, त्याने सांगितलेल्या माहितीमध्ये व घटनाक्रम मध्ये विसंगती दिसून आल्याने, त्याचा अधिक संशय बळावला. तेंव्हा त्यास अधिक विश्वासात घेवून विचारपूस करता त्याने सांगितले की, मी स्वतः व माझे इतर दोन साथिदार यांनी मिळून हिरोहोंडा कंपनीची स्प्लेन्डर मोटार सायकलवर येवून दोन इसमांना आडवून त्यांना चाकूने व दगडाने मारहाण करून जखमी केले व त्यातील एका इसमाचा मोबाईल जबरदस्तीने काढून घेतल्याचे सांगून गुन्हयाची कबूली दिली. सदर गुन्हयात वापरलेली मोटार सायकल व जबरदस्तीने घेतलेला विवो कंपनीचा मोबाईल त्यांचे कब्जात मिळून आले. सदर आरोपीस पुढील कारवाईकरीता माळशिरस पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सर्जराव पाटील यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे, सफौ.खाजा मुजावर, पोलीस अंमलदार बिराजी पारेकर, धनाजी गाडे, श्रीकांत गायकवाड, सलिम बागवान, बापू शिदे, लालसिंग राठोड, अक्षय दळवी, अजय वाघमारे, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

# आ.देवेंद्र भुयारांच्या पुढाकाराने चिमुकलीला मिळाले जीवदान

**वरुड/प्रतिनिधी**

मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार वरुड मोर्शी तालुक्यातील रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, आमदार देवेंद्र भुयार यांनी ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदत करत आहे. त्यांनी आदिवासी व ग्रामीण भागांत राहणाऱ्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा पुरवविण्याचे काम करीत आहे.

जन्मतःच हृदयाला छिद्र व श्वसन नलिकेवर मांस आल्याने दीड वर्षाच्या देवांशी वागद्रेला श्वास घ्यायला त्रास व्हायचा. वय कमी असल्याकारणाने देवांशीची शस्त्रक्रिया शक्य नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान देवांशि वागद्रे जशी जशी मोठी होत होती तसा तिला श्वास घायला त्रास व्हायचा, चालतांना व खेळतांना सुद्धा दम भरून यायचा. आपल्या चिमुकलीला होणाऱ्या त्रासामुळे वागद्रे कुटुंब चिंतेत होते. देवांशीचे वडील शिवाजीराव वागद्रे यांनी पंचायत समितीचे माजी सभापती निलेश मगर्दे यांना



भेटून सर्व माहिती दिली. माजी सभापती निलेश मगर्दे यांनी आमदार भुयार यांना देवांशीच्या शस्त्रक्रिये बाबत माहिती दिली असता आमदार देवेंद्र भुयार यांनी पुढाकार घेऊन क्षणाचाही विलंब न करता देवांशी वागद्रेला मुंबई येथे नेऊन एस.आर. सि. सी. हॉस्पिटलमध्ये मोफत ओपन हार्ट सर्जरी करण्यात आली. रुग्णसेवा करून वरुड मोर्शी तालुक्यातील शेकडो रुग्णांसाठी आमदार देवेंद्र भुयार देवदूत ठरत आहे. तालुक्यातील वाठोडा येथिल वागद्रे कुटुंबातील दीड वर्षाच्या देवांशी या चिमुकलीच्या हृदयात छिद्र व श्वसन नलिकेवर मांस आल्याचे निदान झाल्यानन्तर शस्त्रक्रिये करीता ६ ते ८ लक्ष रुपये खर्च येणार असल्याचे कळताच साधारण परिस्थिती असलेल्या वागद्रे कुटुंबावर आभाळच कोसळले. देवांशीच्या आरोग्याची काळजी असलेल्या वागद्रे कुटुंबियांनी माजी सभापती नीलेश मगर्दे यांना मदत मागितली असता त्यांनी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र भुयार यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर आमदार देवेंद्र भुयार यांनी क्षणाचाही विलंब न करता देवांशीच्या शस्त्रक्रिया करण्याकरिता देवांशिला तात्काळ मुंबई येथे ओपन हार्ट सर्जरी करिता ऍडमिट करून शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. शस्त्रक्रियेनन्तर देवांशीची प्रकृतीत सुधारणा दिसून येत आहे. आमदार देवेंद्र भुयार व माजी सभापती निलेश मगर्दे यांच्या पुढाकाराने गरीब कुटुंबातील चिमुकलीचे जीवन सुकर झाल्याने वागद्रे कुटुंबियांनी आमदार देवेंद्र भुयार, माजी सभापती निलेश मगर्दे यांचे आभार व्यक्त केले.

# युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**भिवंडी/आकाश गायकवाड**



तालुक्यातील वडपे गावातील एका तरुणाने राहत्या घरातील छताच्या लाकडी कडीला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे. आत्महत्येचे कारण समजू शकलेले नसले तरी त्याने प्रेमसंबंध अथवा आर्थिक व्यवहारातून आत्महत्या केली असावी का? या दृष्टीने पोलिसांकडून तपास सुरू असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. त्याने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते.जितेश बळीराम तारे (२१ रा. वडपे) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नांव आहे.तो सकाळी बँकेत गेला होता. त्यानंतर त्याने आरटीओ कॅम्पमध्ये ड्रायविंग लायसंसाठी चाचणी देऊन घरी आला व घरातील बेडरूमच्या दरवाजाची कडी लावून लाकडी कडीला गळफास घेऊन आत्महत्या केली. उशिरापर्यंत जितेशने दरवाजाची कडी उघडून तो बाहेर आला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी बेडरूमचा दरवाजा ठोठावण्याचा प्रयत्न केला. मात्र आतून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दरवाजा तोडून पाहिले असता जितेश याचा मृतदेह साडीने गळफास घेतल्याचे दिसून आले. या आत्महत्येची माहिती तात्काळ तालुका पोलिसांना देण्यात आली असता पोलीस उपनिरीक्षक श्रेयन राठोड यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेऊन मृतदेहाचा पंचनामा केला. पुढील करवाईसाठी मृतदेह स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवून मृतदेहाच्या शवविच्छेदनानंतर आत्महत्येची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू केला आहे.

## जाहीर लिलाव

तमाम जनतेस कळविण्यात येते की, कौटुंबिक न्यायालय, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा पुर्व यांचे आदेशानुसार व मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेमार्फत प्राप्त महसूल वसुली प्रमाणपत्रानुसार श्री. मोहम्मद शकील अख्तर रा. फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३, एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु, सेक्टर नं. ७ ता. वसई, जि. पालघर यांचेकडून वसुल करावयाच्या रकमेसाठी खालील तपशीलातील जप्त केलेली स्थावर मालमत्ता जशी आहे तशी तपशीलात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २४/०३/२०२१ रोजी सकाळी /दुपारी १२.०० ते २.०० या सुमारास मौजे माणिकपूर, ता. वसई येथे विषयांकित मिळकतीवर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**

| नाव | भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| एव्हरशाईन सिटी, माणिकपूर वसई (पुर्व) | सिटी. स.नं. ४३६/१९ फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३ एव्हरशाईन जास्मिन को.हौ.सो. एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु, सेक्टर नं. ७ वसई (पुर्व) | ४९.४ चौ.मी. | - |

<u>लिलावाच्या अटी व शर्ती :</u>

१) सह दुय्यम निबंधक वसई क्र. यांनी निश्चित केलेली बाजारमुल्याची रक्कम रुपये ३०,२८,२२० ही रक्कम अपसेट किंमत म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

२) उपरोक्त तक्त्यात नमूद मालमत्तेच्या जाहीर लिलावासाठी र. रू.३०,२८,२२०/- (अक्षरी रुपये तीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे विस रूपये मात्र) पासून बोलीस सुरूवात होईल व जाहीर लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांपैकी सर्वात उच्चतम बोली बोलणाऱ्यास सदर लिलाव अंतिम करण्यात येईल.

३) अंतिम लिलाव बोलीच्या २५ टक्के रक्कम त्वरीत भरावी लागेल व उर्वरित रक्कम सात दिवसांचे आत भरावी लागेल. २५ टक्के रक्कम सरकार जमा करतेवेळी आयकर विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४) स्विकारलेल्या बोलीदाराने संपूर्ण बोलीची रक्कम भरल्यानंतर खरेदीखत करून देण्यात येईल. त्यासाठी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. अनुषंगाने येणारा खर्च बोली स्विकारलेल्याने करावयाचा आहे व त्यावेळी सरकारची सर्व थकबाकी बोलीदाराने देणेची आहे.

५) मालमत्तेबाबत वा त्या अनुषंगाने काही अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास ती कार्यालयीन वेळेत तलाठी सजा माणिकपूर व तहसिलदार कार्यालय वसई येथे संपर्क साधून मिळवीता येईल.

६) मालमत्तेवरील जमीन महसूल, बिनशेती आकार व इतर देणी खरेदीदाराने अदा करावयाची आहेत.

७) लिलावात अंतिम बोली बोलणाऱ्याने लिलाव प्रक्रियेचा सर्व खर्च अदा करणे बंधनकारक आहे.

८) लिलावात अपेक्षित बोली न आल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव लिलाव रद्द/तहकूब करण्याचा संपूर्ण अधिकार/ हक्क निम्नस्वाक्षरीदारांचा राहील.

ठिकाण : वसई
दिनांक : २२/०३/२०२१

**सही/-**
**तहसिलदार, वसई**

# भिवंडीत कारवाई करीत जप्त केलेली तब्बल २०४ वाहने वाहन मालकांनी घेऊन जाण्याचे वाहतूक शाखेचे आवाहन

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहर वाहतुक विभाग वतीने सन २०१६ ते २०२० या कालावधीत केलेल्या विशेष कारवाई दरम्यान एकूण १४४ रिक्षा व ६० मोटार सायकल अशी वाहने ताब्यात घेण्यात आली आहेत. त्यापैकी २५ मोटार सायकल व ५३ रिक्षा या बेवारस असून ३५ मोटार सायकल व ९१ रिक्षांवर जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. वरील सर्व वाहने ही भिवंडी शहरातील भोईवाडा पोलीस ठाणे हद्दीतील कारीवली गाव येथील शासकीय जागेत सुरक्षित ठेवण्यात आली होती. परंतु वाहने पावसात भिजुन कुजुन खराब झाली असुन त्यातुन दुर्गधी येत असल्याने त्या बाबत परिसरात राहणाऱ्या नागरीकांनी तक्रारी केलेल्या आहेत. नमुद वाहनांचा लिलाव करून त्यांची विल्हेवाट करणे बाबत वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त यांनी आदेश झाले आहेत. या वाहनांपैकी वाहतुक उप विभाग भिवंडी येथे उपलब्ध असलेल्या वाहनापैकी १२९ रिक्षांचे मालक व ४१ मोटार सायकलच्या मालकांची माहीती आर.टी.ओ. ठाणे यांचेकडे पत्र व्यवहार करून फॉर्म कमांक २२४ नुसार माहीती प्राप्त करण्यात आली आहे. या वाहन मालकांच्या निवास स्थानाचे पत्ते शोधून त्या ठिकाणावर वाहन मालकांना नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. भिवंडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे की, वरील जप्त व बेवारस रिक्षा व मोटार सायकल हया आपल्या मालकीच्या असल्यास, त्यांची चोरी झाली असल्यास, अगर त्या हरविल्या असल्यास वाहनांच्या मालकी हक्काची आवश्यक ती कागदपत्र घेवुन वाहतुक उप विभाग भिवंडी या कार्यालयात समक्ष येवुन संपर्क साधावा. अन्यथा वरील जप्त व बेवारस वाहनांच्या मालकी हक्काबाबत कोणीही पुढे आले. नाही तर वरील सर्व जप्त व बेवारस वाहनांचा शासकीय लिलाव करण्यात येईल अशी माहिती राजेंद्र मायने यांनी दिली आहे.



साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com
9890718873
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, सांगली आणि नवी मुंबई, पनवेल येथील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा...

22 TO 28 MARCH 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:55 PM Page 1



## पान १ वरून....

### पोलीस दलात नोकरीचे आमिष...

माध्यमातून तिची अनेकांसोबत ओळख निर्माण झाली. या ऑनलाईन व्यवसायाच्या माध्यमातून तिची ओळख किरण महादेव शिंदे या तरुणासोबत देखील झाली. शिर्डी येथील शिवाजीनगर भागातील साईनिवास येथे रहात असल्याचे त्याने तिला चॅटींग करतांना सांगीतले. आपण पोलिस असल्याचे त्याने तिला खोटे सांगितले. शिर्डी पोलिस स्टेशनला आपण नेमणूकीला असल्याचे किरण शिंदे या थापाड्याने तिला सांगितले व तिला देखील ते खरे वाटले. पोलिस या शब्दाचे ग्लॅमर विवाहीत गुड्डीच्या अवतीभोवती फिरु लागले. पोलिसाचा या दुनियेत एक वेगळाच रुबाब असतो असे ती मनाशी म्हणू लागली. पोलिसासोबत आपली ओळख झाल्याचे समजून ती वेगळ्याच दुनियेत वावरु लागली. मला देखील पोलिस व्हायचे आहे असे ती त्याला चॅटींग करतांना सांगू लागली. आता हे पाखरु आपल्या जाळ्यात फसणार असे तो मनातल्या मनात म्हणू लागला. चॅटींग दरम्यान इकडच्या तिकडच्या गप्पा करतांना मला पोलिस होण्यासाठी मदत करा असे ती त्याला म्हणू लागली. मग हळूच त्याने तिच्यापुढे प्रेमाचा आणि लग्नाचा प्रस्ताव ठेवला. त्यावर तिने त्याला म्हटले की मी अगोदरच विवाहीत आहे. आपण मला पोलिस होण्याकामी मदत करा. आतापर्यंत तिच्याशी चॅटींग करणारा नकली पोलिस किरण शिंदे तिला प्रत्यक्षात भेटू लागला. दरम्यानच्या काळात सर्वत्र लॉकडाऊन सुरु झाले. या लॉकडाऊन काळात तिच्या वडीलांचे निधन झाले. त्यामुळे माहेरी कसे जायचे? हा तिच्यापुढे प्रश्न होता. याकामी त्याने तिला मदत करण्यास सुरुवात केली. किरण शिंदे नावाचा पोलिस माझा परिचीत असून तो मला माहेरी जाण्यास मदत करत असल्याचे तिने पतीला सांगितले. तिच्या पतीने देखील तिला माहेरी जाण्याकामी आडकाठी आणली नाही. भंडारा जिल्ह्यातील गावात तिचे माहेर होते. या गावी तो स्वत: तिला घेऊन गेला. आपण पोलिस आहोत, आपल्याला कुणी अडवणार नाही असे म्हणत तिच्याशी लाडीगोडी लावत तो तिला अहमदनगर येथून खासगी ट्रॅव्हल्स बसने तिच्या माहेरी घेवून गेला. रात्रीचा प्रवास त्यात खिडकीतून येणारा गार वारा अशा वातावरणात तो तिच्या अगदी जवळ जावून लाडीक संभाषण करु लागला. तो तिला म्हणाला की तुझ्या पतीपेक्षा अधिकचे सुख मी तुला देईन. तु मला आवडतेस. मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे. मी तुझ्या मुलाचा सांभाळ करेन. आपल्यासोबत असलेला किरण शिंदे हा पोलिस असल्यामुळे तो आपले सर्व प्रकारे रक्षण करण्यास सक्षम असल्याचे गुड्डी मनातल्या मनात समजत होती. तिच्या वडीलांच्या निधनानंतर इतर आर्थिक प्रश्न मार्गी लावण्याकामी तोतया पोलिस किरण शिंदे याने गुड्डीला मदत केली. या कालावधीत तो तिच्या अधिक संपर्कात आला. या संपर्कातून त्याने तिच्यासोबत सर्व प्रकारचे संबंध प्रस्थापित केले. मला पुणे येथे बदली करुन घ्यायची आहे असे सांगत तो तिला तिच्या माहेरुन परस्पर पुणे येथे घेवून आला. पुणे येथील एका अपार्टमेंटमधे त्याने तिची राहण्याची व्यवस्था केली. या कालावधीत त्याने तिच्यासोबत सर्व प्रकारचे संबंध अव्याहतपणे प्रस्थापित केले होते. या कालावधीत आपल्या पत्नीला किरण शिंदे या गावाहून त्या गावाला घेवून फिरत असल्याचे गुड्डीच्या पतीच्या लक्षात आले. त्याने त्याला फोन करुन संगितले की तु माझ्या पत्नीला परत शिर्डी येथे पाठवून दे, तु कशासाठी आमचा सुरु असलेला सुखाचा संसार मोडण्याचा प्रयत्न करत आहेस. मी तुझ्या विरुद्ध पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. गुड्डीच्या पतीचे असे बोलणे ऐकून तो मनातून घाबरला. रुमवर परत आल्यावर गुड्डीने त्याला विचारले की तुमचा पोलिस युनिफॉर्म कुठे आहे? त्यावर नकली ओळखपत्र दाखवत तो तिला म्हणाला की मला युनिफॉर्मची आवश्यकता नाही. मी कार्यालयीन कामकाज बघतो. खोटेनाटे बोलून बतावणी करत तो तिला या गावाहून त्या गावाला घेवून फिरवत होता. दरम्यान तिला पतीपेक्षा किरण शिंदे जवळचा वाटत होता. त्यामुळे तिने तिच्या पतीकडे घटस्फोटाची मागणी केली. या कालावधीत तिच्या पतीने वारंवार किरण शिंदे यास फोन करुन हैरान करुन सोडले होते. त्यामुळे त्याने तिला म्हटले की आपले मोबाईलचे सिमकार्ड बंद करुन टाकू. आपल्याला पुणे सोडावे लागेल. नाहीतर पोलिस आपल्याला पकडतील. तुझ्या पतीने माझ्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर त्याने तिला नागपुरला आणले. त्याने तिला नागपूरला एक भाड्याचे घर मिळवून दिले. त्याच्या अशा बोलण्यामुळे, वागण्यामुळे व पोलिसाचा युनीफॉर्म नसल्यामुळे तिला त्याची शंका येवू लागली. तिने त्याला थेट प्रश्न केला की तु पोलिस नाही, तु खोटे बोलत आहेस. तिच्या थेट आरोपामुळे तो मनातून हादरला. आता तो तिला आता म्हणू लागला की माझी बदली भंडारा येथे होणार आहे. तो कधी पुणे येथे बदली होणार असल्याचे तर कधी भंडारा येथे बदली होणार असल्याचे तिला सांगत होता. त्याच्याकडे खाकी युनीफॉर्म नसल्यामुळे देखील तिला त्याची शंका येत होती. इतके दिवस पोलिस दलाच्या नोकरीत सुटी कशी काय मिळू शकते? असे एक ना अनेक प्रश्न तिच्या मनाला भेडसावत होते. आता तर तो तिला शिवीगाळ व धमकी देत होता. आपली फसगत होत असल्याची तिला शंका येऊ लागली. यापेक्षा आपला पती चांगला होता असे तिला मनातल्या मनात वाटू लागले. पतीसोबत फोनवर बोलणे टाळणारी, त्याच्याशी घटस्फोटाची भाषा करणारी गुड्डी आता स्वत;हून पतीला फोन करु लागली. माझ्या जिवाला किरणपासून धोका आहे. तुम्ही मला घ्यायला या असे ती पतीसोबत फोनवर बोलू लागली. गुड्डी आपल्या पश्चात पतीसोबत बोलत असल्याचे किरणच्या लक्षात आले. त्याने पुन्हा राहण्याची जागा बदलण्याचे मनाशी ठरवले. यावेळी त्याने मोहाडी तालुक्यातील खापा येथे भाड्याची खोली घेतली. याठिकाणी त्याने तिची राहण्याची व्यवस्था केली. मला भंडारा येथे बदली करायची आहे, त्यासाठी मी डीजी कार्यालयात मुंबई येथे जावून येतो असे म्हणत त्याने तेथून आपली सुटका करुन घेतली. त्याच्या गैरहजेरीत तिने शिर्डी पोलिस स्टेशनला संपर्क साधला. किरण शिंदे नावाचा कुणी पोलिस कर्मचारी शिर्डी पोलिस स्टेशनला नेमणूकीस आहे का? अशी तिने विचारणा केली. आमच्याकडे किरण शिंदे नावाचा कुणी कर्मचारी नेमणूकीला नाही असे तिला उत्तर मिळाले. आजपर्यंत पोलिस असल्याची बतावणी करत आपला उपभोग घेणारा किरण शिंदे हा नकली पोलिस असल्याचे तिच्या लक्षात आले. किरण शिंदे नकली पोलिस असल्याचे समजताच तिच्या पायाखालची वाळू सरकली. तिच्या मनात खळबळ माजली. आपला पतीच चांगला होता याची पुन्हा एकवेळा तिला जाणीव झाली. या फसव्या जगात वाट चुकल्याची तिला जाणीव झाली. बदलीसाठी डी.जी. कार्यालयात गेला असल्याची बतावणी करणाऱ्या किरण शिंदेच्य गैरहजेरीत ती तिच्या पतीकडे गेली. तिने पतीला सर्व हकीकत कथन केली. ३ मार्च रोजी तिने पतीसह राहता पोलिस स्टेशन गाठले. पो.नि. सुभाष भोये यांची भेट घेत तिने आपली कथा आणी व्यथा त्यांच्याजवळ कथन केली. पो.नि. सुभाष भोये यांनी देखील तिची दर्दभरी दास्तान व्यवस्थीत ऐकून घेतली. तिच्या फिर्यादीनुसार किरण महादेव शिंदे याच्याविरुद्ध राहता पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ४४/२१ भा.द.वि.३७६, ४१९, ४२०, १७०, १७१, ३२३ नुसार दाखल करण्यात आला. पो.नि.सुभाष भोये यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.प्रशांत कंडारे, उपनिरीक्षक संतोष पगारे, हेड कॉंस्टेबल सुरेश गागरे, बाबासाहेब सांगळे, पोलीस नाईक दिपक उर्फ राजू कदम, सुनील मालनकर, किरण'माळी यांच्या पथकाने तपासाला सुरुवात केली. पिडीत व फिर्यादी गुड्डीला तोतया पोलिस व आरोपी किरण शिंदे याला फोन करण्यास व त्याच्याशी लाडीक शब्दात बोलण्यास सांगण्यात आले. त्याच्याशी बोलण्यात गुंग राहण्यास व त्याला बस स्थानकावर बोलावून घेण्यास तिला सांगण्यात आले. ती देखील पोलिस पथकाच्या सांगण्यानुसार त्याच्याशी बोलण्यात मग्न झाली व त्याला राहता बस स्थानकावर येण्यास सांगीतले. तो राहता बस स्थानकावर बस मधून उतरु लागताच पोलिस पथकाने त्याच्यावर झडप घातली. त्याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडी सुनावली. सध्या तोतया पोलिस व आरोपी किरण महादेव शिंदे सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

### पतीने रखेलींना जमीन देण्याची तयारी...

टाकली. गर्दीला सारून ते थोडे पुढे गेले पुढे गेले. तेंव्हा त्याना एक भयानक प्रकार दिसला. याकतपूर जाणाऱ्या रस्त्यावपासून काही अंतरावर एक ४५ वर्षीय पुरुष जातीचा इसम रक्ताच्या उताना पडल्याचे दिसल. त्याच्या उजव्या पायाचा पंजा रक्ताने माखलेला होता. बहूतेक तो इसम मृत पावलेला होता. सपोनि बाळासाहेब छोंगरे यांनी घटनेची प्राथमिक माहीती घेवून औसा पोलिस ठाण्याला आणी वरिष्ठांना खबर केली. घटनेची माहिती मिळताच याकतपूर गावचे बिट जमादार आणी औसा पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळाकडे धावले अंगात पिवळसर फुल भायाचा शर्ट आणि काळसर फिकट रंगाची पॅन्ट परिधान केलेला अनोळखी इसम उताना पडला होता. त्याच्या बाजूलाच डोक्यापासुन काही अंतरावर भगव्या रंगाचे टॉवेल पडले होते. त्याचा कमरेला पिवळसर रंगाचा पट्टा बांधलेला होता. तसेच त्याच्या उजव्या पायाचा अंगठा रक्ताने माखलेला दिसत होता. दरम्यान औसा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरसिंह ठाकूर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची प्राथमिक माहीती घेवून पोलिस कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना केल्या. दरम्यान याकतपूर शिवारात एका अनओळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याची वार्ता औसा शहरात वाऱ्यासरखी पसरली. दरम्यान काही वेळात औसा शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले देखील घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन पंचनामा करण्याच्या सुचना दिल्या. सर्वप्रथम पोलिसांनी मयताचे ओळख पटवण्यासाठी मयताच्या अंगाची झडती घेतली मात्र ओळख पटावी असा कुठलाच पुरावा पोलिसांना सापडला नाही. मयताच्या गळ्याभोवती काळसर रंगाचे दोन वर्ण दिसत होते त्यावरून पोलिसांनी हा घातपात असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला. पोलिसांनी घटनास्थळ परीसर पिंजून काढण्यास सुरूवात केली. मृतदेहापासून थोड्याच अंतरावर वाळलेल्या गवतात पोलिसांना एक मोबाईल पोलिसांना सापडला. साहायक पोलिस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे यांनी तो मोबईल हास्तगत करत सापडलेल्या मोबाईलवर आलेल्या शेवटच्या कॉलवर संर्पक करून हा मोबाईल क्रमांक कोणाचा आहे अशी विचारणा समोरच्या व्यक्तीकडे केली. तेंव्हा हा मोबईल क्रमांक औसा तालुक्यातील चलबुर्गा गावचा श्रीमेत शेषेराव आळणे यांचया आसल्याची माहीती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत चलबुर्गा गावच्या पोलिस पाटलानां आणी पोलिस मित्रांना सर्पक करून श्रीमंत आळणे यांच्या नातेवाईकांना संर्पक करीत घटनास्थळी बोलावून घेतले. दरम्यान घटनास्थळी आलेल्या एका तरूणांने मयत इसम हा आपला मामा असून त्यांचे नाव श्रीमंत शंषेराव आळणे आसल्याची माहीती पोलिसांना दिली. अशा प्रकारे मयत व्यक्तीची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले. घटनास्थावरील परस्थित पहात मयताला दुसरीकडे कुठेतरी मारून येथे आणून टाकले आसाव असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला होता. तसेच या घटनेत दोनपेक्षा अधिक मारेकरी आसण्याचेही शक्यता र्वविली होती. दरम्यान काही तसातच मयत पत्नी आणी मयताचे नातेवाईक घटनास्थी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा आटोपून प्रेत उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. दरम्यान औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरसिंह ठाकूर, एपीआय बाळासाहेब डोंगरे यांनी मयताच्या नातेवाईकांना विश्वासात घेत मयत श्रीमंत आळणे यांचे कोणासोबत भांडण आथवा दुश्मानी होती का याची माहीती जाणून घेतली. मात्र मयत श्रीमंत आळणे याचे कोणासोबत भांडण आथवा दुश्मानी नसल्याची माहीती समोर आली. दरम्यान एवढी वाईट घटना घडूनही मयताची पत्नी आथवा मयताचे नातेवाईक कुठलाच विलाप करत नसल्याचे पोलिसांच्या नजरेतून सुटले नाही. पोलिसांनी मयताच्या नातेवाईकाकडे व मयताच्या पत्नीकडे विचारना करून तुमचा कुणावर संशय आहे का अशी विचारणा केली असता मयताच्या पत्नीने आमचा कुणावरही संशय नसून आमची कुठलीच तक्रार नसल्याचे पोलिसांना सांगितले. हे ऐकून कुठेतरी घरातच पाणी मुरते याची पक्की खात्री मनोमन पोलिसांनी केली. दरम्याना मयत श्रीमंत आळणे याच्या डोक्यात जाड वस्तू मारून त्याचा गळाआवळून त्यांचया खुन केल्याचा वैद्यकिय अवाहल पोलिसांना मिळाला. पण मयताचे नातेवाईकांची कुठलीही तक्रार नसल्याने पोलिसांनी सरकारि फिर्याद देवून गुन्ह्याला वाचा फोडण्याची तयारी केली. पोलिस हेड कॉन्स्टेबल महादेव नारायण गिरी यांच्या फिर्यादिवरून श्रीमंत आळणे याला अज्ञात आरोपीने अज्ञात कारणासाठी खून केल्यावरून औसा पोलिस ठाण्यात गुरनं ७४/२०२१ कलम ३०२,२०१ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, औसा उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले, औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्रे औसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे यांच्या हाती देण्यात आले. या खून प्रकरणाचा छडा लावण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे यांनी तपासाची चक्रे गतिमान करून सर्वप्रथम मयत रहात असलेले चलबुर्गा गाव गाठले. चलबुर्गा गावात जाऊन मयत श्रीमंत आळणे यांच्या नातेवाईकांची भेट घेतली श्रीमंत आळणे याचे कोणाशी वैर आहे काय हे पण जाणून घेतले. मात्र श्रीमंत मात्र श्रीमंत आळणे यांची कोणाशी दुष्मानी नसल्याचे समोर आले. श्रीमंत आळणे हा मुळ चलबुर्गा गावचा रहिवाशी होता.श्रीमंत शेषराव आळणे याला वडिलोपार्जित पाच एकर जमीन होती. तो वडीलांना एकुलता एक मुलगा होता. त्याचे लग्न अनिताशी झाले होते. त्या पाच एकर जमिनीत काम करून तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. श्रीमंत आळणे आणि अनिता आळणे यांना तीन मुले आणि एक मुलगा असे अपत्य झाले होते. सुरुवातीपासूनच श्रीमंत आळणे याला दारूचे व्यसन जडले होते. श्रीमंत आळणे आठवडी बाजारात जाऊन जनावरांची खरेदी विक्री आणि दलाली करत होता. औसा तालुक्यात त्याचा बराच दांडगा परीचय होता. जनावरांच्या व्यापारातून श्रीमंत आळणे याला बरेच पैसे मिळत होते. अशात त्याला दारूचे चांगलेच व्यासन जडले होते. तसेच तो परंतु स्त्रीलंपट देखील असल्याची माहिती पोलिसांना समोर आली. त्याचे बाहेर बरेच अनैतिक संबध होते. श्रीमंत आळणे हा आठवड्यातून बरेच दिवस बाहेर राहत होता. तो दारू पिवून सारखच पत्नीला भांडत होता. त्यामुळे श्रीमंत आळणे यांच्या घरातील शांतता भंग पावली होती. श्रीमंत आळणे यांनी आपल्या तिनही मुलींचे लग्न लावून मोकळा झाला होता. वासनाधं आसलेल्या श्रीमंत आळणे याची आपल्या पोटच्या मुलीवरही वाईट नजर होती. अशी गुप्त माहीती देखील पोलिसांनी हास्तगत केली. तसेच त्याचा एकुलता एक मुलगा गांजा तस्करी करताना पकडला असून तो सध्या कर्नाटक राज्यातील बिदर जेल मध्ये शिक्षा भोगत आसल्याची माहीती पोलिसांना मिळाली. श्रीमंत आळणे याचा अनैतिक संबधातून कोणीतरी खून केला असावा असा अंदाज बाधुन सपोनि बाळासाहेब डोंगरी यांनी त्या दिशेने सुरूवात केली. श्रीमंत आळणे याचा दिनक्रम जाणून घेत त्या दिशेने तपास सुरू केला मात्र पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. राहून-राहून श्रीमंत आळणे खून प्रकरणात त्याच्या घरातील कोणाचा तरी हात असल्याचा संशय नेहमी पोलिसांना येत होता. मात्र सबळ पुरावा मिळणे गरजेचे होते. चाणाक्ष पोलीस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे यांनी या खुन प्रकरणातील सर्वच गुंतागुंतीचा बारकाईने अभ्यास करण्यास सुरुवात केली त्यांनी सर्वप्रथम श्रीमंत आळणे यांच्या मोबाईल चे लोकेशन आणि सी डी आर मिळवला. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास केला. १४ मार्च २०२१ रोजी श्रीमंत आळणे कोणा- कोणाला भेटला काणाकोणाला बोलला याची गुप्त माहीती घेतली. श्रीमंत आळणे याने त्या दिवशी आडत बाजारात एक हारभऱ्याचा कट्टा विक्री केली आसल्याची माहीती पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी आडत बाजारात जावून अधिक माही घेतली असता पोलिसांना आशेचे किरण दिसले.श्रीमंत आळणे याचा खून होण्याच्या आदल्या दिवशी श्रीमंत आळणे यांचा मोठा जावई भिवा वामन थोरात व अन्य एकजण श्रीमंत आळणे याच्या मागावर होते व अनिता आळणे या दोघांच्या संर्पकात होती अशी गुप्त माहीती पोलिसांच्या हाती आली. सुरूवातीपासूनच पोलिस अनिता आळणे यांच्या हालचालीवर बारीक लख ठेवून होते. या प्रकरणात अनिता आळणेचा हात आसल्याची खात्री पटताच सपोनि बाळासाहेब डोंगरे यांनी पोलिसांचे एक पथक तयार केले. या पोकॉ रवि जाधव, पोशि महादेव फुले, यांच्यासह डिबी पथकातील पोलिसांचा सूवेश केला. यापथकाने मौजे चलबुर्गा येथून या प्रकरणातील संशयित आरोपी अनिता आळणे हिला ताब्यात घेतले. सर्वप्रथम तिच्याकडे या खुन प्रकरणाबद्दल चौकशी केली असता अनिता आळणे हिने पोलिसांना असमाधानकारक उत्तर पोलिसांना दिले. पोलिसांचा वेगवेगळ्या प्रश्ने भाबावून गेलेल्या अनिता आळणे हिला विश्र्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता तिनेच श्रीमंत आळणे याचा काटा काढल्याचे पोलिसांना सांगितले. आणी अनिता आळणे हिने सांगण्यास सुरुवात केली श्रीमंत आणि हा स्त्रीलंपट आणि त्याचे बाहेर आणि संबंध होते तो दररोज दारू पिऊन येत होता. शिल्लक शुल्लक कारणावरून तो माझ्याशी सतत भांडायचा त्याने बाहेर दोन बाया ठेवल्या होत्या. आलेली कमई तो बाहेर उधळत होता. तसेच पाच एकर जमिनीपैकी दोघींना दोन-दोन एकर नावावर करणार होता. नवऱ्याला सांगूनही नवरा ऐकत नसल्याने नवऱ्या विषयी अनिता आळणेच्या मनात राग उत्पन झाला होता.

श्रीमंत आळणेच्या सततच्या वागण्याचा अनिताला किट आला होता. त्यासाठी तिने नवर्याचा कायमचा काटा काढण्याचे ठरवले. त्याचा अनिताचा मोठा जावई भिवा थोरात याला अनिताने ही गोष्ट आणि त्यांनी बोलून दाखवली होती. भिवा थोरात यांने सुसुची मदत करण्याचे ठरविले. श्रीमंतचा कायमचा काटा काढण्यासाठी भिवा थोरात यांनं एका अन्य साथीदाराची निवड केली होती. त्यासाठी त्यांनी एक लाख रुपयांची सुपारी मागितली. मात्र अनिता आळणे हिने एवढे पैसे नसल्याचे सांगितले. शेवटी ४० हजारात श्रीमंत आळेला खल्लास करण्याची सुपारी ठरली. एवढच नव्हेतर खून केल्यानंतर एक महीन्याने पैसे देण्याचे ठरले. एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. अनिता आळणे हिने दिलेल्या जबानीवरून जावाई भिवा थोरात याला पोलिसांनी औसा येथून ताब्यात घेतले. त्याला ओसा पोलिसात हजर करून अधिक चौकशी केली असता त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूली दिली. सासरा सारख दारू पिवून सासूला भांडत आसल्याने व शेतजमीन बाहेर ठेवलेल्या बायकांच्या नावाने करणार आसल्याने सासूला मदत केली आसल्याचेही कबूल केले. दिनांक १४ मार्च २०२१ रोजी जावई भिवा थोरात आणि त्याचा एक अन्य साथीदार श्रीमंत आळणे त्याच्या मागावर होते. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास श्रीमंत आळणे आपल्या दुचाकीवरून चलबुर्गा गावात न जात थेट शेतातील शेडवर गेला. तो दारूच्या नशेत तर्र होता. आम्ही त्याच्या मागावर होतो. रात्री आकरा वाजण्याच्या सुमारास शेतात गेले. श्रीमंत आळणे याला उठवून दारू पिण्याचा बाहाना करीत आमच्या दुचाकीवरून त्याला लामजना पाटीवर आणलो. मात्र आकरानंतर दारू दुकान बंद आसल्याने आम्हाला दारू मिळाली नाही. तेथला अवैध दारू विक्रेत्याला संर्पक केला मात्र तेथेही दारू मिळाली नाही. दारू पाजवून श्रीमंतचा काढ काढण्याचा कट आसल्याने आम्ही जिघेजण लामजना पाटीवरून औया शहराकडे निघालो. औसा येथे आल्यावर तेथील एका हॉटेल मधून दाष विकत घेतली. तसेच आम्ही पुढे येवून तेथे आसलेल्या एका घराच्या दुसऱ्या मजल्यावर दारू पित बसलो. सोबत पाण्याची सोय नसल्याने आम्ही तिघांनीही कोरडी दारू पिण्यास सुरूवात केली. श्रीमंत आळणे यानं आगोदरच दारू ढोसली आसल्याने त्याला लगेच दारूची झिंग चढली. एवढ्यात माझ्या अन्य साथीदाराने तवळच पडलेला लोखंडी पाईप श्रीमंत आळणे यांच्या डोक्यात मारला. लोखंडी पईपाचा मार जोरात लागल्याने श्रीमंत आळणे जाग्यावरच निचपत पडला. तो शांत पडल्याचे पाहून त्याच्याजवळ आसलेल्या भगव्या रंगाच्या टॉवेलने त्याचा गळा आवळला. तो मेल्याची खात्री होताच त्याला उचलुन खाली उतरून आलो. आणी मोटासायकलीवर दोघाच्या मधोमध बसवून याकतपूर रस्त्यावर आणून तेथे कुणीही नसल्याची खात्री करून टाकून आला अशी कबूली दिली. पोलिसांनी या खून प्रकरणात आरोपीने गुन्हा करण्यासाठी वापरलेला लोखंडी पईप,रक्ताने माखलेले कपडे, हाताचे ठसे हास्तगत केले असून या प्रकरणातील अन्य एका आरोपीचा शेध घेत आहेत.

## पान ८ वरून....

### कोविड लसीकरण दुप्पट...

दिल्या. आश्विनी ग्रामीण रुग्णालय येथे येत्या तीन चार दिवसात टेस्टींगला सुरुवात होईल. त्यानुसार दररोज सुमारे दोन हजारहून अधिक आरटीपीसीआर टेस्ट करता येतील, असे वैशंपायन महाविद्यालयाच्या डॉ. शेख यांनी सांगितले. बैठकीस उपविभागीय अधिकारी हेमंत निकम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. बिरुदेव दुधभाते, जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त अभय डोंगरे, उपायुक्त धनराज पांडे आदी उपस्थित होते.

### नालासोपाऱ्यातील पोलीस अधिकारी ...

राबवण्याचा डॉ. बामणे यांचा मानस आहे. शिबिरामध्ये उपस्थित्त असलेल्या सर्व व्यक्तिंकडूनकाही आध्यात्मिक साधना करुण घेतल्या की जेणेकरून एकही व्यक्तिस भविष्यामध्ये नकारात्मक उर्जेला सामोरे जावे लागणार नाही. तसेच सर्व लोक शारीरिक, मानसिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम बनातिल. अखेरच्या सत्रामध्ये प्रश्नोत्तरे हे सदर घेण्यात आले. जाधव साहेबांनी पण आपल्या भाषणामध्ये काही महत्वाच्या सूचना दिल्या व असे कार्यक्रम पोलीस दलामधे नेहमी व्हायला हवेत जेनेकरुन कर्मचाऱ्यांचा तानतानाव कमी होईल व त्याचा लाभ आपले काम करण्याची सकारात्मकता वाढेल. शेवटी, डॉ. बामणे यांचा चंद्रकांत जाधव, लब्द्धे साहेब, शेटे साहेब यांचे हस्ते शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. शिबिराच्या शेवटी जर कोणास मानसिक समस्या, चिंता, भय, नैराश्य अश्या काही समस्या असल्यास आपन कधीही माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.

### लग्न समारंभात कोरोना नियमांचे ...

पिता यांच्याकडून ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार कदम यांनी दिली आहे. ही करवाई तहसिलदार कदम यांनी केली असून यावेळी त्यांच्यासोबत नायब तहसिलदार सुनील लहांगे व इतर कर्मचारी उपस्थित होते. वाढत्या कोरोनाच्या पार्श्र्भूमीवर सार्वजनिक, धार्मिक, राजकीय कार्यक्रम व लग्न समारंभावर निर्बध असून काही व्यक्तींकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याने ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती कदम यांनी देऊन या पुढील आदेश येईतोपर्यंत अशी कारवाई सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### विलास सहकारी साखर कारखान्यात...

चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी हंगामात १३५ दिवसात आज पर्यंत ५ लाख १२ हजार मे. टन ऊसाचे विक्रमी गाळप आणि ५ लाख ३० हजार क्विंटल साखरेचे उत्पादन केले. या बददल सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख, सर्व कर्मचारी, कामगार तसेच तोडणी-वाहतुक, पुरक कामाचे ठेकेदार यांचे अभिनंदन केले. साखर पोती पूजन कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक जे.एस.मोहिते, कार्यकारी संचालक युनीट२ ए.आर. पवार, संचालक गोविंद बोराडे, युवराज जाधव, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, अनिल पाटील, रजित पाटील, गोविंद डूरे, सूर्यकांत सुडे, अमृत जाधव, भारत आदमाने, सौ. कुसुमताई कदम, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर यांच्यासह कारखाना सभासद, शेतकरी, ऊस तोडणी ठेकेदार, कामगार उपस्थित होते.

### बोरोळ येथील अंगणवाडीचे काम...

वर्षभरापासून ग्रामपंचायतीच्या एका खोलीत अंगणवाडीचे कामकाज चालायचे. गेल्या कांही दिवसापूर्वीच ग्रामपंचायतीची ती खोली खाजगी शिकवणी धारकास भाडेतत्त्वावर दिल्याने संबंधित अंगणवाडी चे कामकाज उन्हात उघड्यावरच हाताळणे आवघड होत असल्याची खंत यावेळी अंगणवाडी सेविकांनी बोलताना सांगितले.

### आमदार देवेंद्र भुयारांच्या हस्ते ...

विविध पोलीस कर्मचाऱ्यांचा कोरोना योद्धा म्हणून सत्कार केला. यावेळी पोलिस निरीक्षक प्रदीप चौगावकर यांनी आमदार भुयार यांचे स्वागत केले. कोरोंना काळात उत्कृष्ठ सेवा देणारे सर्व पोलिस बंधूंचे कार्य उल्लेखनीय व प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन आमदार देवेंद्र भुयार यांनी केले.

यावेळी आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळू कोहळे पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप चौगावकर, पोलीस उपनिरीक्षक योगेश हिवसे, पोलीस उपनिरीक्षक के.डी. साळुंके, पोलिस उपनिरीक्षक सुनील पाटील, नगरसेवक महेंद्र देशमुख, प्रभाकर काळे, ऋषिकेश राऊत, निखिल बनसोड, गौस अली, सारंग काळमेंघ, मोहसिन मिर्झा, हर्षल घोरमाडे, पोलीस कॉन्स्टेबल जगदीश खानवे, पोलिश कर्मचारी गजानन सुंदरकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल सोनल खाडे, आरती सर्याम यांच्याह आदी मंडळी उपस्थित होती.

## थोडक्यात वृत्तांत



### वंध्यत्व बाबत मोफत तपासणी शिबीर

वाडा : मूल न होणे अशा अवस्थेला वंध्यत्व असे म्हणतात. या बाबत जनजागृती होणे अत्यावश्यक असल्याने वाडा तालुक्यातील खानेश्वरी नाका येथील भडांगे हॉस्पिटलमध्ये एका शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. स्वप्निल देवराम राऊत (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ) व डॉ. प्रशांत विष्णू भडांगे (एम.एस.) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात मोफत वंधत्व निवारण तपासणी, मार्गदर्शन व उपचार करण्यात आले. सदर शिबिरात बेबी बिट्स (IVF Center)च्या संचालिका डॉ. शितल जाधव (वंधत्व निवारण तज्ज्ञ) यांनी रुग्ण तपासणी,मार्गदर्शन करून पुढील उपचारपध्दतीचे नियोजन करण्यात आले. शिबिरास मिळालेला उत्फुर्तप्रतिसाद पाहून तसंच रुग्णांच्या सोयीसाठी डॉ.शितल जाधव यांची भडांगे हॉस्पिटल येथे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी जझऊ सुरू करण्यात आली असल्याची माहिती डॉ.भडांगे यांनी दिली.

### भिवंडीत विविध तीन ठिकाणी हाणामारी

भिवंडी : भिवंडी शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या हाणामारीत तीन जण जखमी झाले असून ११जणा विरोधात विविध तीन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोवे नाका येथील वामनशेठ चाल येथे राहणारे आकाश भरती व त्याचे आई, वडील, भाऊ, पत्नी याना नवनाथ पाटील व इतर ३ साथीदार यांनी आकाशच्या घरात घुसून लाकडी दांड्याने मारहाण केली या मारहाणीत आकाश गंभीररीत्या जखमी झाला असून त्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत या प्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात ४ जणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामतघर येथे गुद्यादेवी यादव हिच्या अस्मिता या मुलीस शिवीगाळ करून मारहाण केल्या प्रकरणी छोटू यादव, सितादेवी, रीना यादव, छोटन यादव आशा ४ जणा विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे. निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चांदतारा मस्जिद समीर नईम खरबे, अरबाज नईम, अरफाज यांनी संगनमत रफिक खरबे याच्या घरासमोर शिवीगाळ करून त्याच्या घरातील खुर्ची घेऊन रफिक खरबे याच्या कंबरेवर मारहाण करून दुखापत केल्या प्रकरणी ४ जणा विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

### आगरी-कुणबी समाजातील दुवा हरपला



वाडा : वाडा तालुक्यातील चांबले गावातील गणपत धोंडू भोईर यांचे गुरुवारी (१८ मार्च) दीर्घ आजाराने निधन झाले. गणपत भोईर यांना पूर्ण गावात बाबा म्हणूनच संबोधल जायचं. बाबांनी वाडा येथे जंगल कामगार सोसायटीमध्ये अनेक वर्षे सेक्रेटरी म्हणून काम केलं. सहकार क्षेत्रातील अभ्यासू व जाणकार म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांनी चांबले सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून अनेक वर्षे काम पाहिले. गावातील सप्ताह कामिटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. वारकरी पंथाच्या बाबांनी गावातील प्रत्येक सण व उत्सव चांगला व्हावा, म्हणून नेहमीच पुढाकार घेत असत. गावातील रंगपंचमी उत्सवासाठीही त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. गावातील प्रत्येक सण-उत्सव हा उत्तम झाला पाहिजे, हा बाबांचा आग्रह असायचा. आपल्या गावाचे नाव चांगल झालं पाहिजे, हा त्यांचा सरळ विचार होता. तर त्यांच्या घरचा ११ दिवसांचा गणपती उत्सव हा संपूर्ण गावाचा उत्सव होवून जायचा. सर्व समाजातील प्रत्येकाच्या सुखा- दुःखात न चुकता सहभागी होणाऱ्या व सर्व समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी झटणाऱ्या गणपत भोईर यांच्या जाण्याने दुवा हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### शेतीच्या रस्त्यावरुन एकाचे डोके फोडले

**देवणी** : देवणी तालुक्यातील वलांडी येथे एकास शेतीच्या रस्त्यावरुन शिवीगाळ करुन ठिबकच्या नोजल बेसने मारून डोके फोडल्या प्रकरणी शुक्रवार दि. १९ मार्च रोजी सायंकाळी देवणी पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, वलांडी येथे शेतशीवारात शुक्रवारी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास फिर्यादिने रस्ता सोडून दुसरा रस्ता का पाडता, रहदारीच्या रस्त्याने जात जा असे सांगितले असता यातील नमूद आरोपीने त्याच्या भावास व वडीलांना बोलावून घेऊन भांडणाची कुरापत काढून शिविगाळ करुन ठिबक सिंचनाच्या नवजलबेसने डोक्यात मारून जखमी केले. व कुऱ्हाडीच्या तुंब्याने मारून उजव्या पायावर व जळणाच्या लाकडाने डाव्या पायावर मारून जखमी केले. या प्रकरणी भिमाशंकर मलिकार्जून उमाटे वय ४८ वर्षे राहणार वलांडी यांच्या फिर्यादीवरुन देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ८३/२०२१ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि प्रमाणे धिरज विलास उमाटे, दिपक विलास उमाटे, विलास इरप्पा उमाटे सर्व राहणार वलांडी यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक डपडवाड हे करीत आहेत.

22 TO 28 MARCH 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:33 PM Page 1



# ठाकरे सरकारच्या वाझे गँगने मनसुख हिरेन यांची हत्या केली

## किरीट सोमय्या यांचा ठाकरे सरकारवर आरोप



**भिवंडी/अभिजित हिरे**

ठाकरे सरकारच्या ठाकरे सरकारच्या वाझे गँगने मनसुख हिरेन यांची हत्या केली असा आरोप भाजपचे किरीट सोमय्या यांनी भिवंडीत केला आहे. त्यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. बुधवारी शहरातील कोविड लसीकरण केंद्रांना भेटी देण्यासाठी किरीट सोमय्या भिवंडीत आले होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधतांना त्यांनी ठाकरे सरकारवर मनसुख हिरेन मृत्यू प्रकरणात आरोप केला. यावेळी बोलतांना सोमय्या म्हणाले कि आपण कालच हिरेन परिवाराची भेट घेतली असून या भेटी दरम्यान हिरेन परिवार प्रचंड तणावात असल्याचे मला आढळले असून ठाकरे सरकारच्या वाझे गँग कडून त्यांच्या पत्नी व परिवाराला धमक्या येत असल्याने हिरेन परिवाराला सुरक्षा पुरविण्यात यावी अशी विनंती व मागणी लेखी पत्राद्वारे आपण एनआयए यंत्रणा व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली असल्याचेही सोमय्या यांनी यावेळी सांगितले.

त्याचबरोबर मुंबई पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांनी अपारदर्शकपणे व घाईघाईने ५ जून २०२० रोजी सचिन वाझे यांना पुन्हा पोलीस सेवेत घेतले यामागे नेमकी काय हेतू होता याची देखील चौकशी व्हावी अशा मागणीचे पत्र देखील आपण एनआयएला दिले असल्याचेही सोमय्या यांनी सांगितले. तर या हिरेन प्रकरणात भाजपचा हात असल्याचा आरोप व ट्विट काँग्रेसचे सचिन सावंत यांनी केला असून याबत सोमय्या यांना विचारले असता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, गृहमंत्री अनिल देशमुख व काँग्रेसचे सचिन सावंत हे हिरेन प्रकरण भरकटविण्याचा प्रयत्न करत असून सरकार तुमचा , पोलीस तुमचे वाझेही तुमचाच मग हिरेन प्रकरणात पंधरा दिवस सरकार व पोलीस झोपा काढत होते काय? की हे सर्व जण ५० कोटींच्या वासुलीत व्यस्त होते असा प्रती सवाल व आरोप देखील सोमय्या यांनी केला असून सचिन वाझेचा बोलविता धनी देखील तुरुंगात जाणार असल्याचा विश्वास सोमय्या यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# नालासोपारा विधानसभा संघातील मतदार यादीत छायाचित्र नसलेल्या, दुबार, मयत व स्थलांतरीत मतदारांची नावे वगळणार!

**नालासोपारा/प्रतिनिधी**

१३२ नालासोपारा विधानसभा मतदार संघामध्ये १ जानेवारी २०२१चे अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीमध्ये एकूण ५,६१,०१० मतदार आहेत. मतदार यादीमध्ये छायाचित्र नसणारे एकूण ७७,३१० मतदार आहेत. एकाच व्यक्तीचे नावे दुबार असणारे ३,८९६ मतदार आहेत.

छायाचित्र मतदार यादी शुद्धीकरण करणेकामी या कार्यालयाकडून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ), तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेवून मतदार छायाचित्र गोळा करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सदर मोहिमेमध्ये क्षेत्रीय कर्मचारी यांनी मतदारांच्या घरी भेटी देवून पडताळणी केली असता, मतदारांचे छायाचित्र जमा करणेकामी अल्प प्रतिसाद मिळाला आहे. तसेच काही मतदार स्थलांतरीत व मयत आहेत. याबाबत क्षेत्रीय स्तरावर सामूहिक पंचनामा करून मतदार यादीतून नावे वगळणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, ज्या मतदारांचे मतदार यादीमध्ये छायाचित्र नाही अशा मतदारांनी आपले रंगीत छायाचित्र संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ), तलाठी यांच्याकडे जमा करावे अन्यथा छायाचित्र नसणारे व दुबार, मयत, स्थलांतरीत मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात येईल. याकामी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन १३२ नालासोपारा विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी अर्चना कदम यांनी केले आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### जिजामाता - जिजाऊ ही योजना महिला व बाल विभागांतर्गत राबविली जात नाही

लातूर : ज्या महिला कोरोना काळात दिनांक १ मार्च २०२० ते दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत ज्या घरातील वय वर्ष २१ ते ७० या वयोगटातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाले आहे. अशा विधवा झालेल्या महिलांना महिला व बाल विकास विभागाच्या जिजामाता, जिजाऊ या योजनेतंर्गत रु. ५० हजार प्रती लाभार्थी मिळतील अशी पोस्ट सोशल मिडीयाव्दारे व्हाट्स पवर, फेसबुकवर व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची पोस्ट ही खोटी व बनावट असून अशा प्रकारची कोणतीही योजना महिला व बाल विकास विभागामार्फत राबविली जात नसून या मेसेजेसना नागरीकाकंनी बळी पडू नये असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती वर्षा पवार यांनी केले आहे.

### आ. रमेशआप्पा कराड यांचा सत्कार

लातूर : महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर जिल्ह्यातील व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांच्या वतीने पांडुरंगाची मूर्ती भेट देऊन सत्कार करून सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. धनंजय बिक्कड, प्रा. केशव मुडे, प्रा बालाजी भिगोले, प्रा.प्रभाकर मुळे, प्रा.आत्माराम दंडीमे, प्रा.भारत चव्हाण, प्रा.अशोक कदम, प्रा.महालिंग हुडेकर, प्रा.तुकाराम नरवाडे, प्रा.रामेश्वर सगर, प्रा.बालाजी शिरसाट, प्रा.जयपाल फड यांच्यासह अनेक व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षक होते.

### बँक कर्मचाऱ्यांची केंद्र सरकार विरोधात निदर्शने

अहमदपूर : आयडीबीआय व दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खासगीकरणाची घोषणा केंद्र सरकारने केली असून या खाजगीकरणाच्या विरोधात बँक कर्मचाऱ्यांनी दोन दिवसीय देशव्यापी संप पुकारला आहे. त्यास पाठिंबा देत येथील यूनाइटेड फोरम ऑफ बँक युनियन अहमदपूर युनिटच्या संपात उडी घेतली असून अहमदपूर येथील भारतीय स्टेट बँक,महाराष्ट्र बँक,बँक ऑफ इंडिया या बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी बँक बंद ठेवून शंभर टक्के देशव्यापी संपाला प्रतिसाद दिला बँक बचाव देश बचाव घोषणा देत शहरातील मुख्य रस्त्यावर उतरून केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी देण्यात आली यावेळी बँक ऑफ महाराष्ट्र, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया बँकेच्या कर्मचाऱ्यांनी यासंपात सहभागी होऊन सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी बँकेसमोर हातात पत्रक धरून निदर्शने करीत बंदमध्ये सहभाग नोंदवून दोन दिवसाचा बंद पुकारला कोरोणा महामारी पार्श्र्वभूमीवर ग्राहकाला व व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन खाजगीकरणाचे नुकसान व ग्राहकाचे अतोनात हाल होतील हे समजावून सांगत या संपात सेवानिवृत्त कर्मचारी यांचाही सहभाग होता. शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र ग्रामीण बँक तसेच हाडोळती, काजळ हिप्परगा बँकेतील कर्मचारी राम परीट, कोळी, केंद्रे, संतोष, बिल्ला, गुरमे, मंत्रे, शेळके, बनसोडे, अग्रवाल, भगत, मोठे, स्वामी दत्तात्रेय, संतोष बिल्ला, अरुण मालकर, गुंडाळे, बेरळीकर, सकनुर, हेंगणे, कोटलवार सतीश आधी बँक कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला यावेळी शहर व तालुक्यातील सर्वच राष्ट्रीयीकृत बँकांनी आपले व्यवहार बंद ठेवले होते. त्यामुळे सहकारी बँका व ग्राहकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

### विविध शासकीय योजनेच्या अंमलबजावणीसाठी जनजागृती मोहिमेचा लातूर जिल्हात शुभारंभ

लातूर : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालय लातूरच्या वतीने जिल्हा वार्षिक योजना सन २०२०- २१ अंतर्गत सर्व साधारण योजनेच्या माध्यमातून जिल्हयात शासनाच्या विविध योजनेची माहिती तळागाळातील लोकापर्यंत होण्यासाठी चित्ररथ, मोबाईल व्हॅन व दूचाकीव्दारे जनजागृती मोहिमेचा शुभारंभ अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, जिल्हा खनिकर्म अधिकारी महेश सावंत, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के उपस्थित होते. जिल्हयात या जनजागृती मोहिमे अंतर्गत चित्ररथाव्दारे १५०, मोबाईल व्हॅनव्दारे ६० व दूचाकी व्दारे १०० गावांत अशा एकूण ३१० गावांत प्रबोधन होणार आहे.या प्रबोधन मोहिमेबरोबरच जिल्हयात शासन विविध कल्याणकारी योजना राबवित असलेल्या योजनेची (विशेष घटक योजना व सर्वसाधारण योजना) माहिती पुस्तीका घडीपत्रिका, भित्तीपत्रक तसेच पॉम्प्लेटचे वितरण करण्यात येणार आहे. या विविध योजनेची माहिती सर्वसामान्यांना होवून त्यांना या योजनेच्या माध्यमातून लाभ मिळणे हा प्रबोधन मोहिमेचा उद्देश आहे. जिल्हयात या जनजागृती मोहिमे अंतर्गत चित्ररथाव्दारे प्रत्येक तालुक्यात १५ अशा एकूण १५०, मोबाईल व्हॅनव्दारे प्रत्येक तालुक्यता ६ अशा एकूण ६०, व दूचाकी मोटार सायकलव्दारे प्रत्येक तालुक्यात १० अशा एकूण १०० गावांत जनजागृतीचे कार्यक्रम होणार आहे. तरी या जनजागृती मोहिमेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी केले आहे.

### प्रशासकीय इमारत परिसरात स्वच्छता अभियान कार्यक्रम संपन्न

लातूर : जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, लातूर व कोल्हापूर येथील स्वच्छता दूत अदित्य लातूरकर, आकाश पतंगे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा प्रशासकीय इमारत परिसरात स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. या स्वच्छता अभियान कार्यक्रमास जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी डॉ.भा.ना.संगमवार यांच्यासह कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उत्सर्फुतपणे सहभाग नोंदविला. हा उपक्रम या पुढे प्रत्येक आठवडयात एक दिवस राबविण्यात येणार असल्याचे वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी बी.एन. संगमवार यांनी सूचित केले आहे.

## भिवंडी वकील संघटनेच्या अध्यक्ष पदी अँड. मनजीत राऊत, उपाध्यक्षपदी अँड.रवि सोनवणे

**भिवंडी/आकाश गायकवाड**



ठाणे जिल्ह्यात प्रतिष्ठीत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी वकील संघटनेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली असून या संघटनेच्या अध्यक्षपदी मनजीत राऊत यांची तर उपाध्यक्ष पदी अँड.रवि सोनवणे यांची निवड झाली आहे. त्यामुळे मान्यवर वकिलांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. भिवंडी वकील संघटनेची सन २०२१ त २०२३ या दोन वर्षासाठी ही कार्यकारणीची निवड करण्यात आली.

ज्येष्ठ वकील नारायण अय्यर व दिनेश्वर पाटील यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. सुमारे तीनशेहुन अधिक वकीलांनी मतदान या निवडणुकीत केले. यावेळीअध्यक्षपदी अँड.मनजीत वसंत राऊत, उपाध्यक्ष अँड.रवि काशिनाथ सोनवणे, सचिव-अँड.जितेंद्र रविकांत पाटील, खजिनदार अँड. समीर पाटील,सह सचिव - अँड. अभिषेक डी .भोई, आणि कमेटी सदस्य म्हणून अँड.अनिल वखारे, अँड अलसभा मेहमूद मोमीन,अँड कल्पेश साईनाथ ठाकूर, अँड सचिन मोतीराम पाटील, अँड अंकित कडू, अँड निवेदिता वतारी यांची निवड करण्यात आली.

# जळगाव एलसीबीकडून रस्तालुटीचा गुन्हा उघड





**जळगाव/क्राईम रिपोर्टर**

साखर व्यापाऱ्याची ७ लाख ९० हजार रुपयांची वसुली करुन परत जाणाऱ्या कार चालकाची लुट झाल्याची घटना ७ मार्च रोजी एमआयडीसी पोलिस स्टेशन हद्दीतील म्हसावद ते एरंडोल दरम्यान घडली होती. या लुटीप्रकरणी कारचालक नाना नथु पाटील यांनी एमआयडीसी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्याचा तपास जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लावला आहे.

पोलीस निरीक्षक किरणकुमार बकाले यांनी आपली तपासाची सुत्रे फिरवत खबऱ्यांसह तांत्रीक माहितीचा आधार घेत दिपक साहेबराव चव्हाण उर्फ डासमाऱ्या आप्पा (रा.सामनेर ता.जि.जळगाव ह.मु.गिरड ता.भडगाव जि.जळगास) यास गिरड येथून ताब्यात घेतले. त्याने पोलिसी हिसका बघताच गुन्हयात चोरी केलेली मारोती सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार (एमएच ०२ इआर ५३८२) व रोख रुपये ४० हजार काढून दिले आहेत. या गुन्हयातील दुसरा आरोपी तुकाराम दिनकर पाटील उर्फ सोनु उर्फ मोघ्या (रा.सामनेर ता.जि.जळगाव ह.मु. बरखळा पठाणी, भोपाळ-मध्यप्रदेश ) याचा शोध घेण्याकामी स्थानिक गुन्हे शाखेचे सहकारी सहाय्यक फौजदार रा.का.पाटील, पो.हे.कॉ. विलास पाटील, सुधाकर अंभोरे, राहुल पाटील यांना रवाना केले आहे. दिपक साहेबराव चव्हाण उर्फ डासमाऱ्या आप्पा रा.सामनेर ता.जि.जळगाव ह.मु.गिरड ता. भडगाव जि.जळगास यास गुन्हयाच्या पुढील तपास कामी एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. या गुन्ह्याच्या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ.रा.का.पाटील, पो.हे. कॉ. अनिल इंगळे, विजयसिंग पाटील, विलास पाटील, सुधाकर अंभोरे, राहुल पाटील, नितील बावीस्कर, विजय शामराव पाटील, नंदलाल पाटील, भगवान पाटील, स.फौ.रमेश जाधव, मुरलीधर बारी तसेच पोउपनिरीक्षक रविंद्र गिरासे, स.फौ.विजय पाटील, नरेंद्र वारुळे यांनी सहभाग घेतला.

# किंनगाव-कोपरा येथील सर्व आरोपींना कठोर शासन करावे -उमाताई खापरे

**लातूर/प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यापासून महिला आणि मुलीच्या अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. विविध भागात अमानुष अनेक घटना घडल्या आहेत. राज्यात महिला सुरक्षित नाहीत. छत्रपती शिवरायांच्या भुमीत आहोत की मोगलांच्या असा प्रश्न निर्माण होतोय. महिलांना सुरक्षा देता येत नसेल तर या सरकारने राजीनामा देवून घरी बसावे. कोपरा (किनगाव) येथील घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कडक शासन करावे अशी मागणी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश अध्यक्षा उमाताई खापरे यांनी पत्रकारांशी बोलताना केली. अहमदपूर तालुक्यातील कोपरा (किनगाव) येथील मुलीवर झालेल्या अत्याचार घटनेच्या अनुषंगाने अत्याचारग्रस्त मुलीची अंबाजोगाई येथील दवाखान्यात भेट देवून सत्य परिस्थिती जाणून घेतली त्यानंतर कोपरा येथील घटनास्थळी जावून पाहणी केली कुटूंबाला धीर दिला. बर्दापूर येथील मोलमजूरी करून उपजिवीका भागवीणाऱ्या कुटूंबाला ग्रामपंचायतीने उध्वस्त केलेल्या घटनेची पाहणी केल्या नंतर लातूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना उमाताई खापरे यांनी मागणी केली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, प्रदेश महिला मोर्चाच्या सरचिटणीस सविता कुलकर्णी, चिटणीस ॲड. वर्षाताई डहाळे, उपाध्यक्षा स्वाती जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्षा श्रीमती रेखाताई तरडे, भाजयुमो प्रदेश चिटणीस प्रा. प्रेरणा होनराव, शहर जिल्हाध्यक्ष मिनाताई भोसले आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी बोलताना उमाताई खापरे म्हणाल्या की, अहमदपूर तालुक्यातील मौजे कोपरा (किनगाव) येथील स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-या मुलीवर देवीचे मंदिर हटवण्याच्या प्रकारावरून गावातील नराधमांनी घरात कोणीही नाही हे पाहून घरात घुसून जबर मारहान केली, दगडांनी ठेचून रक्तबंबाळ केले, अश्रिलील भाषेत शिवीघाळ करून सामुहीक विनयभंग आणि अत्याचार केला. यावेळी बलात्कार करण्याचाही प्रयत्न झाला. अत्याचारग्रस्त मुलीने किनगाव पोलीस स्टेशन गाठले. पोलीसांनी तक्रार नोंदवून घेतली नाही उलट अहमदपूरला दवाखान्यात जाण्याचा सल्ला दिला. तेव्हा तीने अहमदपूर पोलीस स्टेशन गाठले त्यांनीही तक्रार नोंदवून घेतली नाही. रक्तबंबाळ अवस्थेत त्रास सहन करत तीने उपचारासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रूग्णालय गाठले आज तिच्यावर व्यवस्थित उपचार सुरू आहेत. अत्यंत अमानुष लाजीरवाणी ही घटना असून मुलीने सांगीतलेली परिस्थिती अंगावर काटा आणणारी आहे हे ऐकून छत्रपती शिवरायांच्या भुमीत आपण आहोत का हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही असे सांगून खापरेताई म्हणाल्या की, या प्रकरणात गावच्या सरपंच, उपसरपंच ग्रामसेवकासह तब्बल सतरा जणांविरूध्द गुन्हा दाखल आहे. त्यातील सहाजणांना अटक झाली बाकीचे मोकाट आहेत. सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कडक शासन झाले पाहिजे अशी भाजपा महिला मोर्चाची अग्रही मागणी आहे. तसेच अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील मोलमजूरी करून पोटाची खळगी भरणा-या सोनाजी खैरमोडे यांचे वर्षानुवर्ष राहत असलेले घर कसलीही पुर्व सुचना न देता सरपंचासह गावपुढा-यांनी उध्दस्त केले. पोलीस बंदोबस्तात घर हटवताना घरातील सर्व साहित्य, धान्य, कपडे, भांडी कुंडी घेवून गेले. असे सांगून खापरेताई म्हणाल्या की, या कुटूंबाला आज उघडयावर आपली उपजिवीका भागवावी लागत आहे. एवढी भयान परिस्थिती होवूनही तक्रारी अर्ज देण्यास गेले असता कसलीही दाद फिर्याद दिली नाही. या घटनेची माहिती जिप सदस्य अविनाश मोरे यांनी दिली असता सदरील घटना स्थळाला भेट देवून पाहणी केली आणि बर्दापूर पोलीसांना जाब विचारला तेव्हा या प्रकरणाची दखल घेवून कार्यवाही करण्याची ग्वाही दिली. यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, बर्दापूरची घटना राज्याचे समाजकल्याण मंत्री आणि बीड जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या मतदार संघात घडलेली असून गावचा सरपंच राष्ट्रवादी कॉग्रेसचा आहे म्हणून या घटनेला पाठीशी घातलं जातयं का ? गरीबांचे दुःख, वेदना जवळ गेल्याशिवाय समजत नाहीत. या सरकारच्या काळात गोरगरीब सामान्य जनतेला वा-यावर सोडलं जातयं आणि गुन्हेगारांना पाठीशी घातलं जातयं हे दुर्दैवी आहे. बर्दापूर येथील खैरमोडे कुटूंबाला तात्काळ पुर्ववत निवा-याची व्यवस्था करून संबंधीत दोषींवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी केली. कोपरा (किनगाव), अंबाजोगाई रूग्णालय आणि बर्दापूर घटनास्थळाला भेट देताना महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा उमाताई खापरे, आ. रमेशअप्पा कराड यांच्या समवेत लातूर जिल्हयातील महिला मोर्चाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होत्या.

# कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे लॉकडाऊनऐवजी कठोर निर्बंध आणणार - आरोग्यमंत्री राजेश टोपे

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला असून संसर्गाच्या प्रमाणात वाढ झाली मात्र त्या तुलनेत मृत्युदर कमी असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी. वाढत्या रुग्णसंख्येवर लॉकडाऊन हा पर्याय नसून निर्बंध अधिक कठोर केले जातील. राज्यातील जनतेने कोरोना नियमांचे पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना केले.



आरोग्यमंत्री राजेश टोपे म्हणाले, राज्यात बाधीत होणाऱ्या एकूण रुग्णांपैकी ८५ टक्के रुग्णांना लक्षणे नाहीत. त्यामुळे त्यातील बहुतांश जणांना गृह विलगीकरणाचा सल्ला देण्यात आला आहे. परिणामी राज्यात सध्या रुग्णालयातील खाटांची कमतरता नाही. संसर्गाचे प्रमाण वाढू नये म्हणून ट्रॅकींग, टेस्टींग आणि ट्रीटमेंट या त्रिसूत्रीनुसार काम केले जात असून राज्यात कोरोना चाचण्यांची संख्या वाढविण्यात येत आहे. लग्न समारंभ, सामाजिक कार्यक्रम आदी ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी कडक निर्बंध घातले जात असून नागरिकांनीदेखील स्वयंशिस्तीने गर्दी होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. सुरक्षित अंतर, मास्कचा वापर आणि वारंवार हात धुणे या कोरोना प्रतिबंध नियमांचा वापर नागरिकांकडून झाल्यास रुग्णसंख्येला आळा घालू शकतो. त्यामुळे लॉकडाऊन टाळण्याकरिता निर्बंधांचे पालन करावे, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले आहे.

राज्यात लसीकरणाला मोठ्या प्रमाणावर गती देण्यात आली असून दररोज किमान सव्वा लाख नागरिकांना कोरोना प्रतिबंधक लस देण्यात येत आहे. राज्यामध्ये लसीचा तुटवडा नसून खासगी व शासकीय रुग्णालयात लसीकरणाचे प्रमाण वाढविण्याकरिता प्रयत्न केले जात असल्याचे सांगतानाच ६० वर्षावरील सर्व नागरिकांनी लवकरात लवकर लसीकरण पूर्ण करुन घ्यावे, असे आवाहनही आरोग्यमंत्र्यांनी केले.

## भिवंडी जुने झाड घरासह ४ दुकानावर पडले, दुकानाचे नुकसान, एक दुचाकीस्वार जखमी



**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरातील नजराणा कंपाउंड येथील सुभाष गार्डन जवळ जुने अशोकाचे झाड ३ दुकाने आणि एका घरावर पडले असून त्यामध्ये स्वीट, टेलर आणि पानटपरी या दुकानाचे मोठे नुकसान झाले असून एक दुचाकीस्वार जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे मात्र हे झाड रोडवर पडल्याने वाहतूक कोंडी सुद्धा झाली होती, अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली असून झाड हटवण्याचे काम सुरु असून, सुदैवाने गार्डनमध्ये हे झाड कोसळले नाही कारण आज लहान मुले मोठ्या प्रमाणात खेळण्यासाठी आले होते त्यामुळे मोठी दुर्घटना झाली असती मात्र हे झाड पडले कि पडले असा प्रश्न नागरिक विचारत आहे.

क्राईम Reporter 9890718873

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

22 TO 28 MARCH 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 20/03/2021 8:56 PM Page 1



### पंढरपूर पोटनिवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

# ५२४ मतदान केंद्रे, ३९६५ कर्मचाऱ्यांची नेमणूक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

भारत निवडणूक आयोगाने पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक घोषित केली असून या मतदारसंघात १७ एप्रिल २०२१ रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून मतदारसंघात मुख्य मतदान केंद्रे ३२८ आणि सहायक मतदान केंद्रे १९६ अशी एकूण ५२४ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. यासाठी ३९६५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक केल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली. पंढरपूर मतदारसंघ मतदान तयारीविषयीची माहिती पत्रकार परिषदेत शंभरकर यांनी दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, निवडणुकीची अधिसूचना २३ मार्च, नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक ३० मार्च, नामनिर्देशन पत्राची छाननी ३१ मार्च, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक ३ एप्रिल, मतदानाचा दिनांक १७ एप्रिल, मतमोजणी २ मे २०२१ रोजी होणार आहे. पंढरपूर मतदारसंघात पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील गावांचा समावेश होतो. मतदारसंघात एक लाख ७७ हजार ३८७ पुरूष, एक लाख ६२ हजार १४८ महिला आणि ५ तृतीयपंथी, असे एकूण

### जिल्हा निवडणूक अधिकारी मिलिंद शंभरकर यांची माहिती



तीन लाख ३९ हजार ५४० मतदार मतदानाचा हक्क बजावतील. २०१९ मध्ये या मतदारसंघात दोन लाख ३९ हजार ६९० जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. ७१.८५ टक्के मतदान झाले होते. निवडणुकीत १०५० बॉलेट युनिट, १०१६ कंट्रोलिंग युनिट, १००९ व्हीव्ही पॅटचा वापर मतदानासाठी होणार आहे. ५२४ मतदान केंद्रावर मतदान कर्मचारी ३१५०, ६० सेक्टर अधिकारी, विविध पथकातील कर्मचारी २०५ आणि ५५० पोलीस कर्मचारी अशा एकूण ३९६५ मनुष्यबळाची नेमणूक करण्यात येणार असल्याचे शंभरकर यांनी सांगितले. कोविड-१९ चे सर्व नियम पाळून मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी १२१० आरोग्य कर्मचारी/आशा कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येणार असून प्रत्येक केंद्रावर सॅनिटायझर, तापमान तपासणीसाठी ५५० थर्मल गन, ४५०० फेस शिल्ड, ४५०० हॅन्ड ग्लोज आणि ५००० मास्क यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यात येणार असून मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन शंभरकर यांनी केले आहे.

## कोविड लसीकरण दुप्पट करा-जिल्हाधिकारी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील कोविड प्रतिबंधक लसीकरण केंद्राची संख्या वाढवून दररोज सध्याच्या दुप्पट नागरिकांना लसीकरण करण्याचे नियोजन करा, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या. कोविड प्रसाराला आळा घालण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी आढावा बैठक घेतली. जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आज झालेल्या या बैठकीत व्यासपीठावर महापालिका आयुक्त पि. शिवशंकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शीतलकुमार जाधव, उपायुक्त वैशाली कडूकर उपस्थित होते. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील कोविड बाधितांची संख्या वाढत आहे. या परिस्थितीत ट्रेसिंग, टेस्टींग आणि ट्रीटमेंट वाढवले पाहिजेच, त्याचबरोबर लसीकरणाचा वेग वाढवायला हवा, असे शंभरकर यांनी सांगितले.सध्या शहर आणि जिल्ह्यात दररोज सुमारे सात हजार जणांना लस दिली जात आहे. आता नवीन केंद्रे निश्चित करुन येत्या आठवड्यात दररोज चौदा हजार जणांना लस देण्याचे नियोजन करा, अशा सूचना जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिल्या. सोलापुरात सध्या ९१ शासकीय लसीकरण केंद्रात आणि २५ खासगी दवाखान्यात लस दिली जाते. आता जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण इस्पितळात लस दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे शासनाची मान्यता घेऊन, खासगी दवाखान्यातील लसीकरण केंद्राचीही संख्या वाढवली जाणार असल्याचे लसीकरण समन्वयक डॉ.अनिरुध्द पिंपळे यांनी सांगितले. शहर आणि जिल्ह्यातील कोरोना चाचण्यांची संख्या वाढवण्यासाठी नियोजन करा, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी...**पान ६ वर**

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा युवक उपाध्यक्ष पदी राहुल वेखंडेंची नियुक्ती



**वाडा/वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा जिल्हाध्यक्ष सुनील भुसारा यांच्या आदेशानुसार गुरुवारी (दि.१८) वाडा येथील शासकीय विश्राम गृह येथे विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत चेतन दळवी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस तथा पालघर जिल्हा निरीक्षक वरूण पारेख यांच्या आदेशानुसार जिल्हा व तालुका युवक कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली. मान्यवरांच्या उपस्थितीत माजी युवक तालुका अध्यक्ष राहुल वेखंडे यांची कार्यप्रणाली बघून पक्षाने त्यांची राष्ट्रवादी युवक जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली तसेच महेश भोईर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली, तर सुजित पाटील यांची वाडा शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पदी नियुक्ती करण्यात आली. सदरच्या बैठकीसाठी मार्गदर्शक म्हणून पदनियुक्ती साठी वाडा तालुका अध्यक्ष, महिला अध्यक्ष मृणाली नडगे व वाडा तालुका कार्याध्यक्ष आणि राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी आणि सर्वसामान्य निष्ठावंत कार्यकते उपस्थित होते.

## नालासोपाऱ्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तानतणाव मुक्ति आणि व्यक्तिमत्व विकास शिबिर संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

मीरा भायंदर आणि वसई विरार आयुक्तालय, नालासोपारा उपायुक्त कार्यालय अंतर्गत जागतिक हास्य दिवस याचे निमित्त साधून सम्मोहन शास्त्र अभ्यासक व समुपदेशक डॉ. शशिकांत बामणे यांचे तानतानाव मुक्ति व व्यक्तिमत्व विकास या विषयावर शिबिर सम्पन्न झाले. या कार्यक्रमामध्ये उपायुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शना खाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये अनेक पोलीस अधिकारी, पो. कर्मचारी, महिला पो. कर्मचारी अश्या अनेकांनी भाग घेतला व कार्यक्रम सोशल डिस्टनसिंगचे तंतोतंत पालन करुण हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये डॉ. बामणे यांनी आपण आपले जीवन, शरीर स्वास्थ्य निरोगी व आंनददायक व ऊर्जामय कसे ठेवावे, राग, मद, मस्थर, यावर नियंत्रण कसे मिळवावे, आपण आपले कर्म सक्षम कसे बनवावे व कसे राहावे, आध्यत्मिकतेशी एकरूपता कशी साधावी, येणारा प्रत्येक क्षण आपण सकारात्मक दृष्टीने आत्मसात कसा करावा, घरामधे पॉजिटिव ऊर्जा कशी निर्माण करावी अश्या अनेक विषयांची इतयंभूत माहिती व ज्ञान देण्यात आले व आपणास मिळालेला जन्म सार्थकी कसा लावावा याची सम्मोहन शास्त्रा द्वारा प्रात्तक्षिके करुण घेवून अंतर्मनाला जागृत करुण या सर्व गोष्टी आपल्या मनात कायमस्वरूपी आपले जीवन सुन्दर राहन्यासाठी काम करत राहतील अश्या सकारात्मक सूचना अंतर्मनामधे जागृत केल्या. असेच कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात..**पान ६ वर**

## लग्न समारंभात कोरोना नियमांचे उल्लंघन वाडा तहसीलदारांची दंडात्मक कारवाई



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोना संसर्गाचा प्रभाव कमी होत असतानाच राज्यासह पालघर जिल्ह्यातही कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने शासना कडून वारंवार कोरोना नियमांचे पालन करण्या बाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. सॅनिटायझरचा वापर करणे, वारंवार हात स्वच्छ धुणे, मास्क वापरने यासह सोशल डिस्टन्सिंग राखणे अशा सूचना देऊन धार्मिक, राजकीय व सामाजिक कार्यासाठी उपस्थितीत्यांच्या संख्येतही मर्यादा राखून दिल्या असल्या तरी तालुक्यातील लग्नसोहळ्यात हमखास पन्नास पेक्षा जास्त लोकांची उपस्थिती दिसून येत आहे. असाच एक लग्न सोहळा तालुक्यातील दुपारेपाडा येथे सोमवारी (दि.१५ मार्च) रात्रीच्या सुमारास आयोजित केला होता. या लग्न समारंभात कोरोना संसर्गा पासून बचाव करण्यासाठी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन न करता विनामस्क आणि दोनशे ते तीनशे जणांची उपस्थिती असल्याची माहिती वाड्याचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांना मिळाल्याने लग्न समारंभ आयोजक वर ...**पान ६ वर**

## विलास सहकारी साखर कारखान्यात १० लाख ५१ हजार १११ साखर पोत्याचे पूजन



**लातूर/प्रतिनिधी**

राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, तथा पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी वाटचाल करीत असलेल्या विलास सहकारी साखर कारखाना लि. च्या चालू गळीत हंगामातील १० लाख ५१ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन सर्व संचालकाच्या उपस्थितीत चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. लातूर तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या २० वा गळीत हंगाम अंतीम टप्यात आहे. आदरणीय विलासराव देशमुख यांची प्रेरणा, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे नियोजन, पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने चालू गळीत हंगाम यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. सदया कोरोना १९ महामारीचा कठीण काळ आहे. या परिस्थितीत कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करण्यासाठी युध्द पातळीवर सर्वांनी काम केले. कारखान्याचे संचालक मंडळ, सर्व अधिकारी, कर्मचारी आणि कामगार यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेऊन सुरक्षा साधनांचा वापर करून गळीत हंगाम यशस्वी केला. हंगामात कारखाना तांत्रीकदृष्टीने बंद राहणार नाही याची पूरेपूर काळजी घेतली. गाळप क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करून कार्यक्षेत्रातील ऊसाचे वेळेवर गाळप करून हंगाम यशस्वी करण्यात आला आहे. ...**पान ६ वर**

## बोरोळ येथील अंगणवाडीचे काम रखडल्याने मदतनीस महिला उघड्यावर



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोरोळ येथील अंगणवाडी क्र.१ व अंगणवाडी क्र.२ या दोन्ही अंगणवाडीचे काम रखडल्याने संबंधित अंगणवाडी ताई यांना ग्रामपंचायतीच्या समोरील पायऱ्यावर उघड्यावरच ताटकळत बसून दैनंदिन कामकाज उरकावे लागत आहे. बोरोळ येथील दोन्ही अंगणवाडीची गेल्या एका वर्षापासून डागडूजी चालू असून या दोन्ही अंगणवाडी वरील पत्रे बदलने व रंगरंगोटी करणे अशी कामे करावयाची आहेत पण या दोन्ही अंगणवाड्याना पत्रे तर टाकण्यात आली परंतू ती पत्रे निकृष्ठ दर्जाचे असल्याने व त्याची फीटींग व्यवस्थित झाली नसल्याने पडलेले पावसाचे पाणी अंगणवाडीत खाली पडत आहे. आणि एका वर्षाच्या कालावधीत कसल्याच प्रकारची रूगरंगोटी करण्यात आली नाही. याची चौकशी करून दोशीवर कडक कारवाई करण्यात यावी व रखडलेले अर्धवट राहीलेले काम लवकरात लवकर पूर्ण करावे अन्यथा आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन दिले होते. तरीही पंचायत समिती कडून कसल्याही हालचाली दिसत नाही. दिलेल्या निवेदनावर प्रताप कोयले, ज्ञानेश्वर सपकाळे, धोंडीराम मुळखेडे, यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या होत्या. परिणामी गेल्या ...**पान ६ वर**

## आमदार देवेंद्र भुयारांच्या हस्ते वरुड पोलिस कर्मचाऱ्यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मान!



**वरुड/प्रतिनिधी**

वरुड येथे आमदार देवेंद्र भुयार यांच्या हस्ते कोरोना काळात उत्कृष्ठ सेवा देणारे वरुड पोलिस स्टेशन कार्यालयातील हेड पोलीस कॉन्स्टेबल रुपराव कडू, पोलीस कॉन्स्टेबल उमेश ढेवले, रवींद्र धानोरकर, दीपक पंधरे, परमेश्वर काकड, गजानन गिरी यांच्याह विविध पोलीस कर्मचाऱ्यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याला अनुसरून पोलीस बांधव आपले कर्तव्य करत असतात. त्यातून जेव्हा एखादे मानवतावादी कामगिरी त्यांच्या हातून घडते त्यावेळेस पोलिसांचा, त्यांच्या कामगिरीचा मला प्रचंड अभिमान वाटतो, असे प्रतिपादन आमदार देवेंद्र भुयार यांनि केले.

वरुड पोलिस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले पोलीस हेड पोलीस कर्मचारी यांनी कोरोंना काळात उत्कृष्ठ सेवा देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली. दरम्यान कार्यरत असतांना पोलिस कॉन्स्टेबल उमेश ढेवले व रवींद्र धानोरकर या कोरोंना योध्यांना कोरोनाची लागण झाली तरी कोरोनावर मात करत हे कोरोंना योद्धे सेवेत रुजू झाले. यांच्या कार्याची दखल घेत मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी वरुड पोलिस स्टेशन येथे जाऊन हेड पोलीस कॉन्स्टेबल रुपराव कडू, पोलीस कॉन्स्टेबल उमेश ढेवले, रवींद्र धानोरकर, दीपक पंधरे, परमेश्वर काकड, गजानन गिरी यांच्यासह ...**पान ६ वर**

## महाराष्ट्राचे उमदे नेतृत्व : ना.अमित देशमुख!

राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री अमितभैय्या देशमुख यांचा २१ मार्च रोजी वाढदिवस. प्रथम त्यांना वाढदिवसानिमित्त मनापासून शुभेच्छा. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचा विस्तार ग्रामिण भागापर्यंत झाला असून अमितभैय्या देशमुख यांच्यासारख्या तरुण नेत्यामुळे हे शक्य झाले आहे. काँग्रेस पक्षात जी तरुण नेत्यांची फळी आहे त्यात अमितभैय्या यांचा क्रमांक वरचा आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची छबी त्यांच्यात दिसते. भाषणाची शैली, सर्वांशी संवाद साधणे, त्यांचे ऐकून घेणे किंवा एखाद्यास प्रतिसाद देणे सर्व काही विलासराव साहेबांसारखेच. त्यामुळे भविष्यात अमितभैय्या विलासराव साहेबांसारखेच नाव मिळविणार. बाभळगावात बालपण गेलेल्या अमितभैय्या देशमुख यांनी बी. ई. केमिकल इंजिनियरिंग ही पदवी संपादन केली आहे. इंजिनियर असूनही त्यांनी राज्याच्या राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांनी राजकारणात सहभागी व्हावे, असा संदेश दिला होता. त्या विचाराने प्रभावित होवून अमित देशमुख हे राजकारणात आले. युवक काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी राजकीय जीवनाचा 'श्री गणेशा' केला. सन १९९९ व २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत विलासराव देशमुख विक्रमी मतांनी विजयी झाले. युवकांचे संघटन योग्य पध्दतीने केल्यामुळे विलासराव यांचा विजय सोपा झाला. यामागे अमित देशमुख यांचे अथक परिश्रम होते, हे कोणीही नाकारणार नाही. अमितभैय्या यांच्या कार्याची दखल घेवून काँग्रेसने २००२ मध्येच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्षपद त्यांना दिले. त्या काळात सांगली, सोलापूर या जिल्ह्याचे प्रभारी म्हणूनही अमितभैय्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. मिळालेल्या पदाचा वापर त्यांनी महाराष्ट्रात युवक काँग्रेसची फळी मजबूत करण्यासाठी केला. पक्षावर असलेली निष्ठा व काम पाहून काँग्रेसने २००९ साली त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली. त्यांनतर ते पहिल्यांदाच विधानसभेत पोहोचले. सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत तर देशात आणि महाराष्ट्रात मोदी लाट होती. पण या लाटेचा लातूरवर काहीही फरक पडला नाही. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे नियोजन आणि अमितभैय्या यांच्या परिश्रमामुळे लातूर शहर आणि ग्रामिण मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले. याची नोंद घेवून ३० डिसेंबर २०१९ रोजी काँग्रेसने अमितभैय्या देशमुख यांना कॅबिनेटमंत्री पदी काम करण्याची संधी दिली. अमितभैय्या यांना मंत्रीपद मिळाल्यामुळे जिल्ह्याला पुन्हा सोन्याचे दिवस आले आहेत. आज ते वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यात काही जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी मिळाली आहे. सांस्कृतिक विभाग त्यांच्याकडे असल्याने अनेक वृद्ध कलावंतांच्या मानधनाचा प्रश्नही मार्गी लागला आहे व भविष्यात लागेलही. दोन्ही खात्यांचे मंत्री म्हणून काम करताना अमितभैय्या यांनी अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. अमितभैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याची वाटचाल दमदारपणे चालू आहे. विकासासाठी अनेक योजना मंजूर करण्यात आल्या असून मोठा निधी पण प्राप्त झाला आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली विलास साखर कारखान्याचे दोन युनिट यशस्वीपणे चालू असून शेतकर्यांच्या हितासाठी व्टेंटीवन या कारखान्याची उभारणीपण पूर्ण झाली आहे. सामान्य जनतेचा विकास झाला पाहिजे, हा ध्यास मनाशी बाळगून अमितभैय्या काम करीत आहेत. युवा शक्तीच्या जोरावर बलशाली भारताचे स्वप्न पाहिले जात असताना अमितभैय्या यांच्यासारख्या तरुण नेतृत्त्वाने केलेले आणि सुरू असणारे कार्य खरेच कौतुकास्पद आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा आणि त्यांच्या कार्याला सलाम!



**– प्राचार्य डी.एन. केंद्रे,**

**सदस्य : जिल्हा गुणवत्ता संवर्धन समिती, लातूर**

CMYK